Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला---सोमवार तारीख १ माहे मे सन १९१६ ई० [ अंक १७

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } S. Clemence, एजंट

नं १

अस्सल अंगुरी.

## हिंग

केवळ एक आणा तो. पवित्र केशर १॥ तो. शुद्ध शिलाजीत. ।॥ तो. खालिस कस्तूरी रु. २५ तो. तिबेती ममीरा रु. ३ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५
नो० नं० २

### हिंदुस्थानावर अरिष्ट

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें मागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तपणा व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात किं रु. १८.

बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुनटी, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरळी लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

## चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

हिंदुस्थानांत मराठी भाषेंत असें हें पहिलेंच.
स्वस्त आणि उपयुक्त मासिक पुस्तक.

सुरू झालें. वा. व. ८५ ] **पूर्णानंद** [ सुरू झालें. ट. ख ८३

लहान मोठ्या सर्व स्त्री पुरुषांच्या चित्तांचें सारखेंच आकर्षण करणारें व अनेक विषयांचा उहापोह करणारें अगदीं नवीन तऱ्हेचें अत्यंत मनोरंजक पूर्णानंद मासिक पुस्तक फेब्रुवारी महिन्यापासून सुरूं झालें. यांत चटकदार गोष्टी, हास्यकारक चुटके कविता, कादंबऱ्या वगैरे मनोरंजक लेख येत. शिवाय प्रसिद्ध विद्वानांच्या लेखांचा व विविध ज्ञानाचा संग्रह यांत केला जात आहे. सारांश फक्त पांच आण्यांत वाचकाला जेवढा लाभ करून देणें शक्य तेवढा किंबहुना जास्त देण्याचा प्रयत्न केला आहे. लढाईमुळें चालू परिस्थिति सर्व बाजूंनीं बिकट व खर्चिक झाली आहे. तरी पण या मासिकाची वार्षिक वर्गणी फक्त ।–
( व्ही. पी. पोस्टेजसह ॥~ ) ठेविली आहे. नमुन्याचा अंक दीड आण्याची तिकिटें पाठवून मागवा.

बळवंत रामचंद्र सोहनी,
पूर्णानंद–कार्यालय,
खडेबाजार–बेळगांव.

नो. नं. १३२

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः– गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरयाचे, लिस्टफार्म पर्च्याचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जाचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

### श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखे-खालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचें सुबक दागिने— मंगळसुत्र माळ, ठुशा-मोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळी टीका, मुदा, अग्रफुलें साखळ्या व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, तारें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कामिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रेल्वेनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया अगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय–कोल्हापूर
नो नं ६

## कौतुकरत्नाकर

छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह
पृष्ठसंख्या ६००; विषय १०० वर आवृत्ती ९ वी. प्र. २००००,

बंगाल्यांतील कामरूपदेशी ही विद्या फार प्रबळ असून तिकडील जटेली, कोटि, छा लु करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवुन सिद्धनागार्जुन मंत्र महोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमतं ग्रंथ तयार केला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुगाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम प्रहारिकांचें वर्णनें भानुमती यंत्र वशिकरणशास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण, मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, मानारंग कला, आत्मविद्यामेस्मेरिझम प्रयोगविधि वगैरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया.

## कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खराखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रही ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको. किंमत १ रुपया ट. ख. ४ आणे.

पत्ताः— गंगाधर आर. आणि कंपनी.
हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ७

# विद्यामंदिर वाकररोड नागपुर.

## येथें मिळणारीं पुस्तकें.

DR. SHRIDHAR V. KETKAR'S INDIAN ECONONICS.

Re 1-8-0 per V. P. Re. 1-11-0.

Good opinions are passed by the TIMES (London) the EMPIRE (Calcutta) the MODERN REVIEW (Calcutta) the HINDUSTAN REVIEW (Allahabad) Strong condemnation by the PIONEER (Allahabad) Chapters I what is Indian Economics (ii) social conditions and Economics condition (iii) Indian Economics and Indian Pagcholoky. (iv) Political conditions and Economics condition, (v) Language Policy and Economics, (vi) Economic evolution and layers of cicilization (vii) Communal Economics and distributive Economics (viii) Future out look.

**२ संकीर्ण लेखः—डा०** केतकर यांचे किंमत १ रु. ४ आणे. व्ही. पीनें १ रु. ७ आणे. यात पुस्तकांत **खालील** लेख आलेले आहेत.

(१) जातिभेद आणि **त्या** संबंधाचें राष्ट्रीय धोरण

(२) या विषयावर झालेला वादविवाद

(३) समाजाचें धर्म नियमन आणि तें **करणारा** वर्ग

(४) धर्मनियमन आणि ब्राम्हणांची परंपरागत विद्या

(५) **समाजशास्त्र** आणि धर्मशास्त्र यांचा परस्पर **संबंध**

(६) विक्रीचें अर्थशास्त्र आणि यंत्रशास्त्र

(७) नगर संवर्धन आणि नगर सौंदर्य

(८) मध्यप्रांतीयास संदेश

(९) प्रतिनिधींचीं कर्तव्यें

(१०) पोलिटिकल क्लब कसा करावा.

या पुस्तका संबंधानें २७ जुलै १९१५ च्या अंकांत केसरीकार म्हणतातः—

"डा० केतकर हे **खंदे लेखक** असून महाराष्ट्रांत निरनिराळ्या बहुतेक प्रसिद्ध वर्तमानपत्रें आणि मासिकें यांतून यांचे लेख प्रसिद्ध होत असल्यामुळें, ते महाराष्ट्रीय वाचकांच्या अत्यंत परिचयाचे झाले आहेत. इकडे तिकड विखुरलेलीं रत्नें पहाण्यांत मौज नसून त्यांच हार करून पहाण्यांतच जसा खरा आनंद आहे, त्याचप्रमाणे लेखकांच्या विचाराचा पूर्ण परिचय **होऊन** विचारांना **चालन** मिळण्यास नियत कालिकांतून निरनिराळ्या वेळीं प्रसिद्ध **झालेल्या लेखांपेक्षां** संकीर्ण रूपानें प्रसिद्ध झालेल्या लेखांचाच फार उपयोग होतो. जगांत **विषय कांहीं** नवीन नसतात, पण तेच विषय नवीन पद्धतीनें आणि त्यांत नवीन विचार **सरणीची** भर घालून लोकापुढें आले म्हणजे समाजाच्या मनाची खळबळ उडवून देण्यास **कारणीभूत** होतात. डा० केतकर हे निर्भीड लेखक असून एखाद्या सन्मान्य गृहस्थावर अगर संस्थेवर तुटून पडतात हें खरें आहे, तथापि एखाद्या विषयावर जेव्हां ते आपलें मत देतात, तेव्हां प्रथम जरी त्यांचें जें मत लोकांना विलक्षण वाटलें तरी तें प्रमाणबद्ध रीतीनें मांडलेलें असल्यामुळें विचारांना जोराचें चालन मिळण्यास कारणीभूत होतें यांत शंका नाहीं.

३ उत्तर अमेरिकेंतील वसंत काल 'एक साकी वृत्तात्मक काव्य, गोविंद पैत्र कवींचें. "धाडशी मन मोकळेपणा हाच या काव्याचा मोहक काव्यगुण आहे (महाराष्ट्र) किंमत ४ आणे

पत्रव्यवहार व्यवस्थापक विद्यामंदिर
वाकररोड या पत्त्यावर करावा.

नो. नं. ११८

---

## NOTICE

The Treasury officer is now prepared to issue and encash Universal Currency Notes and Home Notes (Bombay Circle) of other denominations for the public on demand as far as possible

Endeavours will be made as far as possible in all transactions to meet the equirements of the payee as to the form of currency in which he desires to take payment.

The above orders do not yet apply to the Treasuries at Nagpur, Akola and Amraoti where Government treasury work is done by branches of Presidency Banks. As soon as arrangements are completed with the Banks concerned, a further notice will be issued giving the date from which free encashment of currency notes at these centres will be available.

---

## जाहीर नोटीस

मेसर्स पेस्टमजी अँन्ड सन्स यांचेकडून सर्वत्र आकोल्यासी लोकांस कळविण्यांत येते कीं आमचे दुकानीं आकोल्याहून आकोट वाशीम वगैरे इतर ठिकाणीं जाण्याकरितां सर्व प्रकारें अपटूडेट उत्तम सोयीची माकस्वेल मोटार गाडी खालील दरानें मिळूं शकेल.

आकोल्याहून वाशीम एक फेरी रु. ३०
" " येण्याजाण्याचे रु. ५१
आकोल्याहून आकोट एक फेरी २०
" " येण्याजाण्याचे रु ३०

इतर ठिकाणीं जाण्या करितां प्रत्येक मैलास एक वेळेस बारा आणे प्रमाणें लागेल. परंतु येण्या जाण्या करितां केल्यास प्रत्येक मैलास आठ आणे प्रमाणें पडेल.

विशेष टीप— परत प्रवास करणें तो ज्या दिवशीं तेथें पोहचला असेल त्याच दिवशीं केला पाहिजे. परंतु मुक्काम करणें असेल तर प्रत्येक दिवशीं रु. १० प्रमाणें ज्यास्त भाडें पडेल.

नो. नं. १२७ मेसर्स पेस्टमजी अन्ड सन्स

---

## नोटीस

नोटीस वेशमी सावीत्री मर्द किसन व पाटाचा नवरा आंधु रा० मौजे निंबी ता० आकोला

यांसः—

अज्ञान नामदेव तर्फ सूर्यभान पुंजाजी रा० व्याळे ता० बाळापूर **यांजकडून नोटीस** देण्यात येत आहे कीं माझा भाऊ **किसन** मरण पावला त्याची तुं बायको असून मुलगा नामदेव आहे माझा भाऊ **मेल्यावर** तूं पाटाचा नवरा करून सर्व इस्टेट त्याचे घरीं निंबी येथें नेली.

२२॥ कोपरवाळ्या चांदीच्या **तोळे** १०
३० गुंडवाळ्या चांदीच्या तोळे ४
१० लुगडे १ नागपूरी नवीन
४९ नगदी रुपये
२६॥ नथ सोन्याची १ तोळा
४०
६ पोलट चांदीचे **जोड** १
१२॥ टीप १२॥ रुपये
१९६॥ एकूण

**येणें** प्रमाणें माल घेऊन गेली त्या इस्टेटीची मालकी आमची आहे करितां ही **नोटीस** पावतांच चार पंचा समक्ष सर्व जिनसा आम्हांस आणून द्याव्या **व आमची** पावती घ्यावी. अगर पंचा **समक्ष** दुसरे साहुचे स्वाधीन करावी. अज्ञानाची इस्टेट अहि तसें न केल्यास मग मात्र आम्ही कोर्ट मार्फत **तजवीज** करून तुमचा **जबाब** घेऊं हे **पक्के समजावें** कळावें तारीख २०-४-१६ **इ.**

सही
नामदेव अ० तर्फे सूर्यभान वा।
पुंजाजी रा० व्याळे नि. खु.

नो. नं. १५०

---

## जाहिर नोटीस

सर्वत्र सेट साहु व इतर लोकांस कळविण्यांत येते कीं ताजनापेठ **आकोला** येथील नाल साहेबा जवळील मकान **चतुःसिमा पु० सडक** प० मुंबईवाले **बारशाखाची हवेली** द० कायमखा वा। **कादरखां यांचे मकान** उ० अबदुल्ला कच्छी याचा **कोठा.** सदर्हू मकान आमची आजी **नाबे सरपाबी** मर्द आमदखां ईचे पूर्ण **मालकीची** आहे तिचे योग्य वारस मी आणि **माझा** वडील भाऊ सिलेमानखां वा। छांगाखां **व बहीण** अमनाबी मर्द नामदारखां असे **आहोंत.** करितां या नोटीसीनें कळवितो कीं सदर्हू वरील चतुःसिमेच्या आंतील मकान सालीम कोणास घेणें असल्यास त्यांनी आम्ही तिघे भाऊ बहीणीच्या सहीशिवाय घेऊं नये. जर करितां कोणी आमचा भाऊ सिलेमानखां वा। **छांगाखां** या एकट्यापासून सदर्हू मकान घेईल तर **त्यास** अमचे हिश्याबद्दलची जबाबदारी द्यावी लागेल कळावें तारीख २०-४-१६

द. शेरखां वा। दर्गाखां पि. रा. आकोला

सही
१ भीलाखां वा। छांगाखां नि. खुद
१ अमनाबी मर्द नामदारखां नि. खु.

नो. नं. १५१

---

## नोटीस

रा. रा. अमृता वा। इभ्राम उर्फ लुंगाजी पाटील रा. व पो. चानी ता. बाळापूर

यांसः—

मी खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुम्ही माझे मालकीचे शेत नदीचे कांठचे, बरडाचे, सुकळी वाटीचे, व मळा ही शेते तुम्ही माझा पुतण्या नामे तुकाराम वा। रावजी पाटील रा. चानी यांचे पासून तुम्ही ही सर्व शेते पांचव्या हिश्यानें बहीतीस केले व पांच वर्षाचा करार आपण लिहून दिला त्याप्रमाणें आपण तीन वर्षाचे पिकपाणी तो जिवंत होता तों पर्यंत बरोबर देत गेले. तो गुदस्तसालीं मरण पावला तर आपण त्याच सालीं मला पिकाचा हिशेब बरोबर दिला नाहीं. करितां आपले एक साल भरण्याचे राहिलें परंतु मी कांहीं आतां आपल्यास शेते वाहण्यास देत नाहीं. व तुम्ही विनाकारण माझेशी जबरदस्ती करता मी बायको माणूस आहे करितां मी तुम्हांस नदीचे कांठचे शेत निम्मे बटाईनें दिलें. त्याचे ही पीक आपण मला बरोबर दिलें नाहीं. ह्याबद्दल मी दिवाणीत दावा करित आहे. व आपण वरील तीन शेताचा ताबा सोडला ह्या गोष्टी चार पंचा समक्ष झाल्या-असतांना आपण तो हुकूम पाळत नाही हे बरोबर नाहीं. तुम्ही माझे शेतांत आजपासून बिल्कूल जाऊं नये. या उपर जबरदस्तीनें आल्यास तुमचेवर फौजदारी करण्यांत येईल व त्याचा खर्च व नोटिशीचा खर्च तुमचे पासून घेतला जाईल. कळावें ता० २५-४-१६ इ.

दस्तुर किसन सखाराम द. खुद

सही
सजन मर्द सखाराम पाटील रा.
चानी द. खु.

नो. नं. १५२

---

## नोटीस

रा. रा विठोबा वा। आश्रुजी वच्छे जात धनगर रा. अमडापूर ता. चिखली जि. बुलढाणा

यांसः—

मी खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तूं माझा लग्नाचा नवरा असून आपले उभैताचे लग्नास १५ १६ वर्षें झाली असून मी वयांत येण्यास अजमास १२ वर्षें झाली आहेत. मी वयांत अल्यापासून तुजजवळच राहत आली. या पांच सात वर्षांत तुजला रक्तापितीचा आजार होऊन तुझे शरीर निरुपयोगी झाले आहे. मी आजपर्यंत औषध उपचार करून दुरुस्त होण्याची वाट पाहिली. तुझे शरीर दुरुस्त होण्याचा संभव राहिला नसून आजपावेतो तुझे जवळ असलेल्या मुदतींत प्रपंच व्यवहार सुद्धां बंद झाला. यामुळें स्त्रीजातीचा जन्म निरर्थक होऊन संततीची हानि झाली ही गोष्ट दुःख दायक आहे. व तुला आतां माझी गरज राहिली नाहीं. यामुळें मी माझा चुलत बंधू गोविंदा पांचवे धनगर रा. शेळगांव ता. मेहकर येथें राहून दिवस काढीले अहे. वरील दुखाचा परिहार होण्या-

करितां कळविण्यांत येते कीं, नोटिस पावल्यापासून पंधरा दिवसाचे आंत आपले खुशीने नवरेपणाचा हक्क सोडून फारकती द्यावी. नोटिशीची मुदत संपताच माझे विवाचें दुःख निवारण करण्य करितां जग-जाहीर नोटिस दिली आहे. तीच फारकती समजून गधर्व विवाह करून गेल्यास तुह्मा कोणत्याही प्रकारे हक्क राहूं नये ह्मणून नोटिशीनें कळविले आहे. ही नोटिस दिली सही कळावें. ता. २२-४-१९१६

सही

निशाणी काशी मद विठोबा धनगर
रा. शेलगांव देशमूख

नो० नं० १९३

## नोटीस

नेमली तारीख १२-५-१६

वि॥ सबजज साहेब खामगांव
नादार अर्ज नंबर ३५

१६

अर्जदार

कुंदनमल अगरचंद मारवाडी रा. खामगांव

विरुद्ध पक्षकार

भुरामल शंकरलाल मारवाडी बिनवारा रेल्वे स्टेशन मद्रासलैन ठिकाणा लीखमाजी ताराचंद यांचे दुकानावर.

दावा रुपये

नादार होणें बद्दल अर्ज

(१) मी नादार कुंदनमल अगरचंद असा अर्ज करतो कीं, अर्जदार याजवर सावकाराचे १५५३३८१५८९ रुपये कर्ज असून मी ते देण्यास असमर्थ आहे.

[२] अर्जदार हा खामगांव येथें राहणार असून त्याचे उपजीविकेचे मुख्यसाधन जोहारमल लालचंद या नांवाचे दुकानावर नोकरी करून पोट भरणें आहे.

(३) अर्जदार याजवर वि॥ स्मालकाज कोर्ट मुंबई या कोर्टांत दिवाणी मुकदमा नंबर ४८४५ सन १४ चा दिपचंद सुलतानचंद यानें रुपये ४०८८६ चा हुकूमनामा मिळवून त्याचे आमलवारींत अर्जदार याला कैदी दरखास्तींत कैद केले असून अर्जदार हा सध्या जमानतीवर खुला आहे. तसेच अमोलकचंद मनसाराम दुकान कुफळ यानें वि॥ स्मालकाज कोर्ट खामगांव या कोर्टांत हुकूमनामा मिळविला असून तो अर्जदार याजवर कैदीची दर्खास्त देणार असें समजते. २०-४-१५

(४) अर्जदार यांस ज्या सावकाराचे देणें आहे. त्याची यादी कर्जासह परिशिष्ट "अ" अर्जासोबत दाखल केली आहे.

(५) अर्जासोबत दाखल केलेल्या परिशिष्ट (ब) यांत दाखविल्याप्रमाणें अर्जदार यांस लोकांकडून घेणें असून अर्जदार याज जवळ खालीं लिहिलेली मिळकत आहे.

आंथरूण पांघरूण कपडेलत्ते किंमत रुपये १० स्वयंपाकाची भांडीं कुंडी किंमत रुपये १० वहीखातें.

वरील सामान पेठ खामगांव मुक्काभीच असून ते विद्यमान सबजज कोर्ट खामगांव हुकूम करील तेव्हां कोर्टाचे स्वाधीन करण्यास अर्जदार तयार आहे.

(६) अर्जदार याचे लोकाकडेस असलेले घेणें सावकार लोकांनी वाटून घेऊन अर्जदार यांस कर्जातून मुक्त करावे.

कोर्टास विनंती कीं वर लिहिलेलें कारणाकरितां अर्जदार हा नादार होण्यास पात्र आहे असा ठराव होऊन अर्जदार यांस नादारीचा दाखला मिळण्याविषयीं हुकूम व्हावा आज तारीख २०-४-१९१६

सही

R. N. Trivedi
Sub Judge
Khamgaon

नो. नं. १९४

## नोटीस

भवानी वा॥ शिवाजी कोळी रा. खाल्खोनी पोष्ट खोलापूर ता. उमरावती

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमच्याशीं माझा विवाह होऊन आज अजमासे ९-१० वर्षे झाली असून सुमारें ६ वर्षापासून तुमचे आंगावर रक्तपिती उठली असल्याकारणानें माझे संसाराचे कामास तुह्मी अयोग्य झाले आहांत. तुमच्याशीं विवाह झाल्यापासून मी माझे आप्तवर्गापाशीं असून माझे खाण्यापिण्याचा खर्चाचा वास्तविक बोजा लग्नापासून तुमचेवर असतांना तुह्मी त्याची कांहींच तजवीज करित नसून त्याचा बोजा माझे आप्तवर्गावर विनाकारण पडत आलेला आहे. आजपर्यंत आप्त वर्गाचे माझे प्रित्यर्थ लग्नापासून रुपये ६०० सहाशें सरासरी खर्च झाला आहे. व तो खर्च आप्तवर्ग माझेपासून मागत आहे. तरी विनाकारण फिर्याद फाव्याचा खर्च होऊं नये. ह्मणून तुह्मी सदर्हू रुपये नोटिस पावल्यापासून १५ दिवसाचे आंत माझे बहीण जवाई ओंकार दर्याजी कासोकार रा. रेल ता. अकोट यांचे जवळ देऊन तंटा तोडून टाकावा. या शिवाय ज्याअर्थी तुमचे अंगावर रक्तपिती आल्याकारनें संसाराचे कामास तुह्मी अयोग्य आहांत. त्याअर्थी तुह्मी मजला नोटिस पावल्यापासून १५ दिवसाचे आंत रेल येथें ओंकार यांचे घरीं फारकत द्यावी. फारकत देईपर्यंत माझा खावटीखर्च दरमहा रुपये ५ प्रमाणें द्यावा कळावें तारीख २६-४-१६ दस्तुर हरी रावजी चोभे रा. आकोला.

सही

सरु मर्द भवानी खराये निशाणी बांगडी द. ओंकार दर्याजी द. खुद मु. आकोला

नो. नं, १९६

## नोटीस

नोटीस वेशमी बळीराम वल्द गुण्या महार वानखडे रा० बपोरी ता० मुर्तीजापूर

यांसः—

येशोदी मर्द बळीराम महार राहणार कारली ता० मुर्तीजापूर नोटीस देते ऐसाजे कीं, तुह्मी माझे लग्नाचे नवरे असून लग्न होण्यास ९ वर्षे झाली मी अज्ञान असतां तुमचे घरीं १-२ वेळां आली होती, पुढें सज्ञान झाल्यावर ही १-२ वेळां थोडे दिवस राहीली होती. मी असल्यावेळीं आपण हमेशा बाहेरगांवी राहून नाचेरगाचें काम करितां. व माझे संसाराचे दिवस फुकट जात आहेत, अखेरीस तुह्मी मला माहेरी पोंचवून दिले, तेव्हांपासून मी आपले आईचे घरीं राहून कर्ज करून निर्वाह करित आहे. माझे निर्वाहाचे झालेले कर्ज रु० २०० द्यावें व तुह्मी नाचेपणाचे काम करितां सबब मला दुसरा घरठाव करण्यास फारकती द्यावी, १५ दिवसाचे आंत फारकती द्यावी, मुदतींत फारकती न दिल्यास मग हीच फारकत समजून मोहतीर केंऊं जाईल. मग नवरेपणाचा तुमचा हक्क राहणार नाहीं हे खुब समजावें. ही नोटीस दिली ता० २८।४।१६ इ०

दस्तुर नारायण वामन रा० आकोला

सही

येशोदी मर्द बळीराम महार रा०
कारली ता. मूर्तीजापूर पोष्ट
माना नि. आंगठा

नो. नं. १९१

## पत्रव्यवहार.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

सा. न. वि. वि. गुरुवार ता. ६ एप्रिल रोजीं यवतमाळ तालुक्यांतील सद्गृहस्थांचो सभा येथील प्रसिद्ध नागरिक रा. ब. भाऊ साहेब मुंडले यांचे बंगल्यावर भरून 'पहिली यवतमाळ जिल्हा परिषद' यंदा यवतमाळ येथें भरवावी असें ठरलें. सदर्हू सभेंत स्वागत मंडळाची स्थापना होऊन येथील प्रासिध्द नागरिक रा. रा. यशवंत खुशाल देशपांडे एम्. ए. एल्. एल्. बी. यांस सदर्हू मंडळाचे अध्यक्ष निवडण्यांत आलें.

परिषदेचें अधिवेशनास सुरवात शनिवार ता. ६ मे १९१६ रोजीं सायंकाळीं चार वाजतां होईल, व तिचें काम ता. ६ व ७ या दोन दिवशीं चालेल.

परिषदेच्या अध्यक्षाचे जागीं मध्यप्रांताच्या कायदेकौन्सिलचे सभासद नामदार मोरेश्वर राजाराम दिक्षित बॅरिस्टर नागपूर यांची योजना झाली असून त्यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारण्याचें कबूल केलें आहे.

स्वागत मंडळानें निरनिराळ्या कमिट्या नेमून आपलें काम जोरानें सुरूं केलें आहे.

परिषदेच्या माहितीचीं पत्रें जिल्ह्यांतील सर्व प्रमुख गृहस्थांकडे गेलीं आहेत. गांवोगांवीं सभा भरवून आपले तर्फे परिषदेस प्रातिनिधी ह्मणून हजर राहणारे गृहस्थांची निवडणूक करण्याविषयीं त्यांना विनंति करण्यांत आली आहे; व त्याच प्रमाणें ठिकाठिकाणचे सार्वजनिक स्वरूपाचे जे प्रश्न असतील ते इकडे लवकर कळविण्याबद्दलही विनंति करण्यांत आली आहे.

स्वागत मंडळाचे सभासद होण्याची फी पांच रुपये व प्रतिनिधीची फी दोन रुपये ठेवण्यांत आली आहे.

बाहेरगांवच्या मंडळींची उतरण्याची व जेवणाखाण्याची सोय उत्तम प्रकारची करण्यांत येणार असून त्याबद्दल दोन दिवसाकरितां फक्त एकच रुपया अधिक पडणार आहे.

परिषदेस स्वयंसेवकांची अवश्यकता आहे. असें कळतांच जिल्ह्यांतून ठिकठिकाणच्या तरुण स्वयंसेवकांनीं आपलीं नांवें नोंदवून घेतली आहेत व अजूनही घेत आहेत. तरी ज्यांना अजून नांवें नोंदवावयाची असतील त्यांनी त्वरा करावी.

स्वयंसेवकांनीं ता. १ मे चे सुमारास येथें येणें सोईचे होणार आहे. स्वयंसेवकांपासून येथें असतांना कोणाचाही खर्च घेतला जाणार नाहीं.

आतां अवधी फारच थोडी राहिली असल्यामुळें परिषदेच्या तयारीचें काम जारीनें सुरूं आहे.

जिल्ह्यांतील सार्वजनिक कळकळीचे सद्गृहस्थांकडून शक्य ती सर्व मदत होत आहे.

जिल्ह्यांतील सर्व लोकांचा परिषदेच्या कामाबद्दल अपूर्व उत्साह दिसत आहे

यवतमाळ जिल्ह्यांतीलच नव्हे तर सर्व वऱ्हाड व मध्यप्रांतांत ही पहिलीच जिल्हा परिषद भरणार असल्यामुळें प्रांतांतील अनेक पुढाऱ्यांना व विद्वान गृहस्थांना निमंत्रण करण्यांत येणार असून परिषदेनंतर त्यांची व्याख्यानें करविण्याचे घाटत आहे.

आपला
कमलाकर

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र व॥ १४ शके १८३८

## युद्ध संपल्यानंतर.

प्रस्तुतचें युद्ध संपल्यानंतर जें जें कांहीं व्हावयाचें ह्मणून निरनिराळ्या देशांतलीं वतमानपत्रें ह्मणत आहेत तें तें घडूनच येईल हे जरी निश्चितपणें कोणास सांगतां येणार नाहीं, तथापि या युद्धामुळें एकंदर जगाच्या स्थितींत फार मोठा फरक पडेल हें सांगण्यास भविष्यवाद्याची जरूरी नाहीं. युद्धांत दोस्त राष्ट्रांचा विजय व्हावा अशी बहुतेकांची— निदान ब्रिटिश साम्राज्यांतल्या प्रत्येकाची— उत्कट इच्छा आहे व त्या साठीं ब्रिटिशसाम्राज्यांतर्गत प्रत्येक रहिवासी अहोरात्र देवापाशीं प्रार्थना करीत आहे. त्यांची ती प्रार्थना सफळ झाल्यास जर्मनीची रग चांगलीच जिरेल, इतकेंच नाहीं, तर जर्मन राज्याचा बराचसा विस्तार कमी होऊन जर्मनीचें अवाढव्य राज्य बेलज्यम किंवा हॉलंड यां सारखें अल्प विस्ताराचें राहील, त्या राष्ट्राचें सैनिक बळ कमी होईल येवढें तरी निश्चित आहे. जर्मनीला पुनः वर डोकें करण्यास कमींत कमी ५० वर्षे तरी लागतील अशा रीतीच्या अटींवरच त्या राष्ट्राशीं तह करण्याचें दोस्त राष्ट्रांचें ठरलें आहे असें इंग्रजी वर्तमानपत्रांवरून कळतें. जर्मनीच्या राजकीय वैभवाबरोबरच त्याचा परराष्ट्रीय व्यापार, व उद्योगधंद्याचा प्रसार संपुष्टांत येईल. जर्मनीला दंड ह्मणून बरीच मोठी रकम दोस्त राष्ट्रांना द्यावी लागेल. त्याचा परिणाम त्याच्या सांपत्तिक स्थितीवर झाल्या शिवाय राहणार नाहीं. जर्मनीला दोस्त

राष्ट्रांत व्यापार करण्याची परवानगी पुनः मिळाली तरी जर्मन मालविषयीं लोकांच्या मनांत बसलेला तिटकारा सहज निघून जाणें अशक्य असल्यामुळें त्यांच्या व्यापाराला जबरदस्त धक्का बसल्याशिवाय राहणार नाहीं. शेतकी, शिल्प व व्यापार हीं धनार्जनाचीं तीन साधनें आहेत. या तिन्हींचा मार्ग तूर्त जरी खुंटला आहे तरी युद्धसंपल्यानंतर जर्मनी तिन्हीं मार्गांनीं पैसा आकर्षण करण्याचे कामीं आपली शिकस्त करून पाहिल असें दिसतें. वर्तमानपत्रांतून येणाऱ्या बातम्या जर विश्वसनीय असतील तर जरी जर्मन व्यापाराला दोस्त राष्ट्रांनीं प्रतिबंध घातला आहे, तरी जर्मन कारखान्यांनीं माल तयार करण्याचें काम पूर्वीं सारखेंच जारीनें सुरू ठेविलें असून १५०० कोटींचा माल ते पुढें विक्रीसाठीं साठवून ठेवित आहेत असें कळतें. हें खरें असलें तर युद्ध संपतांच हा प्रचंड साठा एकदम बाजारांत येऊन थडकेल. दोस्त राष्ट्रांतल्या कारखान्यांतून हल्लीं बहुतेक दारूगोळ्यांखेरीज इतर माल क्वचित्च तयार होत असल्यामुळें इतर राष्ट्रांच्या मालाच्यानें जर्मन मालाबरोबर टिकाव धरवणार नाहीं. ही भीती काल्पनिक नाहीं असें जागोजागच्या चेंबर्स ऑफ कॉमर्स सारख्या व्यापारी मंडळ्यांच्या रिपोर्टीवरून दिसतें. कारखाने युद्धाच्यावेळीं सुद्धां पूर्वीसारखे चालू ठेवण्यांत जर्मनीचा अंतःस्थ हेतु हा दिसतो कीं हे कारखाने बंद ठेवल्यास मजूर वगैरे लोक उपाशीं मरतील व अतिशय असंतोष माजून जर्मन सरकारला बाहेरील शत्रुबरोबर आणि त्याचवेळीं अंतस्थ असंतोषाबरोबर टक्कर द्यावी लागेल आणि एवढें करण्याचें सामर्थ्य आपले अंगीं नाहीं हें जर्मनी पूर्णपणें जाणून आहे. यापेक्षां माल बराचसा तयार करून युद्ध संपल्याबरोबर तो परराष्ट्रांच्या बाजारांत पाठवून व मुद्दाम कमी किमतीस विकून सगळी गिऱ्हाइकी एकदम हस्तगत करावयाची असा जर्मनीचा बेत दिसतो. इंग्रज फ्रेंच व इटालियन सरकार तहाच्या अटी ठरवितांना या गोष्टीचा योग्य विचार करीलच या कामांत त्यांना कितपत यश प्राप्त होतें तें पहावयाचें आहे.

या युद्धाचा परिणाम व्यापाराशिवाय अन्य पुष्कळ तऱ्हेनें होणार आहे. जपान सध्या रशियासाठीं दारूगोळा तयार करीत आहे व लढाऊ जहाजें बांधीत आहे. याच्या योगानें जपान व रशिया यांच्यामध्यें विशेष प्रकारची दोस्ती झालेली आहे. या गोष्टीचा फायदा करून घेतल्याशिवाय धूर्त जपानी मुत्सद्दी कदापि राहणार नाहींत. ते रशियापासून सध्यां मालाबद्दल अवाच्या सवा पैसा काढीत आहे पण येवढ्यानेंच त्यांचा संतोष होणार नाहीं. ते कांहीं व्यपारी सवलती व हक्क मागण्याच्या विचारांत आहेत असें पायोनिरचा टोकियो येथील वातमीदार ह्मणतो आणि तें खरें दिसतें. जपान हिंदुस्थानांतही आपल्या मालाचा खप कल्पनेच्या बाहेर करूं लागाला आहे. हिंदुस्थान सरकारनें निर्यात कापसावर जो कर बसविला आहे तो जपानी व्यापाऱ्यांच्या पोटांत दुखत आहे व जपान सरकार आपल्या मित्रत्वाच्या संबंधाच्या सबबीवर या संबंधांत सवलत लवकरच मागेल असा रंग दिसतो.

खुद्द इंग्लंडवर राजकीय व वाणिज्य विषयक जो परिणाम प्रस्तुत युद्धावर घडला आहे, तो सामान्य नाहीं. तथापि सामाजिक परिणाम त्याहूनही अधिक महत्वाचा आहे. इंग्लंडचे पुरुषांची बरीच मोठी संख्या या युद्धांत मारली गेली किंवा जखमी व पंगु झालेली आहे आणि त्यांच्या नौकरीच्या जागा हल्लीं विलायतेंतल्या स्त्रियांनीं भरून काढल्या आहेत. या जागांचें काम त्या पुरुषाइतकेंच किंबहुना अधिक चांगल्या रितीनें करीत असल्यामुळें युद्ध संपल्यावर त्या त्या जागा पुरुषांच्या स्वाधीन करून परत स्वयंपाक गृहांतल्या चुलीची आराधना करण्यांत संतोष मानतील हें असंभवनीय आहे. पुरुषांच्या बरोबरीनें हक्क मागण्याची त्यांची चळवळ युद्धाचे पूर्वींच जोरांत होती. आतां थोड्या वर्षांच्या कामाच्या प्रत्यक्ष अनुभवानें त्यांनीं जो हक्क शाबीत केला आहे तो लक्षांत घेतां त्यांना तो हक्क देण्याचें नाकारण्यास इंग्लंडला आतां कांहीं सबळ कारण दाखवितां येणार नाहीं, व त्यांच्या मागण्या मुकाट्यानें कबूल कराव्या लागतील. पुरुषांची संख्या कमी झाल्यामुळें त्यांच्या विवाहाच्या पद्धतींतही फरक पडण्याचा फार संभव आहे. एकपत्नीत्वाच्या चालीला यापासून मोठा धक्का बसण्याचा संभव आहे असें ही विचारी लोक गंभीरपणें सांगूं लागले आहेत.

अमेरिका जरी तटस्थ आहे, तरी जर्मनीच्या अत्याचारामुळें अमेरिकन लोकांचीं मनें कलुषित झालेलीं आहेत. अमेरिकेंत जर्मन वंशजापैकीं पुष्कळ लोक स्थाइक रहिवासी झालेले आहेत. त्यांच्या मनावर अमेरिकन लोकांच्या वर्तनाचा परिणाम होऊन काय काय भानगडी उपस्थित होतील तें आतां सांगतां यावयाचें नाहीं.

ब्रिटिश वसाहती व ब्रिटिश राज्य यांच्या मधलें प्रेमबंधन विशेष दृढ झालें आहे हा प्रस्तुत युद्धाचाच विशेषें करून परिणाम आहे. हें प्रेमबंधन युद्धानंतरही असेंच दृढ राहील व त्या योगानें ब्रिटिशसाम्राज्याचा एकंदरीनें फायदा होईल या विषयीं शंकाच नको.

हिंदुस्थानाविषयीं तर बोलावयासच नको. या युद्धानें हिंदुस्थानचा सर्व तऱ्हेनें फायदा होण्यासारखा आहे. मात्र तो आह्मांस करून घेतां आला पाहिजे. या युद्धाचे वेळीं हिंदुस्थाननें दाखविलेली अप्रतिम राजनिष्ठा व केलेली मदत हीं ब्रिटिश मुत्सद्यांचा दृष्टिकोण बदलण्यास व हिंदुस्थानाविषयीं सप्रेम आदर मनांत बाळगविण्यास कारण झाली आहेत. पूर्वींची शंकावृत्ति बहुतेक मावळली आहे. हिंदीलोकांच्या कर्तृत्वशक्तीशीं इंग्रजांचा परिचय झालेला आहे. व हिंदुस्थानचा भावी उदयकाल दृष्टीच्या टप्प्यांत येत चालला आहे आद्योगिक उन्नति करून घेण्यास हा काल फार चांगला वाटून तिकडे हिंदुस्थान सरकारचें लक्ष लागलें आहे व नुकतेंच एक कमिशन त्या साठीं नेमण्यांत आलें आहे. सहानुभूति व आदर यांचा हा अंकुर या पुढें करपून जाण्याची भीती उरली नाहीं व हा अंकुर यापुढें पल्लवित होऊन हिंदुस्थानचें भविष्य पाहणाराच्या दृष्टीला सुखदायीच होईल अशी आशा करणें निरर्थक होणार नाहीं अशी आशा वाटत आहे.

## महायुद्धाची प्रगती.

आज जवळ जवळ अडीच महिने व्हर्डुन पाशीं तुमुल संग्राम चाललें आहे. तरी जर्मन लोकांचे पाऊल त्या किल्ल्याच्या फारसें जवळ गेलेलें दिसत नाहीं. मॉर्टहॉम आह्मी घेतलें अशी खोटीच बातमी जर्मनीनें मध्यंतरीं प्रसिद्ध केली होती ही प्रसिद्ध करण्याचा उद्देश उघड आहे. व्हर्डुनपाशीं लक्षावधी जर्मन प्राण्यांच्या आहुती पडत आहेत त्या कांहीं उगीच नाहींत, त्याचा कांहीं तरी मोबदला मिळत आहे असें खोटेंच सांगून जर्मन जनतेचीं क्षुब्ध मनें कशी तरी शांत करावी असा कावा या प्रसिद्धींत आहे. पण फ्रेंच लोक स्वतः सत्याचा आपलाप करणारे नाहींत, तसा दुसऱ्यालाही तो करूं देणारे नाहींत. फ्रेंच सरकारनें खरा प्रकार लागलीच प्रसिद्ध करून मॉर्टहॉम जर शत्रूनीं खरोखर घेतलें असतें तर आज फ्रेंच जेथें दिसत आहेत तेथून हटून त्यांना बरेंच मागें राहावें लागलें असतें. पण तसें झालेलें नाहीं, उलट त्यांचे पाऊल नेटानें पण संथपणानें पुढें पडत आहे हें स्पष्टपणें दाखविल्यामुळें जर्मनीच्या पदरीं खोटेपणा अचुक पडला आहे. सध्यां व्हर्डुन पाशीं दोस्त सैन्याची स्थिति समाधानकारक आहे. जर्मनीचा पुढें घुसण्याचा आवेश बहुतेक थंड पडला आहे. त्यांच्या तोफखान्याला फ्रेंच तोफखाना पुरून उरला आहे व जर्मन पायदळ हताश झालेला आहे. ह्मणून शत्रूंनीं आतां दुसरीकडे आपली चळवळ जोरानें चालविली आहे. चांपेन व इप्रेसकडे अधिक आवेश दाखवून व्हर्डुनपाशीं झालेली फजीती ते झांकू पाहत आहेत. पण चांपेनपाशीं ही रशियनांची व शत्रूंची अकल्पित रीतीनें गांठ पडणार आहे. रशियाला माणसांची वाण कधींच पडावयाची नाहीं. दारूगोळा व बंदुका यांचाही पुरवठा त्यांना भरपूर होत आहे. रशियन लोक फ्रान्समध्यें उतरल्यापासून ब्रिटिश फौजेचा उत्साहही द्विगुणित झाला आहे दोस्त राष्ट्रांच्या आरमारी प्रभुत्वाचीं प्रमाणें दिवसें दिवस ज्यास्त मिळत आहेत. शत्रूंचीं क्रूझरें समुद्रांतून पार हकललीं गेलीं आहेत. रशियाला आर्मेनियांत व इराणांतही लढावें लागत असतां त्याला पश्चिम रणक्षेत्राकडे ही मोठें सैन्य पाठवितां आलें यावरूनच शत्रूची कुवत कमी झाली आहे हें उघड सिद्ध होतें. रशियानें ट्रेबिझोंड सर केलेंच काळ्या समुद्रांत शत्रूचें ब्रेस्लो नांवाचें लढाऊ जहाज फिरत आहे अशी खबर असतांही त्याला न भितां दोस्त राष्ट्रांच्या आरमारानें लष्करास वेळीं योग्य मदत दिल्यानें ट्रेबिझोंड सर करणें रशियाला सोपें गेलें. बिटलिस व मुश या ठिकाणाहून तुर्क लोकांना हांकून लावण्याचे प्रयत्न सुरू असतां त्याच वेळीं ट्रेबिझोंड सर करण्याचा प्रयत्न यशस्वी रीतीनें पाडल्याबद्दल रशियाची तारीफ केली पाहिजे. ट्रेबिझोंड सर झाल्यामुळें अर्जरूमहून पुढें पश्चिमेस सरकणें शक्य झालें आहे. आतां एरझिंगन येथें जाण्याचा रशियाचा यत्न आहे. हें ही सर झालें ह्मणजे महत्वाचे सगळे रस्ते रशियाचे हातीं येतील. मेसोपोटेमिया मध्यें कुटेल अमरामध्यें सांपडलेल्या लोकांची सुटका करणें हे अत्यंत बिकट काम जनरल गॉरिंज यांचे कडेस आलें आहे, व त्यासाठीं तैग्रिस नदीच्या दक्षिणेस त्यांचें सैन्य मोठ्या अडचणींतून नटानें पुढें पाऊल टाकीत चाललें आहे. तेथें नद्यांना येणारे पूर व भयंकर दलदलें त्यांच्या मार्गांत अडचणी उपस्थित करीत आहेत. या प्रांतांतले शत्रूचे सेनापति फील्ड मार्शल व्हॅनडर गोल्ट्झ यांच्या आकस्मिक मृत्यूमुळें तुर्क लोकांची हबेलंडी उडालेली दिसत आहे. बाल्कन रणक्षेत्रांत तूर्त विशेष धामधूम दिसत नाहीं. सालोनिका येथील ब्रिटिश व फ्रेंच फौजेला सर्वियन सैन्याची मदत मिळेल अशा रीतीनें त्या सैन्याला आणण्याचा दोस्त राष्ट्रांचा निश्चय झालेला दिसतो. या मुळें ग्रीसला थोडासा राग येईल, पण सध्याची वेळ तिकडे पाहण्याची नाहीं. अशावेळीं भलभलत्या कंड्या ही उठण्याचा संभव आहे. पण त्यावर विश्वास ठेवण बरोबर होणार नाहीं. कांस्टांटिनोपल, स्मर्ना, व आड्रियानोपल या ठिकाणीं ग्रीक लोकांच्या कत्तली झाल्याबद्दलच्या बातम्या अशाच रीतीनें उठलेल्या दिसतात. त्यावर विश्वास ठेवतां येत नाहीं याला दुसरें एक कारण असें आहे कीं ग्रीसला खुष ठेवण्यांतच सध्या तुर्कांचे हित आहे. ते ग्रीक लोकांची कत्तल करून त्याला चिडविण्याइतके मूर्ख खास नाहींत. बल्गेरिया व तुर्क यांचें बिघडलें असल्याच्या बातम्या येऊन फार दिवस झाले नाहींत. इतक्यांत ते पुनः एक होऊन ग्रीक लोकांच्या रक्तांत हात बुडविण्यास तयार होतील यावर आमचा तरी विश्वास बसत नाहीं. अमेरिकन पानबुडी बोटींच्या नाशाचे संबंधांत जर्मनीला पाठविलेल्या खलित्यानें त्या दोन राष्ट्रांमधल्या संबंधाकडे लोक मोठ्या उत्सुकतेनें पाहूं लागले आहेत. अमेरिकन प्रेसिडेंटानें सहनशीलता दाखविण्याची शिकस्त केली आहे. तथापि अमेरिकेंत जर्मन लोकांनीं केलेलीं कृष्णकारस्थानें जेव्हां पटापट बाहेर येऊं लागलीं, तेव्हां डा० विल्सन यांचा निरुपाय झाला. अमेरिकन लोक मोठे अभिमानी आहेत. ते जर्मनीची अरेरावी कृष्णकारस्थानें यांचेपायीं आपल्या देशाची पायमल्ली होऊं देणारे नाहींत. या बाबतींत दक्षिण अमेरिकेंतल्या प्रजासत्ताक राज्यांचें मत प्रे० विल्सन यांच्या मताशीं पूर्णपणें जुळतें आहे. प्रेसिडेंटाच्या खलित्याला जर्मनीकडून काय उत्तर मिळतें पहावें. अमेरिकेशीं बिघाड होऊं देऊं नये ह्मणून जर्मन वकील कौंट बर्नस्टॉर्फ यांचे शिकस्तीचे प्रयत्न चालले आहेत. पण बर्लिनचें फॉरेन आफिसें कौंट साहेबांचें ऐकतीलच असा नियम नाहीं. इंग्लंडमधील क्याबिनेट मधल्या प्रधानमंडळांत सक्तीच्या लष्करी नौकरी संबंधानें झालेल्या मत भेदाची बातमी ऐकून शत्रूला आनंद वाटला असेल, पण हा आनंदही आतां

त्या नंतरची समेटाची बातमी ऐकल्यावर मावळला असेल.

## मुसलमान आणि प्रस्तुतचें युद्ध.

युरोपांतल्या एकंदर लोकसंख्येपैकीं २७ कोट ख्रिस्ती एका पक्षाकडून व १२ कोट ख्रिस्ती दुसऱ्यापक्षाकडून लढण्यांत गुंतले आहेत. तुर्कस्थानची लोकसंख्या सुमारें २। कोटी आहे यांत ख्रिस्ती व ज्यू लोकांची संख्या बरीच आहे. हिंदुस्थानांत मुसलमानांची संख्या ६॥ कोटीवर ह्मणजे तुर्की राज्यांतल्या लोकसंख्येच्या तिपटीवर आहे. या शिवाय राशिया व फ्रांस यांच्या फौजेंत ही मुसलमानांची संख्या आहे हिंदुस्थानचे अनेक मुसलमान संस्थानिक, अल्बानियाचा एसद पादशहा, कोवीटचे शेख, व हिंदी सैनिकांत ही पुष्कळ मुसलमान आहेत आणि हे सगळे दोस्त राष्ट्रांच्या बाजूनें लढत आहेत. तुर्कस्थान लढाईत पडला तो धर्मरक्षणासाठीं नव्हे, तर जर्मनलोकांच्या गोडगोड थापांना भुलून व त्यांच्या चिथावणीला फसून पडला आहे. तुर्कस्थानला त्याबद्दलचें प्रायश्चित आतांपर्यंत कांहीं थोडें भोगावें लागलें नाहीं. त्याचे सहस्त्रावधि सैनिक निष्कारण मारले गेले, त्यांचीं बायकापोरें उघडीं पडलीं, लढाऊ जहाजांचा नाश झाला, ईजित सारखा मोठा देश हातचा गेला, सायप्रेस बेटावरचा ताबा सोडावा लागला, व इराक, अर्जरूम आणि आर्मेनियाचा कांहीं भाग यांना मुकावें लागलें. इतकें नुकसान खातीं झालें, याच्या इतकें नव्हे, तरी या मानानें कांहीं थोडा तरी लाभ जमेच्या खात्यास दाखवितां येईल काय? या प्रश्नाचें उत्तर नकारार्थींच देणें भाग आहे. आपण मुसलमानांचे धर्मगुरू आहों, तेव्हां आपण जर्मनीला मिळतांच आपल्या मागोमाग जगांतले सगळे मुसलमान धावत येतील अशी तुर्कांची कल्पना असल्यास ती खोटी ठरली आहे. दार्देनेल्सचें द्वार बंद झाल्यामुळें तुर्कस्थानला दाक्षिण राशियांत दारूगोळा पाठवितां येणें अशक्य झालें. जर्मनीचा कावा तुर्कस्थानला समजला असल्यास तो फार उशीरा समजला असें ह्मटलें पाहिजे. बाल्कनमध्यें कारस्थानें उपस्थित करण्याचे कामीं जर्मनीनें तुर्कस्थानचा उपयोग करून घेतला. इसापनीतींतल्या माकडाच्या गोष्टीतल्या प्रमाणें तुर्कस्थान जर्मन माकडाच्या हातांतलें बाहुलें मात्र होऊन राहिला आहे. तेव्हां त्याचीं बोटें भाजण्यापलीकडे तुर्कस्थानचा कांहीं फायदा होईल हें शक्य नाहीं. फार झालें तर तुर्कस्थानचा सुलतान जर्मन बादशहाचा मांडलिक होऊन राहील. तुर्कस्थानपेक्षां इराणच्या मुसलमान मुत्सयांनीं ज्यास्त शहाणपणा दाखविला यांत शंका नाहीं. त्यांनीं राशियन सैन्याचें साह्य घेऊन जर्मन लोकांना आपल्या राज्यांतून पिटाळून लाविलें. अफगाणिस्थानच्या मुसलमानांस दोस्त राष्ट्रांच्या विरुद्ध चिथावण्याचा यत्न जर्मनीनें करून पाहिला; पण त्यांत ही त्यांना अपयशच आलें. कारण कीं तेथील अमीर खंबीर आहे. त्यानें आपली तटस्थ वृत्ति सोडली नाहीं. सारांश काय कीं मुसल्मान लोक जरी अशिक्षित वाटतात तरी त्यांना सुद्धां आपलें हित कशांत आहे व जर्मन लोकांच्या मोहपाशांत सापडल्यापासून कसें नुकसान आहे याचें चांगलें ज्ञान आहे तितकें ही ज्ञान युरोपांत स्वतंत्रपणें राज्य करणाऱ्या तुर्की मुत्सयांना नाहीं हें पाहून आश्चर्य वाटतें. एका आफ्रिडी सरदारानें या बाबतींत थोडक्यांत सद्यःस्थितीचें जें वर्णन केलें तें यथार्थ आहे. तो ह्मणतो कीं जर्मन लोक हातांत केरोसीनचा डबा घेऊन तें तेल चोहोंकडे फेकीत नाणाऱ्या व आग लावीत सुटलेल्या वेड्या सारखे माकड चेष्टा करीत फिरत आहेत. पण त्यांनीं स्वतः लावलेल्या आगीच्या ठिणग्या त्यांच्याच हातांतल्या केरोसीन तेलाच्या डब्यावर पडून केव्हां फडका होईल याचा नेम नाहीं. तो योग फारसा दूर नाहीं. असें सद्यःस्थितीवरून ह्मणण्यास हरकत दिसत नाहीं.

## हिंदी स्वराज्याची योजना

हिंदुस्थानांत सध्यां स्वराज्याची मागणी करणारांचा वर्ग बराच मोठा आहे हें पाहून सर्वांना पटेल अशा स्वराज्याची योजना तयार करण्याकरितां गेल्या दिसेंबरांत कांग्रेसचे वेळीं एक कमिटी नेमण्यांत आली होती. या कमिटीनें एक स्वराज्याची योजना तयार केली आहे. ती येणें प्रमाणें आहे. प्रांतिक कायदेकौंसिलांचा विस्तार करावा, व त्यांत कौंसिलराची चार पंचमांश संख्या लोकनियुक्त असावी. बाकीच्या एक पंचमांश सरकारी अधिकारी व सरकार नियुक्त मेंबर असावेत. चारपंचमांश लोकनियुक्त सभासदांत प्रत्यक जिल्ह्यानें दोन दोन याप्रमाणें निवडून दिलेले सभासद मुख्य राजधानीच्या ठिकाणच्या म्युनिसिपालिटीनें निवडलेले दोन सभासद, व त्या शहरा तर्फेचे ३ सभासद असावे. बाकीच्या शहरांना १ लक्ष लोकसंख्येस १ याप्रमाणें प्रतिनिधि निवडण्याचा हक्क असावा. मुसलमानांचे स्वतंत्र मतदार मंडळ तूर्त राहू देण्यास हरकत नाहीं. कौंसिलांत गव्हर्नर सुद्धां ४ हून कमी नाहीं व ६ हून ज्यास्त नाहीं इतके सरकारी सभासद असावे यांत पुनः निदान निमे तरी हिंदी गृहस्थ असावेत, वगैरे वगैरे कलमें आहेत ता. २२ रोजीं अलाहाबाद येथें या व इतर योजनाचा विचार करण्यासाठीं ऑल इंडीया कमिटीची सभा भरली होती पण या कमिटींत काय ठरलें तें योग्य वेळींच बाहेर येईल.

## राष्ट्रजीव

### (क्षात्रतेज व वाणिज्य यांच्यांवर वाढलेला)

रावणानें पंचमहाभूतें आपल्या ताब्यांत आणिलीं आणि सर्व पृथ्वी थरारून सोडली त्या प्रमाणें जर्मनीनें आपला शास्त्रीय शोधांचा हत्ती सर्वत्र फिरविला आणि या महायुद्धांत प्राणहानी बरेंबरच जगाला चकविणारे शस्त्रास्त्र विद्येचे प्रयोग दाखविले. या महायुद्धांत रक्ताचे प्रवाह वाहत आहेत. तरी देखील त्या पेक्षां राष्ट्रांला अधीक घातुक असा जर्मनीचा व्यापार आहे. जर्मनीच्या व्यापाराचें साम्राज्य इतर राष्ट्रांचे पंचप्राण अगदीं लयास नेण्याला फार भक्कम आहे. हल्लीं क्षात्रतेजच लढत आहे असा भास होतो पण त्यापेक्षां जर्मनीच्या वाणीज्यानें जो राष्ट्रांचा लय आरंभला आहे तो फार दांडगा आहे. सर्प जसा दंतविहिन व मणिहीन व्हावा त्या प्रमाणें राष्ट्रांचे वाणिज्य दुसऱ्या राष्ट्रानें हिरावून घेतलें ह्मणजे तें राष्ट्र प्राणविहिन निर्माल्य होत जातें. या महायुद्धानें अर्थशास्त्राचे सिद्धान्त सगळे हालवून सोडले आहेत आणि अप्रतिबंध व्यापार सर्व गुंडाळून ठेवण्यांत आले आहेत. वाणिज्याच्या साम्राज्याला धुळींत पोचविण्याचा व्यापारी संग्राम या महायुद्धा बरोबरच आतां उद्भूत झाला आहे. इंडियाकडे पाहतां हत्याराच्या कायद्यानें क्षात्रतेज लयास नेलें आणि अप्रतिबंध व्यापारानें वणिक्समृद्धि न्हासास गेली हें हें महायुद्ध इतर राष्ट्राकडे बोट करून सप्रमाण सांगत आहे. ब्रिटिश साम्राज्यानें एका जिव्हाळ्याच्या गोष्टी केल्या पाहिजेत आणि महाराणीच्या जाहिरनाम्याप्रमाणें आपपर भेद मोडून टाकले पाहिजेत. इंडिया राष्ट्र अजून जीवंत आहे खरें पण वरील क्षात्रतेज व वणिक्तेज नष्ट करणारे क्षयरोग सरकारी जालिम सोमवल्लीनें मारले पाहिजेत. आणि तेव्हांच इंडिया साम्राज्याचें वैभवरत्नच न रहतां जीवंत मुख्यांग ह्मणून बनेल.

## विद्या प्रार्थना.

सर रविंद्रनाथ टागोर हे आमच्या राष्ट्रालाच काय सर्व विद्याभिलाषी खंडांना देखील परम प्रिय व पूज्य वाटतात. अमेरिकेंतील युनायटेड स्टेट सारख्या विद्येमधील अग्रेसर रायांनीं त्यांस तत्वज्ञानावर अठरा व्याख्यानें देण्यासाठीं विनंती करून ४२००० रुपये त्यांच्या आदरसत्कारास दक्षणा ह्मणून देण्याचा संकल्प केला. पण या गोष्टीला सर रविंद्रनाथ यांनीं पुष्कळशा कारणामुळें प्रथम त्यास रुकार देण्याची सवड नव्हती व विद्येची खरी तृष्णा तीव्र असल्यामुळें पुन्हा तशीच विनंती करण्यांत आली आणि या वेळीं त्यांनीं आपली मान्यता दर्शविली आहे. विद्या विश्वबंधुत्व कशी जागृत करते याला ही गोष्ट उत्तम दाखला होय. त्याशिवाय वृक्ष जसा फुलण्याला व त्याला फळें येण्याला कांहीं काल लागतो तसाच काल सर रविंद्रनाथ यांचें विद्यातेज दिगंत प्रसृत होण्यास काल लागला प्रो. जोतिषचंद्र व सर रविंद्रनाथ यांची खरी किंमत आमच्या सरकारास अद्यापही कळून येण्याचा समय थोडा दूरवरच दिसतो. आणि यांच्या सारखीं दुसरीं रत्नें विद्येनें संपन्न असूनही त्याचा योग्य परामर्श घेण्या इतका राजाश्रय डोळस झालेला नाहीं.

## वऱ्हाडवृत्त

**हवामानः—** वाऱ्याचा सोसाटा, ढगांची पळापळ व विजेची चमक यांनीं या अंधाऱ्या रात्रीं मोठीच गर्दी दोनतीनदां उसळून दिली. मातीच्या बारीक कणांचा वर्षावच वारा करित आहे असा प्रकार गेल्या शुक्रवारीं घडला तर आदले रात्रीं वारा इतका कढत सुटे कीं अंगाला उन्हाची झळ लागत आहे असें वाटे. वारा ११० अंशावर चढतो. उन्हाळ्याची दुखणी बळावलीं पण वाऱ्याचा रोग हटला आहे हें दुःखांत सुख होय.

रा. रा. ई. ड्यांकस. आय. सि. एस्. डे. कमिशनर यांस गेल्या शुक्रवार पासून सहा महिन्याची रजा देण्यांत आली आहे

रा. रा. सी. ब्रौन आय्. सि. एस. सब डिव्हिजनल आफिसर वाशीम यास उमरावतीस डे. कमिशनर नेमण्यांत आलें.

रा. रा रिचर्डसन आय. सी एस. असि. कमिशनर उमरावती यास वाशिमास सब. डिव्हिजनल आफिसर नेमलें.

रा. रा. डि. जी आर्चर्ड डि. सु ऑफ पोलीस आकोला यास येत्या १९ तारखेपासून सहा आठवड्याची रजा देण्यांत आली असून त्यांचे जागीं रा. रा. एफ. बी. सेव्हेल असि. सु. पोलीस यांस नेमलें.


## नोटीस

या नोटिशीनें सर्वत्रांस जाहीर करण्यांत येते कीं, म्यु. कमेटीचे हद्दींत कोणीही आपलीं डुकरें मोकळीं सोडूं नयेत. परंतु तीं त्यानें बांधून ठेवावीं. येणें करून लोकांस त्रास होणार नाहीं. जो कोणी कमेटीच्या हुकूमाविरुद्ध वर्तन करील त्याजवर वऱ्हाड म्यु. कायद्याच्या १२६ कलमा प्रमाणें मुकदमा केला जाईल. कळावें. ता. ३०-४-१९१६

सही

A. S. Khan

Vice Chairman

Municipal Cumuttee

नो. नं. १६०

## नोटीस

शेख गबजु वा॥ शेख तोलु रा० ताजनापेट ता० आकोला

यांसः—

खाली सही करणार ईजकडून नोटीस देण्यांत येतें कीं अज्ञान शेख नबु वा॥ शेख आमद जमादार हा माझा पुतण्या असोन पालन करण्याचा हक्क माझा आहे असें असून तुह्मी मुलास आपले पाशी ठेऊन त्याच्या मिळकतीची अफरा तफरी करूं पहतां आणि करिता असें ह्मणण्यास हल्ली जें कृत्य करण्याचें तुह्मी आरंभिले आहे त्याजवरून ह्मणण्यास मजला कोणत्याच प्रकारची हरकत वाटत नाहीं. हिंदुस धर्म शास्त्र आणि आपल्यास शकाया विरुद्ध वागण्यास मार्ग नाहीं परंतु तुह्मी तर शकाविरुद्ध काम करण्याचें धाडस शुरू केले आहे माझे ऐकण्यात आले आहे कीं अज्ञानाचे लग्न करण्याचे ज्याचे तुह्मी योजिले आहे. हा आधिकार तुमचा नसोन तुह्मी माझ्या वंशापैकी ही नाहींत असें असतां या कामांत कायदेशीर आणि धर्म रित्या आधिकारी नसून अनाधिकारीपणाचें काम करून अज्ञानाच्या नुकसानीस कारण होता हे [illegible]वर नाहीं या साठीं नोटीशीनें कळ[illegible] कीं तुह्मी अज्ञानाचे लग्न करूं नये. केल्यास दिवाणी कोर्टा मार्फत तो विवाह रद्द केला जाईल आणि मुलास माझे पाशी पाठऊन द्यावें. न पाठवाल अगर त्याच्या मिळकतीची अफरा तफरी कराल तर कायदेशीर रितीनी ज्या गुन्ह्यास पात्र ठराल त्या प्रमाणें व्यवस्था करण्यांत येईल, कायतो जबाब नोटीस पावल्याचे चार दिवसाचे आंत द्यावा. ता. २९ ४। १६ इ. दस्तुर गोविंद बापूजी पि. ता. आकोला

सही

हजानी अमीरबी मर्द हाजी

शेखलाल निशाणी डावेहातचा

नो. नं. १६१ अंगठा.

## नोटीस

नोटीस बेशमी दत्तु वा भिवाजी माळी चोपडे व फत्तु वा विठोबा कुणबी अहीर उभयता रा० नांदूरा बुा ता० मलकापूर जि० बुलडाणा यांसः—

नोटीस देणार सुंदराबाई नवरे बन्नूलाल अगरवाले रा० पंचगव्हाण ता० आकोट जि० आकोला नोटीस देण्यांत येते कीं माझी मौजे उदेपूर प्र० निमगांव येथील २ शेते सर्वे नं. २ व ७८ ची शेते तुह्मांस बटाईनें पांच वर्षां करितां दिले होतें त्यांत सुमारें सन १३२९ चे पहिले पिकाचे निमे मालाचा हिशेब तुह्मी आजतारखेपर्यंत दिला नाहीं. तुह्मांस हिशेबाची मागणी चार पांच वेळां केली असतां आपण सांगत अहा कीं सर्व मालाचा निकाल झाल्यावर हिशेब देऊं त्यांत तारीख २९-१-१६ इ. रोजीं तुमचे कडून गणपत मारोती माळी बगाडे यांनीं आह्मांस आपली कांहीं ह्मणजे माल अफरातफर करण्याची कारवाई दिसली त्यावरून त्यानीं चिठ्ठी ४८१ रुपयाची लिहून दिली तरी तुह्मी आजपावेतों कोणतेंच प्रकारे निकाल केला नाहीं. व सर्व मालाची अफरातफर केली तरी वरील कारणामुळें सदहु शेते ८ आठ दिवसाचे आंत खाली करून द्यावें व आमच्या शेतांतील निम्मे मालाचा हिशेब करून रुपयांची आदाई करावी न केल्यास बटाईखताचा हक्क रद्द असे व आमचे हिशेबानें जी रक्कम निघेल ती व वरील रुपये कोर्ट मार्फत खर्चासुद्धां घेतले जातील ही नोटीस दिली कळावें ता० २४-४-१६

सही

सुंदराबाई नवरे बन्नुलाल तर्फे
मुखत्यार बन्नुलाल जयकीसनलाल

नो. नं १९७ अगरवाले दस्तुर खुद्द

## धंदे शिक्षक.

ह्मणजेच इंडस्ट्रियल इंस्ट्रक्टर. यांत श्रीमंतापासून गरिबापर्यंत नित्य व्यवहारांत लागणारे अनेक सर्वोपयोगी जिन्नस घरच्या घरीं तयार करून अल्प श्रमांत व थोड्या भांडवलांत ५-१० रुपये रोज प्राप्ति करून घेता येण्याजोगीं मराठींत आजपर्यंत प्रसिद्ध न झालेलीं केला- हुन्नरांची गुप्त व खरी माहिती देणारा धंदे–शिक्षक आजच मागवून पैसा मिळवा ! उद्योगी व्हा !! किंमत ८८ व्ही पी. नें ८१० आणें खास यादी फुकट.

ज्ञानमित्रकर्ते, शनवार पेठ; पुणें सिटी.

नो. नं. १९८

## नोटीस

रा. रा. हेमराज ग्यानचंद मारवाडी साहू दुकान लोनाग्र तालुका व जिल्हा आकोला

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं, मौजे हातरूण येथील कान्हेरकारवाले शेताचे स्वामीत्वाचे रुपये ३०० अक्षरी तिनशे तुह्मास द्यावयाचे त्यापैकीं शंभर १०० रुपये ता० ६-२-१६ इ. रोजीं तुमचे पश्चात तुमचे मामाला दिलेबद्दल त्यांचे सहीची पावती माझे जवळ आहे बाकी राहिलेले दोनशे २०० रुपये तीन चार वेळां तुमचेकडेस घेऊन आलो असतांना तुह्मी घेतले नाहींत तुमचा माझा वेवहार असल्यामुळें तुमचा इरादा मला बुडविण्याचा दिसतो. सदहु दोनशे रुपये शेट सावतराम रामप्रसाद साहू दुकान आकोला यांचे दुकानी तुह्मास देण्यासाठीं ठेविले आहेत तरी तुह्मी ८ आठ दिवसाचे आंत वरील दुकाना वरून पैसे घेऊन जावे. व तुमचे सहीची पावती द्यावी असें न केल्यास त्या रकमेवरील व्याजाचा बोजा मजवर नाहीं. कळावें ता० २७-४ १६

सही

बापु माधोजी ढोरे रा. खांबोर

नो. नं. १९९ नि० खुद्द आंगठा


ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

### मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नमेह व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता इडकं गर्मीचे मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व अन्न भरपूर पचूं लागतें. त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल. दर एकदम ३९ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६१ गो० ४ रु० २७१ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. अपूर्व नेत्रांजन—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. परम्यावर अपूर्व मिश्रण—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह. तिडीक, मुत्रांतील लाळा, सर्कांच, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसतां सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकेत जाते. असें रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १॥ भार २ रु० सर्व औषध व्ही० नें पाठवूं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत. यशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, प्रथोक्त रसायनें, भस्में, पाक, गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ताः—मु० मुर्डी, पो० हर्णै, जिल्हा रत्नागिरी. } कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

ना० नं० २०



## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY.

### FUNDS almost 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

*Claims paid* 4½ CRORES

### A Decennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. |
|---|---|---|
| 1884 | 4.823 | 1,59,25,200 |
| 1894 | 20,110 | 5 26,08,850 |
| 1904 | 43,356 | 8 88,02,223 |
| 1914 | 65,269 | 12,37,10,910 |

| Year. | Total Income. | Total Assets. |
|---|---|---|
| 1884 | 6,77,552 | 14,41,429 |
| 1894 | 4259,,607 | 94,49,971 |
| 1904 | 43,64,808 | 2.47,18,8 |
| 1914 | . 72,46,0 | 4,96,8650 |

### SPECIAL FEATURES.

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after providing for the Reserve fund
divided among the Policyholders every 3 years.
Native Lives are accepted at the same rates as Europeans
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

***Influential andactive agents wantedTerms liberal***

:0

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

R. Paterson Brown
Manager

*A. C. Lal,*
Branch Secratary
*C. P. Berar & Khandesh*
Nagpur.

N. N. 22


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला--सोमवार तारीख ८ माहे मे सन १९१६ ई० [ अंक १८

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........२ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नेरमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला २।९।०९ } S. Clements, एजंट

नं १

## अस्सल अंगुरी.

# हिंग

केवळ एक आणा तो. पवित्र केशर १॥ तो. शुद्ध शिलाजीत. -॥- तो. खालिस कस्तुरी रु. २९ तो. विकेती ममीरा रु. ३ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं. ९

नो० नं० २

### हिंदुस्थानावर अरिष्ट

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें मज्जतंतु, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व शरीराचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार नाखडतोब दूर होतात. किं रु. १८८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुनली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

# चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

**हिंदुस्थानांत मराठी भाषेंत असें हें पहिलेंच. स्वस्त आणि उपयुक्त मासिक पुस्तक.**

सुरू झालें. वा. व. ८९ ] **पूर्णानंद** [ सुरू झालें. ट. ख. ८३

लहान मोठ्या सर्व स्त्री पुरुषांच्या चित्ताचें सारखेंच आकर्षण करणारें व अनेक विषयांचा उहापोह करणारें अगदीं नवीन तऱ्हेचें अत्यंत मनोरंजक पूर्णानंद मासिक पुस्तक फेब्रुवारी महिन्यापासून सुरू झालें. यांत चटकदार गोष्टी, हास्यकारक चुटके कविता, कादंबऱ्या वगैरे मनोरंजक लेख येत. शिवाय प्रसिद्ध विद्वानांच्या लेखांचा व विविध ज्ञानाचा संग्रह यांत केला जात आहे. सारांश फक्त पांच आण्यांत वाचकाला जेवढा लाभ करून देणें शक्य तेवढा किंबहुना जास्त देण्याचा प्रयत्न केला आहे. लढाईमुळें चालूं परिस्थिति सर्व बाजूंनीं बिकट व खर्चिक झाली आहे. तरी पण या मासिकाची वार्षिक वर्गणी फक्त ।– ( व्ही. पी. पोस्टेजसह ॥= ) ठेविली आहे. नमुन्याचा अंक दीड आण्याचीं तिकिटें पाठवून मागवा.

बळवंत रामचंद्र सोहनी,
पूर्णानंद–कार्यालय,
खडेबाजार–बेळगांव.

नो. नं. १३२

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः– गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दस्तास्तीचे, वकील पत्रांचे, पस्त भरयाचे, क्लिर्डफार्म पत्र्यांचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जांचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

### श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसूत्र माळ, ठुशा, जोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळी टीका, मुदा, अग्रफुलें साखळ्या व बागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल–तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, ताटें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कामिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं. चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया अगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय–कोल्हापूर

नो नं ६

# कौतुकरत्नाकर

**छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह पृष्ठसंख्या ६००; विषय १०० वर आवृत्ती ९ वी. प्र. २००००,**

बंगाल्यांतील कामरूपदेशी ही विद्या फार प्रबल असून तिकडील जटेली, लंगोटे, छा छु करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवुन सिद्धनागार्जुन मंत्र महोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केलेला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुगाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम प्रहादिकांचें वर्णन भानुमती यंत्र वशीकरणशास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण, मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मेरिझम प्रयोगविधि वगैरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया.

# कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रही ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको. किंमत १. रुपया ट. ख. ३ आणे

पत्ता:— गंगाधर आर. आणि कंपनी.
हार्नबी रोड बिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ७

# विद्यामंदिर वाकररोड नागपुर.

## येथें मिळणारीं पुस्तकें.

DR. SHRIDHAR V. KETKAR'S INDIAN ECONOMICS
Re 1-8-0 per V. P. Rs. 1-11-0.

Good opinions are passed by the TIMES ( London ) the EMPIRE ( Calcutta ) the MODERN REVIEW ( Calcutta ) the HINDUSTAN REVIEW ( Allahabad ) Strong condemnation by the PIONEER ( Allahabad ) Chapters I what is Indian Economics ( ii ) social conditions and Economics condition ( iii ) Indian Economics and Indian Pagcholoky. ( iv ) Political conditions and Economics condition, ( v ) Language Policy and Economics, ( vi ) Economic evolution and layers of cicilization ( vii ) Communal Economics and distributive Economics ( viii ) Future out look.

२ **संकीर्ण लेखः**—डा० केतकर यांचे किंमत १ रु. ४ आणे. व्ही. पीनें १ रु. ७ आणे. यात पुस्तकांत खालील लेख आलेले आहेत.

(१) जातिभेद आणि त्या संबंधाचें राष्ट्रीय धोरण
(२) या विषयावर झालेला वादविवाद
(३) समाजाचें धर्म नियमन आणि तें करणारा वर्ग
(४) धर्मनियमन आणि ब्राह्मणांची परंपरागत विद्या
(५) समाजशास्त्र आणि धर्मशास्त्र यांचा परस्पर संबंध
(६) विक्रीचें अर्थशास्त्र आणि यंत्रशास्त्र
(७) नगर संवर्धन आणि नगर सौंदर्य
(८) मध्यप्रांतीयास संदेश
(९) प्रतिनिधीचीं कर्तव्यें
(१०) पोलिटिकल क्लब कसा करावा.

या पुस्तका संबंधानें २७ जुल १९१५ च्या अंकांत केसरीकार म्हणतातः—

"डा० केतकर हे खंदे लेखक असून महाराष्ट्रांत निघणारीं बहुतेक प्रसिद्ध वर्तमानपत्रें आणि मासिकें यांतून यांचे लेख प्रसिद्ध होत असल्यामुळें, ते महाराष्ट्रीय वाचकांच्या आंत्यंत परिचयाचे झाले आहेत. इकडे तिकडे विखुरलेलीं रत्नें पहाण्यांत मौज नसून त्यांचा हार करून पहाण्यांतच जसा खरा आनंद आहे, त्याचप्रमाणे लेखकांच्या विचाराचा पूर्ण परिचय होऊन विचारांना चालन मिळण्यास नियत कालिकांतून निरनिराळ्या वेळीं प्रसिद्ध झालेल्या लेखांपेक्षां संकीर्ण रूपानें प्रसिद्ध झालेल्या लेखांचाच फार उपयोग होतो. जगांत विषय कांहीं नवीन नसतात, पण तेच विषय नवीन पद्धतीनें आणि त्यांत नवीन विचार सरणीची भर घालून लोकांपुढें आले म्हणजे समाजाच्या मनाची खळबळ उडवून देण्यास कारणीभूत होतात. डा० केतकर हे निर्भीड लेखक असून एखाद्या सन्मान्य गृहस्थावर अगर संस्थेवर तुटून पडतात हें खरें आहे, तथापि एखाद्या विषयावर जेव्हां ते आपलें मत देतात, तेव्हां प्रथम जरी त्यांचें तें मत लोकांना विलक्षण वाटलें तरी तें प्रमाणबद्ध रीतीनें मांडलेलें असल्यामुळें विचारांना बोरचें चालन मिळण्यास कारणीभूत होतें यांत शंका नाहीं.

३ **उत्तर अमेरिकेंतील वसंत काल** 'एक साकी वृत्तात्मक काव्य, गोविंद पैत्र कचें. "धाडशी मन मोकळेपणा हाच या काव्याचा मोहक काव्यगुण आहे ( महाराष्ट्र ) त ४ आणे.

पत्रव्यवहार व्यवस्थापक विद्यामंदिर
वाकररोड या पत्त्यावर करावा.

नो. नं. ११८

## NOTICE

The Treasury officer is now prepared to issue and encash Universal Currency Notes and Home Notes ( Bombay Circle ) of other denominations for the public on demand as far as possible

Endeavours will be made as far as possible in all trnsactions to meet the equirements of the payee as to the form of currency in which he desires to take payment.

The above orders do not yet apply to the Treasuries at Nagpur, Akola and Amraoti where Government treasury work is done by branches of Presidency Banks. As soon as arrangements are completed with the Banks concerned, a further notice will be issued giving the date from which free encashment of currency notes at these centres will be available.

# धंदे शिक्षक.

म्हणजेच इंडस्ट्रियल इंस्ट्रक्टर. यांत श्रीमंतापासून गरिबापर्यंत नित्य व्यवहारांत लागणारे अनेक सर्वोपयोगी जिन्नस घरच्या घरीं तयार करून अल्प श्रमांत व थोड्या भांडवलांत ५-१० रुपये रोज प्राप्ति करून घेता येण्याजोगा ... आजपर्यंत प्रसिद्ध न झालेली केवळ हुन्नरांची गुप्त व खरी माहिती देणारा धंदे-शिक्षक आजच मागवून पैसा मिळवा! उद्योगी व्हा!! किंमत ८८ व्ही पी. नें ८१० आणें खास यादी फुकट.

ज्ञानमित्रकर्ते, शनवार पेठ; पुणें सिटी.

नो. नं. १५८

## नोटीस

खालीं सही करणार नोटीस देतो कीं, आमचे वडीलोपार्जित घर एक कसबे पेरंडोल येथील त्याच्या भाऊ हिश्याच्या वाटण्या होणें आहे. आमचे मातोश्रींचा अन्नवस्त्राचा व आम्ही आजपर्यंत आमचा भाऊ दत्तात्रय विठ्ठल पाठक याचे प्रित्यर्थ खर्च केलेल्या रकमेचा वगैरे बोजा सदर्हू घराचे किंमतीतूनच वसूल होणें आहे. सबब कोणीही दत्तात्रय विठ्ठल पाठक याशी कोणताही व्यवहार करूं नये. केल्यास आम्ही त्याबद्दल जबाबदार नाहीं कळावें तारीख १-५-१६

सही
बाळकृष्ण विठ्ठल पाठक

नो. नं. १६३

## नोटीस

नोटीस जयाजी वा हानगुजी कुणबी अडनांव चारखेड रा० मौजे धानोर खुर्द प्रा॥ व ता॥ मंगरूळपीर जि. आकोला

यांस—

नोटीस देणार गंगु मर्द जयाजी कुणबी चारखेड रा. मौजे धानोर खुर्द हल्लीं रा. मौजे कासाळे प्रा॥ व तालुके मंगरूळपीर जि० आकोला इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको आहे. लग्न होण्यास सुमारें १८ वर्षें झालीं आहेत. लग्न झाल्यावर फक्त १-२ वेळां मजला आपले घरीं घेऊन गेले. पुढें मी आपले वयात येऊन शहाणी झाली तेव्हां पासून तुम्ही आपले घरीं मजला घेऊन गेले नाहीं. सुमारें १५ वर्षां पासून मी आपले आई बापाचे घरीं रहात आहे मी तुमचे घरीं राहून तुमचा संसार करण्यास राजी असतां तुम्ही मजला घेऊन गेले नाहीं व मजला वागवीत नाहीं. तुम्ही दुसरी गंधर्वाची बायको करून आपला संसार करित आहांत त्यामुळें माझा जन्म व्यर्थ चालला आहे. संसार सुखाचा अनुभव मजला कांहीं नाहीं मी ८ वर्षांपासून आपले आई बापाचे शेजारी निराळें घर करून रहात आहे व लोकांचे कर्ज करून मी आपला निर्वाह करीत आहे. तुम्ही मजला वागवीत नसलेमुळें माझा भाऊ नामे सीवजी हा तुमचे घरीं पुष्कळवेळां पंच घेऊन आला. आणि मजला वागवावें नाहीं पेक्षां फारकत द्यावी असे म्हटले असता तुम्ही दोन्ही गोष्टींस इनकार करितां यास्तव तुम्हांस मी अशी नोटीस देते का माझे खाणें संबंधानें मजवर झालेलें लोकांचें कर्ज रुपये ४०० चारशे तुम्ही देउन मजला घेऊन जावे. मी वागण्यास तयार आहे. तुम्हास नोटीस पावल्यापासून पंधरा १५ दिवसांत घेऊन जाणार नाहीं तर रीतीप्रमाणें खावटी खर्चा बद्दल अगर फारकत मागणेबद्दल योग्य कोर्टात दावा केला जाईल कळावें तारीख २६ माहे एप्रिल सन १९१६ इ. द. जयवंत रामराव मंगरूळपीर

सही
निशाणी खुद्द बांगडी गंगु मर्द
जयाजी चारखेड

नो. नं. १६४

## नोटीस

मेहेरबान मोहोसन अल्ली वल्द तयब अल्ली बोहरी रा. आकोला

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, अंदाजा १॥ महिन्यापूर्वी तुमचा व आमचा आमचीं आकोला पेठेंतील ३ दुकानें पोलीस चावडी समोरील विकण्याचा ठराव झाला. किंमत ५५०० रुपये ठरली होती व त्यापैकीं १०० रुपये बयान्याचे घेऊन तुम्हास पावती ही दिली आहे तुमचे आमचे ठरल्याप्रमाणें मयत उमरावबेगमचे सर्व वारसदार म्हणजे मी, माझा बाप व ४ बहिणी या सर्वांचे नांवानीं खरेदीखत करून द्यावयाचे होते. वरील ठरावान्वयें तुमचे खर्चानी तुम्ही मला माझे नांवचे श्टांप कागद रुपये ५५ चे विकत घेण्यास लावलें व पुढें एक श्टांप खराब झाला अशी सबब सांगून पुनः दुसरा १५ रुपयाचा श्टांप विकत घेवविला. मी व माझे बरोबर सर्व वारसदार लोक तुम्हांस खरेदीखत करून देण्यास तयार आहोत पण तुम्ही टाळाटाळी करितां. खरेदीखत करून घेऊन पैसे देत नाहीं किंवा सवदा सोडला हा शेरा मारून पावती ही परत करित नाहीं. तुमचे या वर्तनानें आमची फार नुकसान होण्याचा संभव आहे. करितां या नोटिशीनें कळवितो कीं तुम्ही सोमवार ता० ८-५-१६ रोजीं सकाळीं सर्व कागद पत्र व लिहिणारा मनुष्य घेऊन आमचे वकील मि. नारायण खंडेराव फडके यांचे ऑफिसांत यावे म्हणजे मी तुम्हास ठरल्याप्रमाणें खरेदीखत करून देतो व त्यावर आमचे वडील व चारी बहिणीच्या सह्या घेऊन तुमचे स्वाधीन करितों. लहान्या तीन बहिणी अज्ञान आहेत तरी तुमचे आमचे मध्यें ठरल्याप्रमाणें मी व आमचे वडील यापैकीं जो तुम्हांस योग्य वाटेल त्यास पालनकार लावण्याची तजवीज होईल. वरील प्रमाणें आपण वर्तन न केलें तर मी वरील तिन्ही दुकानें दुसऱ्यास विकून टाकीन व माझी जी नुकसान होईल ती तुम्हापासून कोर्ट मार्फत भरून घेईन कळावे तारीख ३।५।१६ इ मु० आकोला

सही इंग्रजींत
Md. Sirajuddin wald Molvi Mohmed
Abdul kader
नो. नं. १६८

## जाहीर नोटीस

नेमिचंद धीवरचंद जैन क्षत्रिय रा. तन्हाळे ता. मंगरूळपीर

यांचेकडून:—

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, दत्तात्रय सिताराम ब्राह्मण रा. कडा जि. अहमदनगर यांस मी व माझा मयत बाप धीवरचंद बचराम यांनीं ता. २८-३-१९१४ रोजीं कुलमुखत्यारपत्र लिहून दिलें होतें. धीवरचंद मयत झाल्यामुळें त्यांचे मुखत्यारपत्र सहाजिकच रद्द झाले व सदर्हू दत्तात्रय

सिताराम हा माझी नौकरी सुमारे १० महिन्यापूर्वी सोडून गेल्यामुळें मी त्यांस दिलेल मुखत्यारपत्र ही त्याच वेळेपासून मी रद्द केलेलें आहे. सदर्हू दत्तात्रय सिताराम हा अलिकडे ८-१० दिवसापासून तऱ्हाळे व त्याचे आसपासचीं खेडीं येथें फिरून मी नेमिचंद घेवरचंद यांचा मुखत्यार आहे असें खोटेंच पसरवितो व त्यामुळें आमचे आसामी वाहितदार व इतर साहू सावकार लोक हे फसण्याचा संभव आहे. सबब या नोटिशीनें जाहीर करण्यांत येते कीं, सदर्हू दत्तात्रय सिताराम याचें मुखत्यारपत्र आम्ही रद्द केलें असून त्याचा व आमचा कांहीं संबंध नाहीं. आमचे तर्फे त्यानें यापुढें कांहीं व्यवहार केल्यास अगर गेल्या १० महिन्यांत केले असल्यास ते सर्व रद्द आहेत. व त्यांच्या योगानें आम्ही बांधले जाणार नाहीं. कळावें ता. ३-५-१६

सही

नेमिचंद घेवरचंद जैन क्षात्रिय रा० तऱ्हाळा तर्फे कृष्णाव घोंडू आढे मुखत्यार

नो. नं. १६५

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं माझा धाकटा भाऊ भिवसन वा संभाजी मांग हा संतती न होतां मरण पावला. त्याची बायको नामे राधु मर्द भिवसन ही तरुण अल्लड असल्यानें व आमचा इस्टेट वाटणी गेली नसल्यानें ती फक्त अन्न वस्त्राची मालकीण आहे व तिला आम्ही अन्नवस्त्र पुरवीत आहेंतच. ती पोर-स्वभावानें व दुसऱ्याच्या शिकविण्यानें आमच्या इस्टेटींतील मौजे जनुना बुजरूक येथील

| शेत स. नं. | पो. न. | ए. गुं | आ. रु. |
| --- | --- | --- | --- |
| २९ | ० | १३५९ | ९८८ |

मौजे शहापूर बुा येथील.

| शेत स. नं. | पो. नं. | ए. गुं. | आ. रु. |
| --- | --- | --- | --- |
| २० | २ | ७८९ | २८१२ |

अशी शेतें विकील. गहाण ठेवील तर विकत घेणाराचा व गहाण ठेवणाराचा दस्तऐवज रद्द समजला जाईल. कोणी फसूं नये म्हणून ही जाहिर नोटीस दिली असे. पुढें तिनें गंधर्व केल्यास तिचा कांहींच खाण्यापिण्याचा व लत्याकपड्याचा हक्क राहणार नाहीं. कळावें तारीख ३-५-१९१६ इ.

सही

नि॥ नारायण वा संभाजी मांग जात कुणबी मुक्काम जनुनें बुा याची सुद असे

नो. नं. १६६

## नोटीस

परशराम वा नऱ्ही पाटोकार कुणबी राहणार मौजे देऊळगांव ब्राह्मणाचे तालुके बाळापूर जिल्हा आकोला

यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझे पुतणे कुकाजी वा जानजी व सुपाजी वा जानजी हे दोघे देऊळगांव येथें रहात असत. सुपाजी यांस मयत होऊन आज ९।१० वर्षें झालीं. तथापि सुपाजीची आई व अज्ञान मुलगा यशवंता वा सुपाजी हा व कुकाजी हे एकत्रच रहात असत. मागील प्लेगचे वेळीं कुकाजी व त्याची आई व अज्ञान असलेला पुतण्या हे सर्व मयत झाले. मरण समयीं मी तेथें नसल्यामुळें त्यावेळीं त्यांचे जवळ असलेली सर्व स्थावर व जंगम मिळकत खालीं दर्शविल्याप्रमाणें आपण ताब्यांत घेतली. वास्तवीक रीत्या मी व माझा मयत पुतण्या एकत्रच असल्यामुळें इस्टेटीचा वारसा अज्ञानाच्या बायकोकडे न जाता माझेकडेच येतो. आपला कोणत्याही रीतानें हक्क नाहीं. तेव्हां आपणास या नोटिसीनें कळवितों कीं सदर्हू जिनगी किंवा त्यापैकीं कांहींही कोणाकडे गहाण टाकूं नये अगर विक्री करूं नये. वी सर्व चार पंचासमक्ष आमचे ताब्यांत द्यावी. तसें न केल्यास अगर ती जिनगी कोणाकडे गहाण अगर खरेदी दिल्यास त्याजबद्दल तुह्मास जबाबदार धरले जाऊन कायद्याप्रमाणें रीतसर इलाज केले जातील. व या नोटिशीचा व पुढें होणारा खर्च सर्व तुह्मावर पडेल.

जंगम मिळकत

| | | |
| --- | --- | --- |
| दोन बैल एक काळा | | किंमत रुपये |
| धामणा व एक तांबडा | | ७५ |
| गाय एक लाल उभ्या | | किं. रु. |
| शिंगाची व कालवड लाल बहाळी | | ५० |
| दमणी १ | | २० |
| भैस १ | | २० |

चांदीसोन्याचे दागिने

| | | | |
| --- | --- | --- | --- |
| चांदीचा कडदोरा १ वजन | तोळे | ६० | ४५ |
| कडे चांदीचे | " | २० | १५ |
| पाटल्या चांदीच्या | " | १२ | ९ |
| सोन्याच्या मुडक्या (कानांतल्या ) | " | १ | ३५ |
| कानांतली बाळी सो. | मासे | ६ | १२ |

मुलीच्या आंगावरील दागीनें

| | | | |
| --- | --- | --- | --- |
| दंडवाळ्या चांदीच्या | तोळे | २० | १५ |
| गुंडबाळ्या " | " | २० | १५ |
| कडे " | " | १२ | ९ |
| हास " | " | १२ | ९ |
| बाळ्या सोन्याच्या (कानांतील ) | तोळा | १ | २५ |
| पितांबर १ | | | २५ |
| | | | ३६९ |

स्थावर मिळकत

घर वाड्याचें एक १२ खांबाचे चतुःसीमा उत्तरेस चंद्रभान बानखड्याचे घर. दाक्षिणेस किसन उतराजीचें घर. पूर्वेस ह्माल्याचें घर. पश्चिमेस वहाता रस्ता

| | |
| --- | --- |
| घरांतील सर्व भांडी कुंडीं | १०० |
| शेत १ चिंचपूरचें ८ एकर | रु. ५०० |

एकूण रुपये ९६९

सही

ह्मसाजी वा हरी राहणार तुलंगा तालुका बाळापूर निशाणी रेघ व डावे हातचा आंगठा

नो. नं. १६७

वऱ्हाडसमाचार

मिति वैशाख शु॥ ६ शके १८३८

## सद्यःस्थिति आणि वाङमय.

नुकतेच परलोकवासी झालेले मद्रासच्या 'हिंदु' पत्राचे माजी संपादक मि. जी. सुब्रह्मण्यम् आयर यांच्या विषयीं मद्रासच्या एका पत्रांत एक लहानशी गोष्ट प्रसिद्ध झाली आहे. गोष्ट लहानशीच, आणि बहुतेक वर्तमानपत्रकर्त्यांच्या आणि मासिक पुस्तकांच्या संपादकांच्या अनुभवांतलीच आहे, पण मि. सुब्रह्मण्यम् आयर यांनीं त्या गोष्टीवरून लेखकांना केलेला उपदेश सद्यःस्थितींत होतकरू लेखकांनीं ध्यानांत घेण्याजोगा असल्यामुळें त्याकडे आम्ही आमच्या वाचकांचें लक्ष वळवितों. एक होतकरू लेखक आपण केलेल्या कांहीं कविता मि. सुब्रह्मण्यम् आयर यांचेकडे घेऊन गेला, आणि त्या वाचून त्यांवर अभिप्राय देण्याविषयीं त्यानें विनंति केल्यावरून मि. आयर यांनीं त्या ठेवून घेतल्या. कांहीं दिवसांनीं कवि पुनः मि. आयर यांचेकडे गेला, आणि माझ्या कविता वाचल्या काय? त्या संबंधानें आपला अभिप्राय काय आहे? असें त्यांस विचारूं लागला. त्यावर मि. आयर यांनीं स्पष्टपणें सांगितलें कीं मला त्या कविता वाचण्यास वेळ मिळाला नाहीं, व मिळेल असें वाटत ही नाहीं. तुह्मी आपले त्या घेऊन जा. हें उत्तर ऐकून तो तरुण कवि अत्यंत निरुत्साह झाला व त्याच्या मुद्रेवर रागाची छटा दिसूं लागली. हें पाहून मि. आयर त्याला ह्मणाले, तुह्मी माझ्यावर रागावले आहां हें मला समजतें. पण मी पडलों वृद्ध, तेव्हां तुमच्या सारख्या तरुणाचा राग मी मुकाट्यानें सहन केला पाहिजे. मी कांहीं काव्यांचा रसिक किंवा मार्मिक टीकाकार नाहीं. पण माझा उपदेश ऐकाल तर कविता लिहिण्याचा नाद सोडून द्या, आणि दादाभाई नौरोजी सारख्यांनीं हिंदुस्थानाविषयीं काय लिहिलें आहे त्याचा नीट अभ्यास करा. कविता लिहावयाचीच झाली तर निदान देशी भाषेंत तरी लिहा; इंग्रजी भाषेला व वाङमयाला पुष्ट करण्याला इंग्रज लोक समर्थ आहेत. तुह्मी आपल्या देश बंधूंच्या दुःखाची माहिती करून घेऊन तन्निवारणार्थ आपल्या उत्साहाचा व्यय करावा हें मला उचित दिसतें. लोकांत व सरकारांत आपल्या कर्तव्याची व जबाबदारीची जाणीव उत्पन्न करा. आतां माझें ह्मणणें तुह्माला कडू लागेल. पण माझ्यासारखे जगाचे आघात सहन केल्यानंतर माझ्या ह्मणण्याची प्रतीती तुमच्या वृद्धावस्थेंत येईल. मि. आयर यांचा हा उपदेश होतकरू लेखकांनीं लक्षांत घेण्यासारखा आहे. हल्लीं जो उठला तो लागला काव्य करायला, अशी स्थिति झालेली आहे. संपादकांच्या केराच्या टोपलींत रोज किती काव्यें जाऊन पडत असतील यांचा नेम नाहीं. प्रसिद्ध होणाऱ्या निवडक काव्यांत ही शेंकडा ८५ अगदीं टाकाऊ असतात. असा वाङमयाच्या रसिक ज्ञात्यांचा अनुभव आहे. इतक्या कवींच्या अंगची शक्ति, उत्साह, व काव्यरचनेला लागणारा काळ यांचा निरर्थक अपव्यय होत आहे. ही स्थिति नुसत्या कवींचीच नाहीं; वाङमयाच्या इतर कित्येक शाखांतून ही हाच प्रकार आढळतो. हल्लीं अनेक माला, मासिकें, व कादंबऱ्या नाटकें निघत आहेत. हीं लिहिणारापैकीं किती जणांना खरोखर आपण काय करीत आहों याची खरीखरी कल्पना असेल तें परमेश्वर जाणे. दहा पांच नाटकें व कादंबऱ्या वाचल्या ह्मणजे आपण ही एखादें नाटक किंवा कादंबरी लिहावी अशी स्फूर्ति होते व त्या उकळी सरशीं कांहीं तरी कथानक रचून किंवा दुसऱ्याचें उसनें घेऊन त्यावर आपल्या कृतीची उभारणी करण्याची हाव सर्वत्र दिसते. पण नाटकें किंवा कादंबऱ्या यांचे उद्देश काय असले पाहिजेत, त्यांच्या रचनेचे शास्त्रबद्ध नियम काय आहेत, त्या रचनेसाठीं ज्ञानाचा किंवा अनुभवाचा साठा मनुष्य जवळ किती लागतो, व त्याचा कशा रीतीनें उपयोग केला असतां कृति सरस वठते या गोष्टीचें ज्ञान शेंकडा एकाला असेल तर शपथ! असें निरर्थक वाङमय जन्माला आल्यापासून भाषेला, ज्ञानवृद्धीला, सदभिरुचीला, किंवा देशाच्या प्रगतीला कवडीचाच फायदा घडत नाहीं. जन्मतःच दुबळीं, पाण्याचीं पितरें निर्माण होण्यापासून देशाची शक्ति जशी वाढत नाहीं, उलट अशी संतति निर्माण करणाऱ्या आईबापांच्या शक्तीचा मात्र ऱ्हास होतो, तद्वतच अशा तऱ्हेचें वाङमय देशहिताला पोषक न होतां उलट तें अपकर्षक होतें.

तर मग आपल्या देशाच्या सद्यःस्थितिला अनुरूप असें वाङमय कशा प्रकारचें हवें आहे हा प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो. या प्रश्नाचें उत्तर थोडक्यांत मि. आयर यांच्या उपदेशांत आलेलें आहे. आपल्या लोकांत कर्तव्याची जाणीव उत्पन्न होऊन त्यांचे ठायीं कर्तव्यतत्परता उत्पन्न होईल, आणि ज्या बाबतींत इतर देशांच्या मागें आपण आहों त्या बाबतींत प्रगति होण्यास ज्या वाङमयाचें साह्य होईल तें वाङमय आज अत्यंत अवश्यक आहे. असें वाङमय ह्मटलें ह्मणजे अर्थशास्त्र, समाजशास्त्र, उद्योगधंदे, कला, शास्त्रज्ञान, वगैरे संबंधाचें होय. पण असें वाङमय निर्माण करावयाचें ह्मणजे अगोदर त्या त्या विषयाची माहिती मिळविली पाहिजे. ती माहिती मिळविण्यासाठीं परिश्रम केले पाहिजेत; अनुभव मिळविला पाहिजे; व ज्ञान आणि अनुभव यांची सांगड घालून आपण लोकांस काय सांगावयाचें तें मनाशीं निश्चितपणें ठरवून मग लोकांत ग्रंथकार ह्मणून पुढें येण्याची हाव धरली पाहिजे. येवढी यातायात कोणीं करावी? श्रमावांचून फुकटाचें ग्रंथ कर्तृत्व मिळवूं पाहणाऱ्या मंडळीला मि. आयर यांचा किंवा आमचा उपदेश रुचावयाचा नाहीं. तो त्यांना क्विनाईनच्या गोळीप्रमाणें कडू लागेल. पण ग्रंथकर्तृत्वाबद्दलची कीर्ति संपादावयाची असेल तर तिची योग्य किंमत देण्यास तयार झाले पाहिजे. ही किंमत देण्यास तयार होतील त्यांचेंच ग्रंथकर्तृत्व देशहिताच्या दृ

मौल्यवान् ठरेल. नाहींपेक्षां पावसाळ्यांतल्या गांडुळाप्रमाणें अल्पायु पुस्तकांच्या राशी निर्माण होऊन ही त्या न झाल्या सारख्याच होतील.

---

## अमेरिकन शेतकऱ्याची शहामत.

थोड्या दिवसांपूर्वी अमेरिकेंत रंगीत कापूस उत्पन्न होऊं लागला अशी नुसती खबर रॉयटर कंपनीनें तारेनें कळविली होती. आतां अमेरिकन वर्तमानपत्रांतून त्या संबंधानें ज्यास्त माहिती आली आहे. तिजवरून कळतें कीं रंगीत कापूस पिकविण्याचा हा प्रयत्न तेथील सरकारी शेतकी खात्यानें केलेला नसून खाजगी शेतकऱ्याचा आहे. त्यानें ईजिपशन कापसाचेंच बीं घेऊन चार वर्षांत त्या बियांपासून अगदीं पांढराशुभ्र, पिंवळसर, पिंवळाजर्द, हिरवागार, तांबूस तपकिरी, अशा निरनिराळ्या रंगाचा कापूस पिकविला आहे. या कापसाचे नमुने तेथील कॉटनमार्केट ऑफिसमध्यें मुद्दाम टांगून ठेविले आहेत. तेथील सरकारी शेतकी खात्याचें लक्ष अद्याप त्या विषयाकडे गेलेलें नाहीं. त्या खात्याकडून याबद्दल रिपोर्ट प्रसिद्ध होईल तेव्हां कदाचित् या चमत्कारिक शोधाबद्दल अधिक माहिती मिळण्याचा संभव आहे.

---

## शेतकरी वर्गाचें शिक्षण.

शेतकरी वर्गाला सामान्य शिक्षणाची अत्यंत जरूरी आहे, व जोंपर्यंत तें त्याला मिळणार नाहीं तोंपर्यंत प्रयोगक्षेत्रें काढून, प्रदर्शनें भरवून, व्याख्यानें देऊन किंवा अन्य उपायांनीं शेतकीच्या सुधारणेची अवश्यकता त्याच्या मनावर बिंबविण्याचा सरकारनें कितीही प्रयत्न केला तरी त्या प्रयत्नाला यावें तसें यश कधीं येणार नाहीं ही गोष्ट सरकारी अधिकाऱ्यांना अद्याप पटत नाहीं, व शिक्षण सार्वत्रिक करण्याच्या यत्नाची अवश्यकता त्यांना वाटत नाहीं ही अत्यंत खेदाची गोष्ट म्हटली पाहिजे. खरोखर पाहिलें तर शेतकऱ्याच्या प्रत्येक व्यवहारांत त्याला जें काय नडत आहे तें शिक्षणाचा अभाव हेंच आहे. शेतकीच्या सुधारणेला मोठा अडथळा जर कशानें होत असेल तर अज्ञानामुळें. उदाहरणार्थ, नांगरानें फार खोल जमीन नांगरली तर त्यापासून जमीनींतला ओलावा फार कमी होऊन, असा खोल जमीन नांगरणारा नांगर ओढणें बैलाच्या जोडीला कष्टावह होतें येवढी गोष्ट शेतकऱ्याला समजते. पण या गोष्टी टाळून त्यापासून इष्ट कार्य तेवढें कसें साधतां येईल, बैलांची अवलाद कशी सुधरावी, किंवा खतांत कोणती रासायनिक द्रव्यांची अवश्यकता असते, व तीं द्रव्यें थोड्या खर्चानें मिळवून खतांची सुधारणा कशी करतां येईल इ. गोष्टी कळण्याला शिक्षणच पाहिजे. सावकारांनीं, किंवा रेव्हेन्यु खात्यांतल्या नोकरांनी त्याला त्रास दिला असतां कोणाकडे दाद मागावी, कसा अर्ज लिहावा, आपले हक्क कोणते आहेत, व कायदे काय म्हणतात तें अशिक्षित शेतकऱ्यांना कोठून कळणार? आणि हें जोंपर्यंत त्याला कळणार नाहीं, तोंपर्यंत त्याला आपल्या हक्काचें संरक्षण कसें करतां येईल किंवा दाद कशी मागतां येईल? सारांश मध्यम प्रतीचें किंवा उच्च प्रतीचें तर राहोंच पण निदान प्राथमिक शिक्षण तरी सरकारनें तूर्त सार्वत्रिक करावयास पाहिजे आहे. पण तें न करतां शेतकी खात्याकडून हल्लीं शेतकी सुधारणेसाठीं जे उपाय योजण्यांत येत आहेत ते कितीही सद्धेतुमूलक असले तरी ते परिणामकारक होणें दुरापास्त आहे, व अनुभव ही तसाच आहे.

---

## म्हैसूर संस्थानची प्रगति.

म्हैसूर संस्थानची प्रगति झपाट्यानें होत चालली आहे. तेथील दिवाण सर विश्वेश्वर ऐयर यांची कारकीर्द शिक्षण प्रसारासंबंधानें चिरस्मरणीय होईल असें दिसतें. नुकतीच म्हैसूर युनिव्हर्सिटीची योजना बाहेर पडली. प्राथमिक शिक्षण कांहीं भागांतून सक्तीचें पूर्वींच करण्यांत आलें होतें. आतां बहुतेक सगळ्या भागांतून सक्तीचें करण्याबद्दल ठरलें आहे. खेड्यापाड्यांतून सुद्धां वाचनमंदिरें उघडण्याचे प्रयत्न चालले आहेत. घरगुती शिक्षणाचे वर्ग उद्योगधंदे शिकविण्याचे वर्ग, प्रौढ विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे वर्ग, असे निरनिराळे लोकांच्या सोयीसाठीं निरनिराळे वर्ग काढून सर्वांच्या आटोक्यांत शिक्षणाला नेऊन सोडण्याची शिकस्त तें संस्थान करीत आहे. उद्योग धंद्याच्या लहान लहान शाळा प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणीं ठेवण्याचा यत्न हळूं हळूं चालला आहे. स्त्री शिक्षणाप्रीत्यर्थ एकंदर ७०० स्कॉलरशिपा ठेवण्यांत आल्या आहेत. सारांश. शिक्षणप्रसार व औद्योगिक प्रगति यांचा निकट संबंध ओळखून म्हैसूर संस्थान दोहींकडे सारखें लक्ष घालीत आहे. शाबास!

---

## कॉलेजच्या फींत वाढ.

मध्यप्रांतांतील कॉलेजांत शिक्षणाबद्दल घेण्यांत येणारी फी सरकारी हुकुमावरून वाढविण्यांत आली आहे. अगोदरच महागाई, तशांत युद्धफंड, दुष्काळफंड, स्मारकफंड वगैरे सारख्या फंडांस मदत करतां करतां मध्यम स्थितींतल्या लोकांना नाकीं दम आलेला, आणि आतां मुलांच्या शिक्षणाची फी ही वाढली! खर्चाच्या मानाबरोबर उत्पन्नाचें ही मान वाढतें राहतें तर कुरकुर करण्यास जागा राहिली नसती. पण तसा ही कांहीं प्रकार नाहीं. बरें शिक्षणाचा प्रसार फार झाला आहे व तो कमी करणें अवश्य आहे, अशी स्थिति निदान मध्यप्रांताची तरी खास नाहीं. उलट शिक्षणाचीं साधनें वाढवा अशी योग्य मागणी लोकांकडून होत आहे व तिला विचारी माणसांची पूर्ण संमति आहे. शिक्षण व आरोग्य हे दोन विषय असे आहेत कीं त्यांत अतिरेक कधीं होणें शक्यच नाहीं व झाला तरी तो अपायकारक न होतां उलट उपकारकच होत असतो. असें असतां मध्यप्रांताच्या सरकारनें कॉलेजाची फी वाढविली यांतलें इंगित काय तें सांगणें कठीण आहे. सुधारलेल्या राष्ट्रांतून प्राथमिक शिक्षण तर सर्व मुफतच आहे. मध्यम प्रतीच्या शिक्षणाला फी पडते अशीं राष्ट्रेंही थोडीं आहेत. आणि अमेरिकेसारख्या शिक्षणाची महती पूर्णपणें ओळखणाऱ्या राष्ट्रांतून तर उच्च शिक्षणाचा जितका कमी खर्च लोकांचे अंगावर पडेल तितके उपाय योजण्याकडे सरकारी अधिकाऱ्यांची प्रवृत्ति दृष्टीस पडते. असें असतां हिंदुस्थानांत या तिन्ही प्रतीच्या शिक्षणाला लोकांना आपल्या खिशांतून शक्तीच्या बाहेर खर्च करण्याचें भाग पडावें ही आश्चर्याची गोष्ट आहे. जिला पैसा खर्च करावा लागत नाहीं तिचें महत्व लोकांना कळत नाहीं हा धडा लोकांच्या मनावर ठसविण्याकरितांच इतकी यातायात सरकार करीत असेल तर त्यांचा हा प्रयत्न व्यर्थ आहे. कारण, लोकांना जर उच्च शिक्षणाचें महत्व न कळतें, तर आज फर्ग्युसन कॉलेजसारख्या उच्च शिक्षणाच्या संस्थांसाठीं लोकांनीं ज्या लाखों रुपयांच्या देणग्या दिल्या आहेत किंवा विद्वान् लोकांनीं स्वार्थत्याग केला आहे तो केलेला दिसला नसता. लोकांना उच्च शिक्षणाचें महत्त्व पूर्णपणें कळत आहे, पण त्यासाठीं करावा लागणारा खर्च झेपण्याइतकी शक्ति त्यांचे अंगीं राहिली नाहीं, यामुळें फी कमी करण्याविषयीं सरकारपुढें तोंड वेंगाडण्याचा प्रसंग त्यांचेवर आलेला आहे, इतकेंच.

---

## जर्मनीचा पाताळयंत्रीपणा.

जर्मनीनें दोस्तराष्ट्राच्या—विशेषतः ब्रिटिश राष्ट्राच्या विरुद्ध—लोकांचीं मनें दूषित करण्यासाठीं नानाप्रकारचीं कारस्थानें करून पाहिलीं आहेत व युक्त्या लढविल्या आहेत. या कारस्थानांपैकीं एका कारस्थानाचा परिस्फोट नुकताच झाला आहे. त्याची हकीकत अशी आहे. प्रथम जर्मनीनें खुद्द इंग्लंडांतच घरभेदेपणा करण्याचा यत्न करून पाहिला, पण त्याला यश येण्याचें चिन्ह दिसेना, तेव्हां इंग्लंडच्या बंधनांतून सुटून स्वराज्य मिळविण्यासाठीं यावज्जन्म प्रयत्न करणाऱ्या आयर्लंडांत निराळ्याच तऱ्हेचा यत्न करून पाहिल्याचे बाहेर आलें आहे. ता. २४ एप्रिल रोजीं इंग्लंडच्या आरमार खात्याकडून एक जाहिरनामा प्रसिद्ध करण्यांत आला. त्यांत म्हटलें आहे कीं एक जर्मन क्रूझर व्यापारी जहाजाचें रूप धारण करून व बरोबर शस्त्रास्त्रांची भरपूर सामुग्री घेऊन आयर्लंडला जात होतें. या जहाजाबरोबर एक पाणबुडी बोट ही होती. इंग्रज आरमाराला संशय येतांच त्यांनीं या जहाजाला व बोटीला एकदमच जलसमाधि दिली, व त्यांवरच्या लोकांना कैद करून नेलें. या कैद केलेल्या लोकांत आयर्लंडचे सर राजर केसमेंट हे होते. हे गृहस्थ युद्ध सुरू झाल्यापासून जर्मनी वगैरे देशांतून इंग्रजांच्या विरुद्ध चळवळ व क्षुब्धता उत्पन्न करण्याच्या प्रयत्नांत गुंतलेले होते. सध्यां हे लष्करी पाहऱ्यांत बसले आहेत. यांच्यावर खटला चालू होईल तेव्हां पुष्कळ गमतीच्या गोष्टी बाहेर येण्याचा संभव आहे.

---

## इंग्लंडची सुस्ती.

हिंदुस्थानचे बरेचसे उद्योगधंदे ईस्ट इंडिया कंपनीच्या अमदानींत कंपनीच्या लोभी वर्तनामुळें बुडाले याला इतिहास साक्ष देत आहे. पण रंग तयार करण्याचा उद्योग इंग्लंडच्या हातांतून जर्मनीचे हातांत गेला त्याला कारण इंग्लंडची सुस्ती झाली आहे असें एक इंग्रज लेखक म्हणतो. ॲनिलीन रंग म्हणजे नीळ किंवा कोल—टार यापासून उत्पन्न होणाऱ्या रंगांची उत्पत्ति मूळची इंग्लंडांतली आहे. सदर लेखक म्हणतो कीं ३० वर्षांपूर्वी जेव्हां मी बारिस्टरीचा अभ्यास करीत होतों तेव्हां हे रंग कसे तयार करावे त्या बद्दलची सारी हकीकत ज्यांत दिली आहे असे कागद आमच्या चेंबरमध्यें धूळ खात पडलेले मीं पाहिले होते. पण त्यांकडे कोणीं लक्ष दिलें नाहीं. जर्मन लोक पुस्तकीविद्येंत हुशार असतील पण व्यवहारज्ञानांत ते आमच्या फार मागें आहेत अशी त्यावेळीं इंग्रजांची समजूत होती. म्हणून इंग्रज स्वस्थ राहिले. मी मात्र कधीं कधीं या मताच्या उलट विचार प्रकट करी, तेव्हां सर्वजण माझा उपहास करीत. माझ्या म्हणण्याची सत्यता त्या वेळच्या लॉ रिपोर्टावरून ही दिसून येईल. पुढें एका जर्मन पंडिताचे माझ्याशीं संभाषण झालें, तेव्हां तो पंडित म्हणाला 'तुम्ही इंग्रज लोक नव्या कल्पनांचा व विचारांचा तिरस्कार करणारे आहां. तुम्ही नव्या कल्पना काढाव्या, आणि दुसऱ्यांना त्यांचा फायदा घेऊं द्यावा ही तुमची रीत आहे. वैद्यकींत तुम्ही काढलेल्या पण अव्यवहार्य म्हणून टाकून दिलेल्या कल्पना जर्मन लोकांनीं उचलून व्यवहार्य करून दाखविल्या. तुम्ही नवीन एखादी गोष्ट दिसली कीं तिच्या शोधार्थ रॉयल कमिशनें बसवावीं, आणि दीर्घसूत्रीपणांतच कालक्षेप करावा! सदर जर्मन पंडिताच्या म्हणण्यांत खरोखर फार तथ्य आहे असें मला आतां वाटूं लागलें आहे.

---

## महायुद्धाची प्रगति.

गेल्या आठवड्यांतली युद्धासंबंधाची अत्यंत महत्त्वाची व तितकीच दुःखाची गोष्ट म्हणजे जनरल टाउनशेंड यांजवर शत्रूच्या स्वाधीन होण्याचा प्रसंग ही होय. कूट येथें जनरल टाउनशेंड यांनीं आपल्या योद्ध्यांशा निवडक लोकांनिशीं रसद येण्याच्या सगळ्या वाटा बंद झाल्या असतां ही १४३ दिवस पर्यंत मोठ्या नेटानें कसे दिवस काढले हें त्यांचें त्यांनाच माहित. टेसिफोनची लढाई ता० २२ नोवेंबर रोजीं झाल्यानंतर ज. टाउनशेंड बगदादवर चाल करून जाण्याइतकी फौज जवळ नसल्यामुळें कूट येथें गेले, व तैग्रिस नदीच्या वळणाच्या आश्रयानें राहिले. तेव्हांपासून आतांपर्यंत रसद बंद झाल्यामुळें त्यांच्या फौजेचे अवर्णनीय हाल झाले असले पाहिजेत, व ते धैर्यानें सोसून इतके दिवस टिकाव धरणें ही खरोखर असामान्य धैर्याची गोष्ट होती. कूटमध्यें सारे ९ हजारच लोक होते, व त्यांची ही अवर्णनीय कष्टमय दशा होती, तथापि या लोकांवर नजर ठेवण्यासाठीं तुर्क

लोकांना तिप्पट फौज ठेवावी लागली होती ही एकच गोष्ट या लोकांच्या शौर्याविषयींची साक्ष पटविणारी आहे. अशा अडचणीचे वेळीं शत्रूच्या स्वाधीन होण्यांत कोणाला ही कमीपणा वाटण्याचें कारण नाहीं.

---

या प्रमाणें कूट पुनः एकवार तुर्कांच्या हातीं गेलें, या गोष्टीचा मेसोपोटेमियामधील पुढील युद्धावर काय परिणाम घडेल त्याचा अंदाज आज करतां येत नाहीं. तुर्क लोक हें मुख्य लष्करी केंद्र करून तेथून युद्धाचीं सूत्रें हलवितील असा रंग दिसतो. शत्रूच्या चिंवळील दावांत ठेवण्याइतकी फौज मेसोपोटेमियांत अजून ही इंग्रजाजवळ आहे. आर्मेनियावर रशिया चाल करून जातच आहे. तिकडे संरक्षणार्थ फौज पाठविण्यांत तुर्कांची तिरपिट उडून राहिली आहे. तेव्हां ते टायग्रिसच्या बाजूला बचावाच्या पलीकडे आपण होऊन कुरापत काढतील हें संभवनीय दिसत नाहीं.

## पश्चिम रणक्षेत्र.

व्हर्डुनच्या लढाईची इतिश्री झाली, व तेथें वीरश्रीची कमाल करून दाखविणाऱ्या सेनापतीला बादशाहाकडून मोठा सन्मान ही प्राप्त झाला, अशा खबरा इंग्रजी वर्तमानपत्रांनीं दिल्या आहेत. पण या बातम्यांना फ्रेंचांकडून अद्याप पुष्टि मिळालेली दिसत नाहीं. म्यूज नदीच्या दोन्ही तीरांवर जर्मन पायदळांचे हल्ले पूर्वीच्या सारखे जोरानें व वरचेवर होत नाहींत येवढें खरें आहे. पण फ्रेंचांच्या ठाण्यांवर होणारा तोफांचा वषाव कमी झालेला नाहीं. जर्मन लोकांचे असे हल्ले जोंपर्यंत सुरू आहेत तोंपर्यंत व्हर्डुनच्या युद्धाचा अध्याय संपूर्ण झाला असे ह्मणणें धाडसाचें आहे.

## जर्मन शत्रूंची चळवळ.

व्हर्डुनपाशी इतक्या आवेशाचें युद्ध दीर्घ काळपर्यंत झालें तरी कांहीं फलनिष्पत्ति न होतां लाखों माणसांची प्राणहानि तेवढी पदरांत पडली यामुळें चिडून कीं काय जर्मन शत्रूंनीं इतरत्र अधिक खोडसाळपणा करण्यास सुरवात केली आहे. लूस, सेंट एलोइ वगैरे ठिकाणीं जोरानें हल्ले होत आहेत व तितक्याच जोरानें त्यांचे प्रतिकारही घडत आहेत. चांपेनच्या बाजूला जर्मनकडून हल्ले होतील असा पुष्कळांचा अंदाज होता, पण तिकडे अद्याप स्तब्धता दिसते. गेल्या दोन अडीच महिन्यांत झालेल्या जर्मन सैनिकांच्या प्रचंड प्राणहानीमुळें जर्मन फौजेंत नवीन भरती करण्याची किंवा एका ठिकाणची फौज थोडीशी काढून दुसरीकडे नेण्याची अवश्यकता जर्मन सेनापतींना अधिक तीव्रतेनें वाटूं लागलेली दिसत आहे यांत आश्चर्य नाहीं. या बाबतींत रशियाचें मोठें भय जर्मनीला वाटत असलें पाहिजे कारण रशियन फौज ह्मणजे वाहत्या पाण्याच्या अखंड झऱ्यासारखी आहे. तिच्या प्रवाहाचा अंत लागावयाचा नाहीं. अशा फौजेशीं एकेठिकाणीं नव्हे तर एकदम पांच चार ठिकाणीं तोंड देण्याचा प्रसंग ह्मणजे मोठेंच विचाराची गोष्ट जर्मनीला वाटत असली पाहिजे.

## रशियाचे विजय.

आर्मेनियामध्यें रशियानें मिळविलेल्या विजयांचा फार अनुकूळ व उत्तेजन कारक परिणाम रशियन सैनिकांवर झाल्याशिवाय राहणार नाहीं. अर्जेरुम व ट्रेबिझोंड यांच्या सर करण्यानें रशियन फौजेला स्वतःच्या शक्तीचा खरा अदमास करतां आला आहे. आतां आर्जिंगानकडे त्यांचा मोर्चा वळला आहे. दक्षिणेंत बिटलिस पलीकडे ही पुढें पुढेंच पाऊल आहे.

## विचारांची संसृती.

बेळगांव येथें गेल्या २९-३० व १ ल्या मे ला जी मुंबई इलाख्याची प्रांतिक परिषद भरली होती तिनें महाराष्ट्रापुरती राष्ट्रीयसभा भरवली होती असें ह्मटलें तरी चालेल. नवीन राजकीय वातावरण जें गेल्या १० वर्षांपासून बनत चाललें आहे, त्याची रमणीय कल्पना या परिषदेंतील कार्यक्रमावरून चांगली होणारी आहे हा कार्यक्रम मवाळांचा नाहीं, राष्ट्रीय पक्षाचा आहे किंबहुना तो ज्वलत् जहालांचा आहे असें कांहीं लोक ह्मणोत; पण ही गोष्ट पक्की दिसते कीं त्यांच्या त्या विचारामध्यें निस्पृहता व स्वातंत्र्य आहे विद्युल्लताह खेळतों आहे असेंच वाटेल. आणि ह्मणूनच अशा परिषदांना लोकसमूह आनंदानें लोटतो आणि राजश्री खापर्डे, टिळक, बाप्टिस्टा इत्यादि लोकांचे विचार ह्मणजे लोक समुहांच्या विचारांचीं उच्च उच्च शिखरें होत. अध्यक्ष रा. रा. दादासाहेब खापर्डे यांचें इंग्रजी व मराठी भाषण तिकडील प्रांतांस इतकें आवडलें हें पाहून आह्मास विशेष अभिमान व गौरव वाटतो. ते बृहस्पतीसारखे बोलतात, त्यांच्या जीव्हाग्रीं सरस्वती खेळत आहे इ. इ. उद्गार ऐकून आह्माला मोठी धन्यता वाटते. अध्यक्षांच्या भाषणांतील व इतर ठरावांतील विचारांनीं लोकांच्या अंतःकरणांतील विचारांना कार्याची गती मिळत आहे असें अनुभवास येईल अराजकपक्ष सर्वच राष्ट्रांत आढळतील. पण त्यांना समाजांतील मुत्सद्दी लोकांची कधींच मान्यता नसते आणि अराजकपक्षाचें अस्तित्व हें नेहमीं सरकारच्या हातून होणारी लोकांची पायमल्ली दर्शवीत असतें आणि त्या पक्षाला मोडून काढून जे लोक सुविचाराच्या पद्धतीनें सरकारशीं भांडूं लागतात, सरकारला चुक्या दाखवितात व लोकांच्या हक्कांची मागणी नेटानें करितात त्या लोकांविषयीं गैरसमज होण्याचा पुष्कळदां संभव असतो आणि तशा विपत्कालांतून राष्ट्रीय सभेंतील हा नेटाचा पक्ष आतां सूर्य प्रकाशांत उज्वल माध्यानें पुढें आलेला आहे. या संबंधाची राजश्री खापर्डे यांची गर्वोक्ती कदाचित् अस्थानींही वाटेल; पण अराजक मंडळीचा व्यूह मोडण्यामध्यें राष्ट्रीय मंडळीप्रमाणेंच नेमस्त पक्षानें ही मोठीच राष्ट्रसेवा केली आहे हें आह्मी विसरतां कामा नये. राष्ट्राच्या संस्कृतीच्या दृष्टीनें पाहतां दोन्ही पक्षांनीं अराजकपणाचें बीज अगदीं लयास नेलें. ही गोष्ट सांप्रतच्या महायुद्धाच्या प्रसंगीं सरकारी निदर्शनास आली. आणि त्यामुळें सरकारी दृष्टिकोण इतका अमृतस्त्रावी झाला आहे कीं नुसत्या १० वर्षांच्या कालांतच स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतुःसूत्रींतील मन्त्राम्नाय अध्यक्षांनीं सांगितल्याप्रमाणें आतां सर्व राष्ट्रभर दुमदुमत आहेत. इतकेंच नाहींतर 'स्वराज्य संघ' ह्मणून एक निराळीच मंडळी निघाली असून तिचा हेतू स्वराज्य संपादण्याचे मार्ग खुले करण्याचा आहे. **स्वराज्य** हें ध्येय पावन करणारी गंगाच आहे आणि तिच्या पावन क्रियेनें स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या गोष्टी आपोआपच साध्य होऊन राष्ट्राचें सौभाग्य समृद्ध होणारें आहे. राजश्री खापर्डे यांचें समग्र भाषण फार गोड, स्फूर्तिदायक व वैभवशाली आहे. त्यांच्या भाषणाच्या योगानें जें राजकीय अंतरीक्ष बेळगांवास दृश्य झालें, त्याच्या प्रभावामुळेंच कीं काय सर्वच भाषणामध्यें एक प्रकारची कल्याणदृष्टी, कार्योत्साह व विलक्षण जीवनकला हीं खेळत होतीं. महायोद्धा असल्याशिवाय जसा युद्धाला रंग येत नाहीं, त्याप्रमाणें सरकारी दाबामुळें निजून पडलेला हा राष्ट्रीय पक्ष आतां पुनः राष्ट्रकार्यासाठीं कंबरा बाधून उभा राहीपर्यंत राष्ट्रीय सभेच्या कामाला निस्तेजता आली होती पण आतां दोन्ही पक्षांच्या समेटामुळें सर्वच राष्ट्रकार्य मोठें झपाट्यानें आपल्या सिद्धीपथाचा मार्ग आक्रमत आहे. ही मोठीच आनंदाची गोष्ट होय. या अशा सुसमयाला जर राष्ट्रीय पक्षाचे लोक किंवा नेमस्त पक्षाचे लोक वेगवेगळे होऊन अलग पडतील व हातांत हात घालून जर समीक्षेनें व प्रसन्न वृत्तीनें कार्य सिद्धीस नेणार नाहीं तर ते दोन्ही पक्षाचे लोक राष्ट्राचे हितशत्रु आहेत असे इतिहासकार सांगतील. विचारांच्या संसृती पुढें हे हितशत्रु कधा ही टिकाव धरणार नाहींत. आशावाद, उच्च ध्येय व आकांक्षा यांनीं जे लोक प्रेरित असतात, तेच राष्ट्राचीं कार्यें करितात. आणि या बाबतींत निदान कोणीही आसंका न धरतांना खुल्या दिलानें व संग्राहक बुद्धीनें सत्कार्याच्या उभारणीसाठीं आपल्या व्यूहांत कोणाला ही मज्जाव ठेवूं नये. आणि राष्ट्रीय सभा हेंच धोरण दोन्ही पक्षास पुनः पुनः सांगत आहे. ३० वर्षांच्या पूर्वींचीं युद्धें व त्यावेळचे विचार हे प्रस्तुतच्या नव्या पिढीला पटण्यापूर्वीं त्यांच्यामध्यें सर्वच प्रकारें क्रांती घडली पाहिजे आणि मग ही राष्ट्रीय सभा नव्या पिढीच्या आदराला चांगली पात्र होईल. असाच भावार्थ बेळगांवची परिषद राष्ट्रीयपक्षाच्या मुखानें नेमस्त पक्षास सांगत आहे.

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**—मागील सप्तकांत घडून आलेल्या वातावरणांतील चलबिचलीमुळें उन्हाचे मान थोडें कमी तीव्र आहे; पण त्यापेक्षां रात्री चांगल्या थंड जातात. पटकी वगैरे इतर आजारही अगदीं मंदावले आहेत ही संतोषाची गोष्ट होय.

---

रा. रा. विष्णु दामोदर भट हायकोर्ट वकील आकोला यांनीं मेल्ल्या थर्ड क्लासला बायकांचा डबा नसल्याबद्दल रेल्वे कंपनीवर दिवाणींत दावा करून एक रुपया नुकसानी मिळविली. तेव्हां पासून तिसऱ्या वर्गाचा बायकांच्या साठीं डबा नसला तर इंटर मिजीएट डब्यावर एक फळी लाऊन ठेवीत असतात हा मोठा लाभ होय. अलीकडे नागपूरच्या मेलगाडीमध्यें मनस्वी गर्दी होत असते. अशावेळीं युरोपियन व युरेशियन लोकांकरितां ३ ऱ्या वर्गाचा एक डबा निराळा ठेवीत असतात हा भेदाभद आतां लवकर मोडून टाकला पाहिजे आणि रेल्वे कंपनी जर तसें न करील तर सरकारनें तसें करण्यास लाविलें पाहिजे.

---

रा. रा. विष्णु कृष्ण देशपांडे यांस खामगांवास मुनसफ नेमण्यांत आलें आणि रा. रा. पट्टाभिराम बाळकृष्ण तेलंग मुनसफ यांस खामगांवाहून आकोल्यास बदलण्यांत आलें.

---

**स्वकूळ साळी उन्नती सभा एलिचपूर** ही आपल्या आश्रयाखालीं ता. २९-३०-३१ मे रोजीं आपल्या ज्ञातीची सभा भरविणार आहे. तेव्हां त्या ज्ञातींतील व इतर समाज सुधारणेच्छु लोकांनीं या सभेला आपल्या उदार दर्शनानें मदत करावी अशी तिच्या सेक्रेटरीची विनंती आहे.

**शिष्य वृत्ती** ( मागासलेल्या ज्ञातीसाठीं ) नामदार चीफ कमिशनर साहेबांनीं असें फर्माविलें आहे कीं पतित वर्गाच्या मुलांसाठीं व कोरकू वगैरे लोकांच्या मुलांसाठीं डायरेक्टर साहेब कांहीं शिष्यवृत्ती मुद्दाम राखून ठेवणार आहेत. या शिष्यवृत्ती मिडल शाळा, हायस्कूल व कॉलेज येथील त्या त्या कनिष्ट वर्गाच्या विद्यार्थ्यांस मिळतील. ज्या विद्यार्थ्यांस आईबापापासून दूर रहावें लागत असेल त्यांस मोठ्या रकमेची स्कॉलरशीप देण्यांत येईल. बाकीच्यांस लहान रकमेची देण्यांत येईल. या स्कॉलर्शिपींचा तपशील असाः—

| स्कॉलर्शिपींची संख्या | शाळा | रकम |
| --- | --- | --- |
| १९ | मिडल्स्कूल | ५ रु. किंवा २ रु. |
| १० | हायस्कूल | ७ रु. किंवा ४ रु. |
| ५ | कॉलेज | १२ रु. किंवा ८ रु. |

मिडल्स्कूल व कॉलेजमधील शिष्यवृत्ती ४ वर्षें चालेल व हायस्कूलमधील ३ वर्षें चालेल.

**यवतमाळ जिल्हा परिषदः**— या सभेला गेल्या शनिवारीं सुरुवात झाली असून अध्यक्ष नामदार रा. रा. मोरेश्वर राजाराम दिक्षीत हे आहेत. यांचें इंग्रजी संभाषण विशेष मनन करण्यासारखें असून त्यांत डिपुटी कमिशनर राजश्री चापमन यांच्या सद्विद्यार्थिसंवाचा उल्लेख व त्याचें भावी क्षात्रतेज हीं या लढाईच्या प्रसंगानें ध्यानांत ठेवण्या सारखीं आहेत.

---


## नोटीस

सर्वत्र लोकांस ह्या नोटिशीनें जाहीर करण्यांत येते कीं शहर बऱ्हाणपूर येथील महाजना पेठेंत असलेली रा. रा. भुसकुटे साहेब ह्यांचे जिनिंग फ्याक्टरीचा व तत्संबंधीं गोदाम व बाहेरील इमारतींसुद्धा लिलाव ता० २०।५।१६ रोज शनिवारीं दुपारी १२ वाजतां सदर्हु फ्याक्टरीच्या आफिसांत करण्यांत येईल. सदर्हु लिलाव मेहेरबान कमिशनर साहेब बहादूर हुशंगाबाद डिव्हीजन ह्यांचे मंजुरीवर अवलंबून करण्यांत येईल. या संबंधीं ज्याना कांहीं विशेष माहिती पाहिजे असेल त्याना ती आमचे आफिसांत मिळूं शकेल

K. P. Bhat
for डेप्युटी कमिशनर साहेब
नो. नं. १६९ नेमाड

## ापुस– तक्ता– साप्ताहिक– २९ एप्रिल १९१६ पर्यंत

| जिल्हा. | वर्ष. | काटन मार्केट — आयात — कापसाच्या गाड्यांची संख्या. २९-४-१६ पर्यंतचा आठवडा | १।९।१५ पासून | रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या. ता.२९।४।१६ पर्यंतचा आठवडा | १।९।१५ पासून |
|---|---|---|---|---|---|
| रावती | चालू साल | १,८३८ | १९५७४८ | ३३४ | ९,१९८ |
| | गुदस्त | ९५९ | १६०,९६ | ३०४ | ७,९७१ |
| | तिगस्त | १,४३९ | १६७३९८ | ४६२ | १६,२२४ |
| माळ | चालू साल | ४८ | ३२,५१८ | ५४२ | २२,७८६ |
| | गुदस्त | ० | ३७,३९१ | ५३६ | १६,३६९ |
| | तिगस्त | ११० | ५५,८५० | ४८८ | १४,९३५ |
| कोला | चालू साल | १,२१३ | २११४९१ | २२४ | ७,६०३ |
| | गुदस्त | १,६०५ | १५११०६ | ३५१ | ८,१६१ |
| | तिगस्त | १,३६० | २१२६०६ | ४८३ | २९,५६१ |
| डाणा | चालू साल | १,८८८ | १९८०५५ | १९६ | ७,६१६ |
| | गुदस्त | १६,८७० | १५०२६५ | १८३ | ४,४८७ |
| | तिगस्त | १,४८१ | १६४६८५ | १,१३० | ३·,१८८ |
| वऱ्हाड | चालू साल | ४,९८७ | ६३७८१२ | १,२९६ | ४७,२ ३ |
| | गुदस्त | ४,०४५ | ४९८८५४ | १,३७४ | ३६,९८८ |
| | तिगस्त | ३,६५४ | ६००५३९ | २,५६३ | ९०,९०८ |

— चालूं सालाच्या बरोबरीचे साल गुदस्त व तिगस्त सालचे आठवडे १ मे १९१५ व मे १९१४ पावेतों होते.

सी. नी. लेफ्वीच

डायरेक्टर ऑफ आग्रिकल्चर आणि इंडस्ट्रीज मध्यप्रांत


## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY.

## FUNDS almost 5 CRORES.

VESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

Claims paid 4½ CRORES

## A Decennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. | Year. | Total Income. | Total Assets. |
|---|---|---|---|---|---|
| 1884 | 4,823 | 1,59,25,200 | 1884 | 6,77 552 | 14,41,429 |
| 1894 | 20,110 | 5 26,08,850 | 1894 | 4259,,607 | 94,49,971 |
| 1904 | 43,356 | 8 88,02,223 | 1904 | 43,64,808 | 2 47,18.8 |
| 1914 | 65,269 | 12,37,10,910 | 1914 | .72,46,0 | 4,96,8650 |

### SPECIAL FEATURES.

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.

Forty years continuously increasing prosperity.

Ninety per cent of the entire Profits, after provising for the Reserve fund divided among the Policyholders every 3 years.

Native Lives are accepted at the same rates as Europeans.

Loans granted to policyholders at reasonable rates.

Prompt Payment of Claims.

*Influential and active agents wanted Terms liberal*

:0-

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

R. Paterson Brown

Manager

*A. C. Lal,*
Branch Secretary
*C. P. Berar & Khandesh*
Nagpur.

N. N. 22



ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखाना:—मुर्डी.

### मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिवृद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता कडक गर्मीनें मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांचे धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बळातरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व अन्न भरपूर पचूं लागतें. त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत एका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर केतिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयांचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल. दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. अपूर्व नेत्रांजन—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. परम्यावर अपूर्व मिश्रण—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह. तिडीक, मुत्रांची लाली, सकाव, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसता सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकेत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १। भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीचीं असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत. याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, मधोक्त रसायनें, भस्में, पाक, गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोग्यानें किंवा नाहीं. पो. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ता:—मु० मुर्डी, पो० हर्णे, जिल्हा रत्नागिरी.

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

ना० नं० २०


हें पत्र आकोला येथें केळ्यासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला——सोमवार तारीख १५ माहे मे सन १९१६ ई० [ अंक १९

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

---

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

या बँकेंत खालीं दिलेल्या करारीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमाच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिलक असेल तिजवर केली जाईल. मात्र पाच हजारावरील शिलक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } S. Clements, एजंट

नं १

---

अस्सल अंगुरी.

## हिंग

केवळ एक आणा तो. पवित्र केशर १॥ तो. शुद्ध शिलाजीत. -॥- तो. खाल्सि कस्तूरी रु. २९ तो. सिवेती म्मीरा रु. २ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९

नो० नं० २

### हिंदुस्थानावर अरिष्ट

हिंदुस्थानांतील राहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार आखडतांच दूर होतात किं रु. १८.

बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन माफकाळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुसळी, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला. जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

---

## चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व बाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. माल माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

---

हिंदुस्थानांत मराठी भाषेंत असें हें पहिलेंच. स्वस्त आणि उपयुक्त मासिक पुस्तक.

सुरू झालें. वा. व ८९ ] पूर्णानंद [ सुरूं झालें. ट. ख. ८३

लहान मोठ्या सर्व स्त्री पुरुषांच्या चित्ताचें सारखेंच आकर्षण करणारें व अनेक विषयांचा उहापोह करणारें **अगदीं नवीन तऱ्हेचें अत्यंत मनोरंजक पूर्णानंद** मासिक पुस्तक फेब्रुवारी महिन्यापासून सुरूं झालें. यांत चटकदार गोष्टी, हास्यकारक चुटके कविता, कादंबऱ्या वगैरे मनोरंजक लेख येत. शिवाय प्रसिद्ध विद्वानांच्या लेखांचा व विविध ज्ञानाचा संग्रह यांत केला जात आहे. सारांश फक्त पांच आण्यांत वाचकाला जेवढा लाभ करून देणें शक्य तेवढा किंबहुना जास्त देण्याचा प्रयत्न केला आहे. लढाईमुळें चालू परिस्थिति सर्व बाजूंनीं बिकट व खर्चिक झाली आहे. तरी पण या मासिकाची वार्षिक वर्गणी फक्त -।- ( व्ही. पी. पोष्टेजसह ॥= ) ठेविली आहे. नमुन्याचा अंक दीड आण्याची तिकिटें पाठवून मागवा.

बळवंत रामचंद्र सोहनी,
पूर्णानंद-कार्यालय,
खडेबाजार-बेळगांव.

नो. नं. १३२

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल

---

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, पात भरल्याचे, लिस्टफार्म पर्च्यांचे व नकलेकारितां करावयाच्या अर्जांचे नमुने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

---

### श्री दत्तात्रय अलंकारालय
### कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र माळ, ठुशा, जोड, गुलाबाचीं फुले, बिल्वदळ टीका, मुदा, अग्रफुलें साखीं व बागन्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, ताटें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर बाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिन्नसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं. चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया अगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो नं ६

---

## कौतुकरत्नाकर

**छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह पृष्ठसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ती १ ली. प्र. २००००,**

बंगाल्यांतील कामरूपदेशीं ही विद्या फार प्रबल असून तिकडील जटेली, लंगोटि, छा छु करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवून सिद्धनागार्जुन मंत्र महोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केलेला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुगाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम महादिकांचीं वर्णनें ...मनमती यंत्र वशीकरणशास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारणमारण ... विधि, औषधी हुन्नर, नानांग कला, आत्मविद्यामेस्मेरिझम प्रयोग, विधि वगैरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया.

## कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रही ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको. किंमत १ रुपया ट. ख. २ आणे.

पत्ताः— गंगाधर आर. आणि कंपनी.
हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ७

# विद्यामंदिर वाकररोड नागपुर.

## येथें मिळणारीं पुस्तकें.

DR. SHRIDHAR V. KETKAR'S INDIAN ECONONICS.

Re 1-8-0 per V. P. Re. 1-11-0.

Good opinions are passed by the TIMES (London) the EMPIRE (Calcutta) the MODERN REVIEW (Calcutta) the HINDUSTAN REVIEW (Allahabad) Strong ondcmaion by the PIONEER (Allahabad) Chapters I what is Indian Economics (ii) social conditions and Economics condition (iii) Indian Economics and Ind an Pagcholoky. (iv) Political conditions and Economics condition, (v) Language Policy and Economics, (vi) Economic evolution and layers of cicilization (vii) Communal Economics and distributive Economics (viii) Future out look.

२ **संकीर्ण लेखः**—डा० केतकर यांचे किंमत १ रु. ४ आणे. व्ही. पीनें १ रु. ७ आणे. यात पुस्तकांत खालील लेख आलेले आहेत.

(१) जातिभेद आणि त्या संबंधाचें राष्ट्रीय धोरण
(२) या विषयावर झालेला वादविवाद
(३) समाजाचें धर्म नियमन आणि तें करणारा वर्ग
(४) धर्मनियमन आणि ब्राह्मणांची परंपरागत विद्या
(५) समाजशास्त्र आणि धर्मशास्त्र यांचा परस्पर संबंध
(६) विक्रीचें अर्थशास्त्र आणि यंत्रशास्त्र
(७) नगर संवर्धन आणि नगर सौंदर्य
(८) मध्यप्रांतीयास संदेश
(९) प्रतिनिधीचीं कर्तव्यें
(१०) पोलिटिकल क्लब कसा करावा.

या पुस्तका संबंधानें २७ जुलै १९१५ च्या अंकांत केसरीकार म्हणतात:—

"डा० केतकर हे खंदे लेखक असून महाराष्ट्रांत निघणारीं बहुतेक प्रसिद्ध वर्तमानपत्रें आणि मासिकें यांतून यांचे लेख प्रसिद्ध होत असल्यामुळें, ते महाराष्ट्रीय वाचकांच्या आंत्यंत परिचयाचे झाले आहेत. इकडे तिकडे विखुरलेलीं रत्नें पहाण्यांत मौज नमून : यांचा हार करून पहाण्यांतच जसा खरा आनंद आहे, त्याचप्रमाणे लेखकांच्या विचाराचा पूर्ण परिचय होऊन विचारांना चालन मिळण्यास नियत कालिकांतून निरनिराळ्या वेळीं प्रसिद्ध झालेल्या लेखांपेक्षां संकीर्ण रूपानें प्रसिद्ध झालेल्या लेखांचाच फार उपयोग होतो. ज्यांत विषय कांहीं नवीन नसतात, पण तेच विषय नवीन पद्धतीनें आणि त्यांत नवीन विचार सरणीची भर घालून लोकांपुढें आले म्हणजे समाजाच्या मनाची खळबळ उडवून देण्यास कारणीभूत होतात. डा० केतकर हे निर्भीड लेखक असून एखादा सन्मान्य गृहस्थावर अगर संस्थेवर तुटून पडतात हें खरें आहे, तथापि एखाद्या विषयावर जेव्हां ते आपलें मत देतात, तेव्हां प्रथम जरी त्यांचें तें मत लोकांना विलक्षण वाटलें तरी तें प्रमाणबद्ध रीतीनें मांडलेलें असल्यामुळें विचारांना जोराचें चालन मिळण्यास कारणीभूत होतें यांत शंका नाहीं.

३ **उत्तर अमेरिकेंतील वसंत काल** 'एक लाकी वृत्तात्मक काव्य, गोविंद पैत्र कवीचें. "धाडशी मन मोकळेपणा हाच या काव्याचा मोहक काव्यगुण आहे (महाराष्ट्र) किंमत ४ आणे.

पत्रव्यवहार व्यवस्थापक विद्यामंदिर
वाकररोड या पत्त्यावर करावा.

नो. नं. ११८

## NOTICE

The Treasury officer is now prepared to issue and encash Universal Currency Notes and Home Notes (Bombay Circle) of other denominations for the public on demand as far as possible

Endeavours will be made as far as possible in all trnsactions to meet the equirements of the payee as to the form of currency in which he desires to take payment.

The above orders do not yet apply to the Treasuries at Nagpur, Akola and Amraoti where Government treasury work is done by branches of Presidency Banks. As soon as arrangements are completed with the Banks concerned, a further notice will be issued giving the date from which free encashment of aurrency notes at these centres will be ocvailable.

# धंदे शिक्षक.

म्हणजेच इंडस्ट्रियल इंस्ट्रक्टर. यांत श्रीमंतापासून गरिबापर्यंत नित्य व्यवहारांत लागणारे अनेक सर्वोपयोगी जिन्नस घरच्या घरीं तयार करून अल्प श्रमांत व थोड्या भांडवलांत ५-१० रुपये रोज प्राप्ति करून घेता येण्याजोगा म॰ ॰॰ आजपर्यंत प्रसिद्ध न झालेली कला- हुन्नरांची गुप्त व खरी माहिती देणारा धंदे-शिक्षक आजच मागवून पैसा मिळवा ! उद्योगी व्हा !! किंमत ८८ व्ही पी. ने ८१० आणे खास पादी फुकट.

ज्ञानामित्रकर्ते, शनवार पेठ; पुणें सिटी.

नो. नं. १५८

## नोटीस

सर्वत्र लोकांस या नोटिशीनें जाहीर करण्यांत येते कीं शहर बऱ्हाणपूर येथील महाजना पेठेंत असलेली रा. रा. भुसकुटे साहेब ह्यांचे जिनिंग फ्याक्टरीचा व तत्संबंधीं गोदाम व बाहेरील इमारतीसह लिलाव ता० २०।५।१६ रोज शनिवारीं दुपारी १२ वाजतां सदर्हु फ्याक्टरीच्या आफिसांत करण्यांत येईल. सदर्हु लिलाव मेहेरबान कमिशनर साहेब बहादूर हुशंगाबाद डिव्हीजन ह्यांचे मंजुरीवर अवलंबून करण्यांत येईल. या संबंधीं ज्यांना कांहीं विशेष माहिती पाहिजे असेल त्याना ती आमचे आफिसांत मिळूं शकेल

K. P. Bhat
for डेप्युटी कमिशनर साहेब
नो. नं. १६९ नेमाड

## जाहिरात

खालीं सही करणार इजकडून जाहीरातीनें कळविण्यांत येते कीं मी तारीख २६-४-१९१५ रोजीं चंन्या वा हेमला मुक्या उर्फ मेघावण लभाणी रा० बोरव्ह यांस कुलमुखत्यारपत्र दिलें आहे तें आज तारखेपासून **रद्द केलें** आहे, तर यापुढें त्याचेशी माझे विषयींचा देवघेवीचा वगैरे कोणताही व्यवहार कोणीही माझा मुखत्यार या नात्यानें करूं यने. केल्यास तो बातल समजला जाईल व त्याची जोखीम माझे वर नाहीं व माझे स्थावर जंगम इस्टेटीवरही नाहीं. ही जाहीरात दिली सही ता० ९-५-१९१६ इसवी मु. आकोला

सही
धानकी मर्द येमजी लभाणी
इजारदारीण बोरव्ह तालुका
मंगरूळपीर नि० आंगठा

नो. नं. १७०

## नोटीस

चंन्या वा हेमला भुक्या उर्फ मेघावण लभाणी राहणार बोरव्ह इजारा ता. मंगरूळपीर पोष्ट मानोरा

यांसः—

धानकी मर्द येमजी लभाणी इजारदारीण बोरव्ह ता. मंगरूळपीर इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, मी तुजला ता. २६-४ १९१५ रोजीं कुलमुखत्यारपत्र इजारा गांव बोरव्ह याचे काम पहाण्याबद्दल दिले होतें. सदर्हू मुखत्यारपत्राचे आधारानें तूं आजपर्यंत जीं कांहीं कामें केली असतील ती विश्वासनिय नसल्यामुळें व तुझे चाली रितीवरून तूं मुखत्यारपत्राच्या लायक नसल्यामुळें मी तुजला दिलेले मुखत्यारपत्र आज तारखेपासून रद्द केलें आहे. तर तुजला दिलेल्या मुखत्यारपत्राच्या आधारें कोणतेंही काम केल्यास तें मजला कबूल नाहीं व कायद्यानें रद्द समजले जाईल, तूं ही नोटिस मिळाल्यापासून ८ दिवसाचे आंत मुखत्यारपत्र अमलांत असण्याचे दिवसा पावेतों तूं जीं कांहीं कामें केलीं असतील ती मजला समजून द्यावी व कागदपत्र हिशोब शिल्लक तुजजवळ ने असतील ते मजला देऊन माझी पावती घ्यावी. मुखत्यारपत्र चालू राहण्याचे अमदानींत मजला फसविण्याचा जो कांहीं व्यवहार केला असेल त्याची जोखीम मजवर नसून त्याची जबाबदारी तुजवर आहे. ही नोटिस दिली सही ता. ९-५-१९१६

सही
मुकाम अकोला } धानकी मर्द येमजी
फौ. कोट } लभाणी नि. आंगठा

नो. नं. १७१

## जाहिर नोटीस

खालीं लिहिलेले चतुः सिमेचे घर माझे पूर्ण मालकीचे असून ताब्यांत आहे. माझा बाप अबदुल वाहेद वा लालमहमद रा. पातुर्डा ता. जळगांव जिल्हा बुलढाणा यांस अगर माझे भाऊ शेखहुसेन अगर शेखचांद यांस अगर इतर कोणासही तें घर विकून टाकण्याचा गहाण, ठेवण्याचा अगर इतर विल्हेवाट लावण्याचा कांहीं अधिकार नाहीं. असें असतां जर कोणी तें घर त्यांचेकडून अगर त्यांचेवतीनें इतरांकडून अगर अन्य कोणाकडून ही घेईल तर त्याची जोखीम घेणारावर राहील.

मौजे तेल्हारा ता. आकोट जि. अकोला येथील घराची चतुः सिमा येणें प्रमाणें:—

पू. शिवराम पाटील याची खालीं जागा
प. नागो बळवंत याचे मकान
द. रस्ता व हुकुमचंद शेटचा मळा
उ. त्रिंबक बापूजीचें घर

येणें प्रमाणें जाहीर नोटिस दिली असे. ता. ९-५-१९१६ इ.

सही
शेखरहिमान वा अबदुलवाहेद राहणार
तेल्हारा द. खुद

नो. नं. १७२

## नोटिशीचें उत्तर

रा. रा. चंद्रभान काशीबा पाटील रा. शेरीखुर्द ता. आकोट

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं, तुम्ही ता. १७-४ १६ इ० चे वऱ्हाडसमाचारांत जी नोटिस दिली तित पिटीशनरायटर तुमचे वळणांतील असल्यामुळें त्याचेकडून खोटा मजकूर लिहून घेतला. खरी हकीकत अशी कीं, मौजे माळेगांव ता. आकोट येथील बाजारांत तुमचे आप्त रा. कवडाजी पटील जस्तगांवकर यांचेशीं रा. सुकदेव नागोजी पाटील शेरीकर यांचे समक्ष शेताचा सवदा झाला. त्यांत शेताची किंमत १००० रुपये ठरून विसाराबद्दल १२ रुपये त्यांचे जवळ दिले. पुढें खरेदीखत लिहिण्याकरितां तेल्हारा येथें गेलो व कागद लिहिण्यास सुरवात झाली. मला तहान लागल्यामुळें मी पाणी पिण्यास गेलों. तेव्हां नोंदण्या करितां कागद लवकर पटला जावा म्हणून माझे मागें कागद लिहून पूर्ण केला. पाणी पिऊन आल्यानंतर मला कागद वाचून दाखविला. त्यांत करारापेक्षां २२२॥ रुपये

जास्त लिहिलेले आढळले. तेव्हां तुह्मी करारास चुकले ह्मणून मी शेत घेण्याचे नाकारून गांवीं परत आलों. आतांही कराराप्रमाणें शेत देत असल्यास मी कबूल आहे. अदावतीमुळें शेत दुसऱ्यास कमी पैसे घेऊन विकल्यास नुकसान भरून दिलें जाणार नाहीं. व विसाराबद्दल दिलेले १२ रुपये आणि या नोटिशीचा खर्च तुमचेकडून कायद्याप्रमाणें भरून घेतला जाईल. कळावें. ता. २०-४-१६

सही

गोपाळ परवत पाटील रा. दानापूर द. खुद

नो. नं. १७३

## नोटीस

रा. रा. भानु वा मारोती टाकर रा. सागद ता. बाळापूर

यांसः—

खालीं सही करणार यांचेकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी ता० २४-४-१६ रोजीं वऱ्हाडसमाचारांतून दिलेली नोटीस आह्मांस मिळाली. तुह्मी लिहून दिलेलें गहाणखत ता० ८-२-१६ चे फक्त मल्लू वा कर्णाजी पाटील यांचे नांवचे असून तें फक्त रु. ९०० नऊशे करतां लिहून दिलेले आहे व त्याचा भरणा तुह्मास रोख नगदी गहाणखत लिहिले त्याच दिवशीं गांवांत दिलेला आहे व त्या प्रमाणें तुह्मी वि. सबरजिष्ट्रर साहेब बाळापूर यांचे पुढें कबूल केला आहे. आतां लोकांचे सांगण्यावरून व त्यांनीं फितविल्यामुळें तुह्मी पैशाची पुन्हा मागणी करतां ती अयोग्य आहे. तुह्मी ह्मणता त्याप्रमाणें पुंडू वा मल्लू व मल्लू वा कर्णाजी या दोघांनीं रुपये १००० चे भरण्यांत लिहून घेतलेलें गहाखत मुळींच अस्तित्वात नाहीं. तरी या नोटीशीनें तुह्मांस कळविण्यांत येते कीं, वरील ता० ८-२-१६ रोजीं लिहून दिलेल्या गहाण खताचा भरणा तुह्मांस रु. ९०० शे दिला आहे व त्या संबंधानें आतां आमचेवर मुळींच कांहीं जबाबदारी नाहीं. कळावें ही नोटीस दिली ता. ८-५-१६

सही

मल्लू वा कर्णाजी पाटील रा. सागद पो. निंबा द. खु.

नो. नं. १७४

## जाहीर नोटीस

नोटीस बेशमी नारायण वा गणपत जात कुणबी राहणार काटी

यांसः—

खालीं सही करणार याजकडून जाहिर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तूं माझा मुलगा असून तूं माझे ह्मणण्याप्रमाणें चालत नाहीं. या करितां ही जाहिर नोटीस देणें भाग पडलें. हा वाईट लोकांचे नादी लागून इस्टेटीची अफरातफर करूं पाहत आहे. व लोकांचे कर्ज काढूं पाहत आहे. या करितां वरील इसमास कोणी माझे संमतिशिवाय कर्ज वगैरे देऊं नये. दिल्यास ज्याचा तो जबाबदार राहील. माझेवर व माझे वडीलोपार्जीत इस्टेटीवर कोणाचाच हक्क चालणार नाहीं. याजवरून कोणी गहाण, खरेदी, व पट्यानें शेती घेऊ नये घेतल्यास घेणारा गुन्ह्यास पात्र होईल. मी जों पर्यंत हयात आहे तोंपर्यंत यांस कोणतेच प्रकारचा व्यवहार केला जाणार नाहीं. यांस कोणी कर्ज देईल तर. माझे सही शिवाय देऊं नये कळावें तारीख ११-५-१६

सही

गणपत वा बोदाजी कुणबी राहणार काटी ता० मलकापूर जि० बुलडाणा पो. नयपूर याचे डावे हातचा आंगठा

नो नं. १७५

## नोटीस

पुर्णा मर्द मारुती गावंडे रा. अमानतपूर ता. आकोला

ईसः—

नोटीस देणार सोनी मर्द सूर्यमान आली कुणबी व तुळसी मर्द लक्ष्मण काकड रा अमानतपूर ता. आकोला तुह्मास नोटीस देण्यांत येते कीं तुझा. मालक ह्मणजे नवरा नामे मारुती वा कुकाजी रा. अमानतपूर याची वडीलोपार्जीत स्थावर जंगम मिळकत मौजे अमानतपूर प्र. ता. व जि. आकोला येथील आहे हल्लीं मारुती तुझा नवरा अ. दिडमहिना झाला मरण पावला आहे. त्याचे पाठीमागें वरील स्थावर जंगम मिळकतीची वारस या नात्यानीं फक्त अन्नवस्त्रापुरती मालकी तुझे कडेस येत आहे. असें असतां लोकांचे चिथावणी वरून वरील मिळकतीचा अफरातफर करण्याचा तुझा विचार चालला असें दिसत आहे. करितां तुजला या नोटिशीनें कळवितो कीं तूं आमचे पासून अन्न वस्त्र घेत जावे अगर तुझे इच्छेनें अन्नवस्त्रा पुरती वरील मिळकतीचे माथे काढून घेत जावे व वरील मिळकत दुसरे कोणास अन्य तऱ्हेनें लेख वगैरे करून देण्याचा हक्क चालणार नाहीं. कारण वडीलोपार्जीत मिळकतीचा मालक मारुती हा आमचा सख्खा भाऊ असल्यावरून आमचा या मिळकतीवर हक्क पोंचतो आहे व मारुती मुठें पाटील रा. अमानतपूर ता. आकोला यांस दोन खंडीं जवारी चार शेरीची व कडबा पेंडी ८०० आठशे विकला आहे याजबद्दल वरील मिळकतीबद्दल कारण ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांत कळवावें तसें न केल्यास रीतीप्रमाणें दोन्ही कारणाबद्दल रीती प्रमाणें दावा करून या नोटिशीचे खर्चासुद्धां पैसे भरून घेतले जातील कळावे ता. ७-५ १६

सही

१ सोनी मर्द सूर्यभान नि. आंगठा

१ तुळसी मर्द लक्ष्मण नि. आंगठा

ने नं. १७६

वऱ्हाडसमाचार

मित्ति वैशाख शु॥ १३ शके १८३८

## महायुद्धाची प्रगति.

लढाई ह्मणजे एकंदर राष्ट्राची शक्ति आकर्षून घेणारी भली थोरली जळू आहे ही गोष्ट या घटकेला जशी ब्रिटिश लोकांना तीव्रतेनें भासत आहे तशी या पूर्वी क्वचितच कधीं भासली असेल. रोजचा पाचसात कोट रुपयांचा खर्च व उत्पन्नांत ही व्यापाराची हानि व इतर कारणें यामुळें येणारी तूट अशा दुहेरी रीतीनें द्रव्यहानि चालली आहे. पण मनुष्यांच्या प्राणहानिपुढें ही द्रव्यहानि कांहींच नाहीं. द्रव्यहानीची मोजदाद करतां येते, पण प्राणांचें मूल्य कोणाच्यानें करवेल ? सक्तीच्या लष्करी नोकरीच्या नियमाला कांहीं अपवाद ह्मणून कांहीं मंडळी इतके दिवस वगळून ठेविली होती. तिला ही अखेर युद्धांत खेचण्याची पाळी आली. तेव्हां ब्रिटिश मुत्सद्यांत मोठीच जोराची चर्चा होईल अशी भीती पुष्कळांचे पुढें उभी राहिली होती. पण ब्रिटिश लोकांचे ठायीं स्वदेशाभिमानाचा गुण अत्यंत जाज्वल्य आहे व स्वदेशासाठीं सारे मतभेद बाजूला ठेवून एकीनें संकटांतून कसे पार पडावें ही युक्ति ब्रिटिश लोकच जाणू जाणे ! लष्करी नोकरीच्या सक्तीचा अंमल पूर्णपणें करण्यास कोणी पुढें फारसा सरसावला नाहीं. महायुद्धाच्या मार्गांत आतां इतके पुढें सरसावलों आहों कीं एक पाऊलभर ही माघार घेण्याची सोय राहिली नाहीं ही गोष्ट प्रत्येक ब्रिटिश व्यक्तीला पूर्णपणें कळून चुकली आहे. उद्योग धंद्यांच्या संबंधानें अवश्य तेवढे लोक वगळून बाकीच्या झाडून साऱ्या लोकांना लढाईवर पाठविल्या शिवाय विजय हातीं लागणें मुष्कील आहे, आणि शिपायांचा पुरवठा आतां भरपूर झाल्यास युद्धाचा अंत जवळ आणतां येईल ही गोष्ट फारच थोड्या व्यक्ती खेरीज करून आतां सर्वांना मान्य झालेली आहे.

## पश्चिम रणक्षेत्र.

या क्षेत्रांत व्हर्डुन पाशी व फ्रान्स मॉर्टहॉम हिल नांवाच्या टेकडीच्या वायव्येला एका मगुन एक विजय संपादले आहेत. अजून या क्षेत्रांत जर्मनीची रग चांगलीशी जिरली नाहीं. ब्रिटिश फौजेच्या लाइनीच्या बाजूला जर्मनी लवकरच वळेल असा रंग दिसतो. पण व्हर्डुन घेण्याची महत्वाकांक्षा जर्मनीला अद्यापही सोडीत नाहीं. जर्मनी जिवाविषयीं पर्वा न करतां वारंवार निकराचे हल्ले करीत आहे व तितक्यावेळां सदर हल्ले परतविण्यांत येत आहेत.

## इतर क्षेत्रांतली हालहवाल.

ही विशेष सांगण्यासारखी नाहीं. पश्चिम रणक्षेत्रांत अगदीं पूर्ण निराशा झाल्यानंतर जर्मनी कदाचित् रशियाकडे वळून रिगावर आपली शक्ति एकवटून रोख धरील असा सुमार दिसतो. काकेशस पर्वतांतल्या दोस्त राष्ट्रांच्या सैन्याला शत्रू सैन्याकडून फारसा विरोधच होत नाहीं, तसा विरोध करून ब्रिटिश फौजेला मागें हटायला लावण्याचें सामर्थ्य तुर्की फौजेच्या ठायीं नाहीं हें आतां चंद्र सूर्याच्या प्रकाशाइतकें स्पष्ट आहे. सालोनिकावर मधून मधून हवाई जहाजांतून हल्ले होतात, या पलीकडे तिकडची ही विशेष खबर नाहीं. सगळें आलबेल आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. जर्मन झेपलिन तेथपर्यंत गेलें, पण परत येऊं शकलें नाहीं !

## तहाच्या गप्पा.

आजपर्यंत तहाविषयींच्या गप्पा इतके वेळां उठल्या आणि खोट्या ठरल्या कीं त्यांवर आतां एखादें शेंबडें पोर सुद्धां भरंवसा ठेवणार नाहीं. तरी अजून मधूनमधून त्या उठतातच. युद्धाच्या गंभिर वार्ता एकून क्षुब्ध झालेल्या चित्ताला किंचित्काळ तरी शांतता प्राप्त व्हावी व घटकाभर करमणूक व्हावी येवढ्याच साठीं रूटरसारखे बातमीदार शेकडों रुपये खर्चून त्या नगभर पाठवित असावे अशी ही शंका येते. या गप्पा उठविणारे जर्मन लोकच असावे अशी शंका आह्मीं मागें अनेकवेळां व्यक्त केली आहे. पण त्या वेळीं तो आमचा नुसता तर्क होता. या आमच्या शंकेला पुष्टी देणारें प्रमाण लिटररी डायजेस्ट नांवाच्या अमेरिकन पत्रांत नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. त्या पत्रानें स्पष्ट ह्मटलें आहे कीं चीनमधील जर्मन वकिलानें स्वतःच्या खर्चानें हस्तपत्रकें छापून चिनी लोकांना असें भासविलें आहे कीं रशियानें तहाविषयींचें बोलणें जर्मनीशीं लावून तह करून ही टाकला. रशियानें आपलीं कित्येक महत्त्वाचीं ठाणीं जर्मनीला दिलीं आणि आतां युरोपांत जर्मनीचें पूर्ण साम्राज्य झालें आहे ! चिनी लोक या गप्पांवर भरंवसा ठेवण्याइतके दुधखुळे कदाचित् असतील, पण हिंदुस्थान, कानडा, आस्ट्रेलिया, वगैरे सर्व राष्ट्रांतले लोक इतके भोळे खास नाहींत. व्हर्डुन पाशीं जर्मनीची चाललेली फजीती तारांच्या द्वारें त्यांना रोजचे रोज Comm... कळत आहे. ते असल्या बात ...तील अशी अपेक्षा करणें

आठवड्यांत

अविश्वसनी birth or by naturalization ( or a

अमेरिक

गप्प ...ommissioner or Political Agent should ...eads of Schools or Colleges.

करून ...tity intending to apply subsequently

उत्कट ...to visit a foreign country are

कोणी ...passport as of right on the sole

सध्यां ...he production of a certificate of

दार प... insufficient to secure the grant of a ...mentary evidence of respectability ...er authority competent to issu

रिकन holder is a fit and proper person to

व्य

मनें शांत करण्यास तहाची गोष्ट काढून मागच्या सगळ्या गोष्टींवर विरजण घालणें हाच एक उपाय केसरला आहे. ही संधी साधून तहाच्या गप्पा बाहेर पसरविण्यांत आल्या आहेत. पण जर्मनीच्या फायद्याच्या सगळ्या अटी कबूल करून दोस्त राष्ट्रें तहास संमति देतील या गोष्टीवर जगाचा विश्वास बसणें शक्य नाहा हें त्या गप्पीदासाच्या लक्षांत आलें नाहीं.

## समेट.

(प्रेषित)

सध्यां जिकडे तिकडे विशेषतः कांग्रेसमध्यें दुफळी करण्याचें कंकण सुरत कांग्रेसच्या पूर्वी ज्यांनीं हातांत बांधलें होतें व तें कार्य सिद्धीस गेल्यानंतर आपण स्वतःचे पायावरच धोंडा पाडून घेतला, व दुसऱ्यांस खड्यासारखे वेंचून फेकून देण्याऐवजीं स्वतःच तसे फेकले गेल्याबद्दल पराकाष्ठेचें वाईट वाटत आहे अशा जहाल पक्षाचे तोंडून 'समेट, समेट, समेट' ह्या शद्बाचा जप चाललेला ऐकूं येत आहे. बेळगांवच्या जहाल प्रांतिक परिषदेंत हा समेटाचा ठराव खुद्द रा. टिळक यांनीं पुढें आणिला होता. यवतमाळच्या प्रांतिक परिषदेंत ही तोच प्रकार घडला. कांग्रेसनें ही उदार मनानें पश्चात्ताप पावलेल्या आपल्या जहाल बंधूंना कांग्रेसच्या पवित्र मंदिरांत प्रविष्ट होऊं देण्यासाठीं त्या मंदिराचा दरवाजा अर्धवट खुला ठेवण्याचा ठराव गेल्या दिसेंबरमध्यें करून ठेवलाच होता. जहाल पक्षांतल्या धेंडांना या छोट्याशा द्वारांतून प्रवेश करणें अपमानास्पद वाटत आहे, तथापि तूर्त कालमानाकडे दृष्टि देऊन आणि अनन्यगतिक होऊन त्यांनीं मिळालेली सवलत सवा लाखाची समजून तिचा फायदा करून घेण्याचा इरादा केला आहे ही आनंदाची गोष्ट आहे. तथापि कांग्रेसमध्यें प्रवेश केल्यानंतर तेथें पूर्वींच्या सारखा आगलावेपणा करावयाचा असला तर तुह्मी बाहेर आहां तेच चांगले आहां. आंत यावयाचें असलें तर कांग्रेसच्या नियमांप्रमाणें वागून देशहितासाठीं स्वार्थबुद्धि बाजूला सारली पाहिजे अशा स्पष्टोक्तीनें युक्त भाषण मि. गांधी यांनीं करून जहाल पक्षाला इषारा देऊन ठेविला आहे. कांग्रेसला शांतता व सहकारित्व पाहिजे आहे. या गोष्टी जहालांकडून मिळेनातशा झाल्या तेव्हां निरुपायास्तव तिला आपलीं द्वारें बंद करावीं लागलीं होतीं. आतां जहालांच्या पुढाऱ्यांना ... रा. ... कळून येऊन ... आहे. नियमास ... आनं- आणि ... वर्षे ... ाचा आहे. एक ...या ... आहेल, ... नायोग ...पाशी ...ऱ्या ... आंत ...पशी ... तर ... कार्य

नव्हती. कांग्रेसनें जहालपक्षाला खड्यासारखे बाहेर फेकून दिलें तें कांहीं सुखानें किंवा व्यक्तिद्वेषामुळें नव्हे, तर केवळ कांग्रेससारख्या राष्ट्रीय संस्थेच्या जिवावरील आपत्ति टाळण्यासाठीं होतें. खिशांत बिस्तव बाळगून आपण निर्धास्त आहों ह्मणून झोप घेण्याइतके मूर्ख त्या संस्थेचे चालक खास नाहींत. दुरभिमान, व अंतःकलह यांचे चटके बसूं लागतांच त्यांनीं त्या दुरभिमानाचें व अंतःकलहाचें मूळच उपटून फेकून दिलें. शरीराचा एखादा भाग कुजला ह्मणजे कुशल शस्त्रवैद्याकडून तो भाग कापवून फेकून द्यावा लागतो, तसा प्रकार कांग्रेसला करावा लागला होता. जहालपक्ष व नेमस्तपक्ष यांच्यांत जबरदस्त मतभेद उत्पन्न झाला. नुसते मतभेदच उपस्थित होऊन राहिले नाहींत तर त्याच्याबरोबर परस्पराविषयीं कुत्सितपणाच्या कल्पना, तिरस्कारबुद्धि व वैमनस्य यांचा ही प्रादुर्भाव झाला. नेमस्तपक्षाच्या हेतूंचा विपर्यास करण्याची कोणतीहि संधी जहाल पत्रांनें दवडली नाहीं. ना. गोखल्यासारख्यांचीं विद्रूप चित्रें समाजापुढें मांडण्यांत जहालपक्षांतल्या प्रमुखांनीं आपली लेखणी व जीभ झिजविली. प. वा. मेथा सारख्यांना जुलमी बादशहा ह्मणून त्यांचीं नालस्ती करण्याचें व्रत त्यांच्या मरणापर्यंत एकनिष्ठतेनें चालविलें. देशहितासाठीं स्वार्थत्याग करून हिंदुस्थानसरकारच्या कार्यकारी मंडळाचें सभासदत्व केवळ मातृभूमीच्या कार्यार्थ ज्यांनीं स्वीकारलें व सरकारी अधिकाऱ्यांशीं बाणेदारपणानें वर्तन ठेवून त्यांच्या ही मनांत स्वतःविषयीं आदर उत्पन्न करून ठेवला त्या सर सत्येंद्र प्रसन्न सिंहाविषयीं मळमळत्या शंका प्रसृत करण्यास जहालपक्षानें सोडलें नाहीं. पण ज्या कांग्रेसपक्षीय नेमस्त पुढाऱ्यांनीं मनाची शांति ढळूं न देतां मानसिक औदार्य दाखवून अशी नालस्ती करणारांना ही आपणांस येऊन मिळण्यासाठीं कांग्रेसच्या नियमांत मुद्दाम वाट करून ठेविली, ते नेमस्त 'जितं मया' अशी प्रौढी मिरवून जहाल पक्षाचा पाणउतारा करतील अशी जी भीति रा. टिळक यांस वाटत आहे ती निरर्थक आहे. खरी भीति निराळीच आहे. ती कोणती तें कांग्रेसचा आजपर्यंतचा इतिहास ज्यांना ठाऊक आहे त्यांना स्पष्टपणें बोलून दाखवयास नको. सुदैवानें ती भीति खोटी ठरून सर्वांना पसंत झालेल्या तत्त्वावर होऊं घातलेला समेट घडून येवो व यापुढें तरी कांग्रेसचें शरीर जरासंधाच्या शरीराप्रमाणें पुनः बेमालूमपणें सांधलें जाऊन त्या शरीराला प्रस्तुतच्या समेटानें पुष्टि व तुष्टि प्राप्त होवो असें आह्मी मनापासून चिंतितों.

## इंग्रज अधिकाऱ्याच्या आठवणी.

मे महिन्याच्या मॉडर्न रिव्ह्यूच्या अंकांत मि. स्लीमन साहेबांनीं इकडे अधिकारावर असतां प्रत्यक्ष पाहिलेल्या व पुस्तकांत लिहून ठेविलेल्या कित्येक मजेदार गोष्टी संबंधाचा एक लेख आला आहे व तो अवश्य वाचनीय आहे. दीडशें वर्षांपूर्वी हिंदुस्थानची स्थिति कशी होती हें जाणण्याची उत्सुकता ज्यांचे ठायीं असेल त्यांना तर हा लेख फारच गमतीचा वाटेल. त्या काळच्या स्थितीवर या लेखानें बराच प्रकाश पाडलेला आहे आणि यद्यपि कित्येक बाबतींत त्या वेळच्या व आतांच्या स्थितींत विलक्षण सादृश्य दिसलें तरी हें सादृश्य इतकीं वर्षे टिकलें कसें याचा विचार करण्यास ही ती हकीकत उत्कृष्ट साधन होईल. मि. स्लीमन यांच्या काळीं देशी रजवाड्याची जी स्थिति होती तिच्यांत व आतांच्या स्थितींत स्थूलमानानें जमीन अस्मानाचें अंतर पडलें असलें तरी हिंदी राजांच्या मनाच्या समजुती व त्यांचे आचरण फारसें पालटलेलें दिसणार नाहीं. तेहरीचे राजेसाहेब कार्तिकांत तुळशीच्या विवाहाप्रीत्यर्थ आणि ब्राह्मण भोजनाचे पायीं आपल्या राज्याच्या एकंदर उत्पन्नाचा एक चतुर्थांश खर्च करीत असत. रयतेनें उन्हातान्हांत कष्ट करून सरकारला दिलेला येवढा पैसा अशा रीतीनें राजे लोक उधळीत याबद्दल इंग्रजांना आश्चर्य वाटतें. पण याहून कांहीं निराळा प्रकार आज देशी संस्थानांत दिसत आहे काय? असा प्रश्न त्यांनीं आपल्या मनाशीं करावा. पूर्वींचे राजे लोकांचे ठायीं धार्मिक श्रद्धा जबर होती. ह्मणून रयतेच्या पैशानें ते तुळशीचा विवाह लावण्यानें किंवा अन्नदान करण्यानें पुण्य संचय करीत आहों व हां पुण्यसंचय रयतेच्या कल्याणार्थच आहे अशी त्यांची दृढ भावना होती. आजकालचे संस्थानिक या उच्च भावनेनें नव्हे, तर केवळ चैनीखातर मोटारगाड्या खरीद करण्यांत, हवा बंगले बांधण्यांत, पहिलवानांच्या कुस्त्या लावण्यांत, किंवा वेश्यांना खुष करण्यांत एकेका दिवसांत पंनास हजार रुपये उडवीत आहेत, अथवा साहेब लोकांना देण्यांत येणाऱ्या मेजवान्यांचे पायीं आपल्या रयतेची उपासमार करीत आहेत, असा प्रकार दिसतो यांतलें इंगित काय? तर राजाची सत्ता अमर्यादित, त्यांचेवर कोणतीही जबाबदारी नाहीं, रयतेच्या पैशाचा वाटेल तसा विनियोग करण्याचा त्यांना पूर्ण अधिकार आहे अशी राजे लोकांची झालेली समजूत या वर्तनाच्या मुळाशीं आहे आज दिडशें वर्षे इंग्रजी शिक्षणाचा प्रसार व पाश्चात्य कल्पनांची वाढ देशांत होत आहे, तरी आमच्या राजे लोकांच्या या कल्पना, मग दीडशें वर्षांपूर्वी काय विचारावयाचें आहे? आमच्या राजेरजवाड्यांच्या ठायीं नव्हे तर इंग्रज अधिकाऱ्यांच्या ठायीं सुद्धां कित्येक फार विचित्र कल्पना होत्या. लॉर्ड कर्झन यांनीं प्राचीन इमारतीचे रक्षण करण्याचें श्रेय घेतलें. पण त्याच गव्हर्नर जनरलचे पदावर एके काळीं आरूढ झालेल्या मार्किस ऑफ हेस्टिंग्स साहेबांनीं ताजमहालाचे कांहीं भाग पाडून त्याचें संगमरवरी दगडाचे एक स्नानपात्र विलायतेस चौथ्या जॉर्ज राजाला नजराणा ह्मणून पाठविण्याचा विचार केला होता असें मि. स्लीमन साहेबांच्या पुस्तकांत ह्मटलें आहे! इंग्लंडांत त्याकाळीं संगमरवराला जर बाजारांत चांगला भाव असता, तर आग्र्याच्या ताजमहालाचा मागमूस तरी या घटकेला शिलक राहिला असता कीं नाहीं कोण जाणे!

## आयर्लंडांतला राजद्रोह.

हिंदुस्थानानें राजनिष्ठेनें प्रेरित होऊन ब्रिटिशराज्याच्या उन्नतीसाठीं व संरक्षणासाठीं तनमनधन अर्पण करून जी अपूर्व क्रांति करून दाखविली तिची किंमत त्याचवेळीं ब्रिटिश राज्यांतल्या दुसऱ्या कित्येक भागांत खुद्द इंग्रजांच्याच भाऊबंदांनीं केलेल्या निंद्य व गर्हणीय आचरणामुळें अधिकच वाढली आहे. दक्षिण आफ्रिकेंत थोड्या महिन्यापूर्वी झालेल्या बंडाचा इतिहास लक्षांत घेतला, किंवा या घटकेला आयर्लंडमध्यें जी खळबळ सुरू आहे व जिच्यामुळें ब्रिटिश सरकारवरील संकटांत मोठी भर पडली आहे तिचा विचार मनांत आणिला, ह्मणजे शस्त्रें धारण करण्यास परवानगी देण्याइतका सुद्धां विश्वास ज्या हिंदुस्थानासंबंधानें इंग्रज सरकारास अद्याप वाटत नाहीं तो हिंदुस्थानदेश खरोखर मनाचा किती निर्मळ आणि ब्रिटिश राज्याविषयीं किती निःसीमपणानें एकनिष्ठ आहे याची खरी कल्पना ब्रिटिश मुत्सद्यांना करतां येईल. हिंदुस्थानांतल्या लोकांना चिथावण्याचे प्रयत्न जर्मनीकडून यापूर्वी झाले; पण ते अगदीं फोल व निष्फल ठरले असें गतवर्षी खुद्द व्हाइसराय साहेबांनीं सर्टिफिकेट दिलें व त्यानंतर घडलेल्या एकंदर प्रकारावरून त्या सरटिफिकेटांतलें प्रत्येक अक्षर खरें आहे हें सिद्ध झालें. आयर्लंडच्या लोकांना ही चिथविण्याचा जर्मनीनें तसाच प्रयत्न केला आणि तो तेथें अंशतः तरी सिद्धीस गेला! आयर्लंडच्या नांवाला हा कलंक लागल्याबद्दल कोणासही अत्यंत खेद वाटल्यावांचून राहणार नाहीं. यावरून आयर्लंड तें आयर्लंड व हिंदुस्थान तें हिंदुस्थान अशी आतां तरी ब्रिटिश सरकारची खात्री होईल अशी आह्मी आशा करतों. इंग्लंडच्या अगदीं ढुंगणा शेजारीं आयर्लंडांत राजद्रोहाचें बीजारोपण झालेलें प्रत्यक्ष बंड होईपर्यंत इंग्लंडला कळूं नये हें आश्चर्य तर खरेंचा पण अशा आयर्लंडला ही स्वराज्याचे हक्क देण्यास जे ब्रिटिश मुत्सद्दी तयार होतात, त्यांनाच पांच हजार मैलांवर असून ही आपली शांतता व राजनिष्ठा अढळ ठेवणाऱ्या हिंदुस्थानाला स्वराज्याचा हक्क भोगण्याची पात्रता प्राप्त झालेली दिसूं नये ही अधिक आश्चर्याची व खेदाची गोष्ट ह्मटली पाहिजे.

## संग्रामोर्मी.

या प्रांताशी 'जटार' घराण्याचा जितका निकट संबंध आहे तितका संबंध दुसऱ्या दोन चार घराण्यांचाच आढळून येईल. जटार घराण्यानें आज पन्नास वर्षे वऱ्हाडच्या शाळाखात्यावर किंवा एखाद्या जिल्ह्यावर सारखा अंमल ठेविला आहे. तो प्रत्येकास कौतुकदायक व आल्हादजनकही वाटतो याच घराण्यांतील कै. राव बहादूर श्रीराम भिकाजी जटार यांचे तृतीय चिरंजीव राजश्री डाक्टर नीळकंठराव आय एम. एस. हे हल्लीं मेसोपेटेमियामध्यें रणांत व्यथित झालेल्या सैनिकांस औषधोपचार करण्या करितां विलायतेहून अभ्यासक्रम पुरा करून लवकरच थोडे महिने राहिल्या बरोबर पाठविले गेले आहेत. सर्व आय. एम. एस, लोक लष्करी आफिसर असतात तसे हेही लष्करी खात्यांतील अंमलदार आहेत. यांच्या योग्यतेमुळें इतक्या अल्पकाळांत यांस जबाबदारीच्या

कामावर व जेथें त्यांचा अति उपयोग होईल अशा ठिकाणीं सरकारनें विश्वासानें पाठविलें आहे. हे जनरल टौनशेंड यांच्या हाताखालीं सैन्याच्या तुकडी बरोबर आहेत. त्या सैन्याबरोबर यांना ही तुर्कस्थानच्या हस्तगत व्हावें लागले आहे. यांच्या उपयुक्ततेमुळें यांस लवकरच मोबदल्यांत पुनः आपल्या लोककार्यासाठीं हरयुक्तीनें सरकार मुक्त करणार आहेत.

## मनोरंजनाचा वसंत अक.

हा पुढानें उपस्थित केलेल्या अडचणीं मुळें आटोपशीर आकाराचा निघाला आहे, तथापि त्यांतले लेख चांगले वाचनीय आहेत. प्रो. कानिटकर यांनीं किर्लोस्करबंधू या नांवानें प्रसिद्ध असलेल्या कारखान्याचे उत्पादक रा. लक्ष्मणराव किर्लोस्कर यांचे चरित्रपर लिहिलेला लेख वाचनीय व सद्यःस्थितींत अत्यंत महत्वाचा आहे. उद्योगधंद्यांत आपली बुद्धिमत्ता खर्चून युरोपियन पद्धतीनें कारखाना चालविणाऱ्या लोकांचा गौरव सध्याचे काळीं अवश्य झाला पाहिजे. श्री. सौ. गिरजाबाई केळकर यांचा 'लग्नांतील मानापमान' हा लेख समाजांत खरोखर सुधारणेला आरंभ कोठें व्हावयास पाहिजे तें बिनचूकपणें दाखविणारा आहे. लग्नांतल्या मानपानाचे बाबतींत जुन्या अशिक्षित बायकांपेक्षां नव्या सुशिक्षित बायकाच अधिक हट्टीपणा व अहंभाव धरून वधूपक्षाचा छळ करीत असतात. त्यांच्या डोळ्यांत सौ. गिरजाबाईचा लेख अंजन घालील तर एक मोठें कार्य होईल. रा. कोल्हटकरांचा 'साधुसंत' हा विनोदपर लेख वाचनीय आहे. सध्या गुरूंचे बंड ठिकठिकाणीं आहे व त्यांच्या भजनीं लागलेल्यांत चांगलीं शिकलीं सवरलेलीं माणसें ही आढळतात. रा. कोल्हटकरांचा लेख वाचून त्यांचा मूर्खपणा त्यांना दिसून आला तर फारच चांगलें होईल. रा. खर देसाई यांचा लेख शास्त्रीय स्वरूपाचा आहे; पण मनोरंजक असून बोधप्रद ही आहे. सृष्टींत पशी मनुष्यप्राण्याचें हित करीत असतां माणसानें कृतघ्नपणानें उपकार कर्त्यांच्याच वधाला तयार व्हावें, व त्यापायीं स्वतःच्याच हितावर धोंडा पाडून घ्यावा हा केवढा अविचार! पण केवळ फ्याशनच्या नादीं लागलेला युरोपियन समाज हा अविचार कसा करीत आला आहे हें रा. खर देसाई यांनीं चांगलें दाखविलें आहे. दुसरे ही कित्येक चांगले वाचनीय लेख आहेत. पहिली गोविंदाग्रजांची प्रेम आणि मरण ही कविता तिच्या अगदीं साध्या पोशाखांत फारच बहारीची उतरलेली आहे. एकंदरीनें लेखाचें अंतरंग उत्तम झालें आहे बाह्यांग अडचणीमुळें खुलवितां आलें नाहीं आणि आमच्या मतें केवळ बाह्यशोभेसाठीं हिंदुस्थानासारख्या दरिद्री देशानें हजारो रुपये निष्कारण ओतावे हें इष्ट ही नाहीं. मनोरंजनाचे चालक बाह्यांगापेक्षां अंतरंगाकडेस असेंच विशेष लक्ष यापुढें ही घालतील तर 'मनोरंजन' आपल्या नांवाची सार्थकता करून दाखवील.

## यवतमाळ जिल्हा परिषद.

या परिषदेचा सर्व वृत्तांत नागपूर येथील महाराष्ट्र साप्ताहिकांत चांगला समग्र आलेला आहे. अध्यक्ष नामदार रावश्री मोरोपंत दिक्षित यांचें संभाषण हल्लींच्या सर्व राष्ट्रीय प्रश्नासंबंधानें विशेष जोरदार होतें. दुसरें दिवशीं म्हणजे गेल्या ७ व्या तारखेस एकंदर १६ ठराव परिषदेनें पास केले आणि ठराव सभेपुढें मांडतांना निरनिराळ्या वक्त्यांचीं भाषणें यवतमाळ जिल्ह्याला शोभण्या सारखींच होतीं. मुख्य इजारदार बिलासंबंधाचा प्रश्न उहापोहानें लोकांच्यापुढें येईल असें वाटलें होतें पण त्या बाबतींत निराशाच झाली. यवतमाळच्या जिल्हा परिषदेनें घालून दिलेला हा नमुना अग्रभागीं असलेल्या इतर जिल्ह्याना लक्षांत घेण्यासारखा आहे.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—ऊन अतिशय प्रखर असून अभ्रामुळें तलखी विशेष होते आणि अलीकडे ४-२ दिवस अंगाला झोंबणारे कढत वारे ही रात्रौ सुटत आहेत. या अत्युष्ण प्रकाशानें जमीनी चांगल्या सुपीक होतात; पण त्या मानानें इकडील माणसांचीं शरीरें सुख कां पावत नाहींत हें एक गूढच होय.

रा. रा. ब्यॉटन साहेब फर्स्ट आडिशनल ज्युडिशियल कमिशनर यांस उन्हाळ्याच्या सुट्टीला लागून आणखी ३ महिन्याचीं हक्काची रजा देण्यांत आली आहे. आणि यांच्या रजेच्या अदला बदलींत रा. रा. ज्योतिश्चंद्र मित्र बॅरिस्टर यांस थर्ड आसिस्टंट ज्युडिशियल कमिशनर नेमण्यांत येणार असल्याची बातमी आहे.

रा. रा. शहा महमद इशाक तहसिल्दार चिखली यांस आफिशियेटिंग ए. असिस्टंट कमिशनर करून बुलडाणा येथें नेमण्यांत आलें.

रा. रा. नरहर काशीनाथ मोहगांवकर जज्ज स्माल काज कोर्ट उमरावती यांस वर्धा येथें सार्बार्डिनेट जज्य नेमण्यांत आलें आणि उमरावतीच्या कोर्टावर रा. रा. रघुनाथ महादेव डोंई यांस नेमण्यांत आलें.

**आनंदोत्सव**

घरोघर मंगल कार्य म्हणजे त्यांच्या धनदौलतीचीं, मनाच्या आनंदाचीं व शांतिसमृद्धीचीं प्रदर्शनेंच असतात आणि त्या मानानें येथील जुन्या 'सावतराम रामप्रसाद' पेढीचे मालक कुमार किसनलाल याच्या विवाहाचा समारंभ येथें दोन चार दिवस थाटमाटानें चालू आहे. या लग्नानिमित्त मुंबईची प्रसिद्ध कलावंतीण **केसरबाई** व बंगालची विख्यात कलावंतीण **मौहरजान** ह्या येथें आल्या असून यांच्या गाण्याचा लाभ घेण्यासाठीं सर्व लहानथोर मंडळी लग्न मंडपांत आनंदानें गर्दी करीत आहेत. या थाटमाटाच्या उत्सवाबद्दल वरमाता श्रीमती कस्तुरीबाईस आनंदित झालेलीं अंतःकरणें धन्यवाद देत आहेत. लग्नाकरितां उभारलेला श्रीमंती मांडव मोठा नमुनेदार व दर्शनीय आहे. आणि त्याला अनुरूप तेथें विजेचे दिवे ही शोभा आणीत असतात.

## NOTICE

Wanted a qualified (Matriculate or School final) experienced teacher for the post of an assistant teacher in the Municipal Anglo-Vernacular school on Rs 30 per month.

Candidates should put in their applications with testimonials before the 31st.may1916.

Malkapur Dated 10th may1916

Md. Mansurali khan
Vice Chairman Municipal
Committee Malkapur

N. N. 177

## नोटीस

या नोटीसीनें आकोलें येथील सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं आकोला म्युनिसीपाल कमेटीचें घरपट्टी, भंगी पट्टी व गाडी जनावर पट्टीचें सन १९१६-१७ साला इडऊ असेसमेंट लिस्टस तयार होऊन पास झाल्या आहेत तरी ज्या कोणाची वरील संबंधानें काहीं तक्रार असल्यास त्यानें या नोटीसीचे तारखे पासून एक महिन्याच्या आंत आमचे कडेस अर्ज करावा कळावे

ता. १०-५-१९१६

A. S Khan
Vice Chairman
Municipal Committee Akola

178

## NOTICE

The following extract from Government of India, Home Department Resolution No. 2951-2964, dated the 18th December 1914, is published for general information.

NAGPUR: The 8th May

F. S. A. Slocock
*Chief Secretary to the Chief Commissioner, Central Provinces.*

### RESOLUTION.

2. Every native of India who contemplates proceeding out of India to foreign countries is strongly urged before leaving to furnish himself with an authoritative certificate of identity, in the appended form, signed by the Deputy Commissioner, in the case of residents of British India, and by the Political Agent in that of residents of Native States. In the case of a student the certificate should be signed by the head of his last school or college and countersigned by the Deputy Commissioner or Political Agent, as the case may be.

Appeals for assistance by destitute Indians who desire repatriation and by students who, owing to embarrassed circumstances, are unable to complete their course of education, cannot be dealt with satisfactorily unless the parties are in a position to produce evidence of identity. The possession of a certificate of identity will be specially useful to young men of good family, as it may enable the Secretary of State to obtain for them social and other attentions.

Those who are desirous, however, of travelling in countries where a passport will be necessary are advised to furnish themselves with such a document also before leaving India, in lieu of, or in addition to, a certificate of identity. It should be remembered that no person is entitled to a passport, as of right, on the ground that he is a British subject, and the production before authorities outside India of a certificate of identity, unless supplemented by documentary evidence of respectability, is not sufficient to ensure that a passport will be granted.

### FORM OF CERTIFICATE OF IDENTITY.

1. Name of applicant ____________________
2. Father's name and caste ____________________
3. Residence ____________________
4. Age of applicant ____________________
5. * Nationality of applicant ____________________
6. Social or pecuniary status of father (or guardian) ____________________
7. Date of probable departure of applicant form India ____________________
8. Object of applicant's visit to England (Europe) / America / Japan. ____________________

Signature of Deputy Commissioner or Political Agent, or Head of School or College.†

Signature of applicant,

Signed before me,
Deputy Commissioner or Political Agen

Dated ____________________

* i. e. Whether a British subject by birth or by naturalization (or a subject of Native State.)

† Countersignature of the Deputy Commissioner or Political Agent should be obtained on certificates signed by Heads of Schools or Colleges.

NOTE.—Holders of certificates of identity intending to apply subsequently in England or elsewhere for a passport to visit a foreign country are warned that no person is entitled to a passport as of right on the sole ground that he is a British subject. The production of a certificate of identity, therefore, will not ordinarily be sufficient to secure the grant of a passport, unless it is supplemented by documentary evidence of respectability endorsed by a local Government or other authority competent to issue passports in India, certifying that the holder is a fit and proper person to receive a passport.

179

## कापुस— तक्ता— साप्ताहिक— ६ मे १९१६ पर्यंत

| जिल्हा. | वर्ष. | काटन मार्केट — आयात — कापसाच्या गाड्यांची संख्या. | | रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या. | |
|---|---|---|---|---|---|
| | | ६-५-१६ पर्यंतचा आठवडा. | १।९।१५ पासून | ता. ६।५।१६ पर्यंतचा आठवडा | १।९।१५ पासून |
| [अ]मरावती | चालूं साल | १,६२५ | १९७३७३ | १८८ | ९,३८६ |
| | गुदस्त | ८४० | १६०९३२ | २५० | ८,२२१ |
| | तिगस्त | ५५७ | १६७९५५ | १९४ | १६,४१८ |
| [य]वतमाळ | चालूं साल | १३ | ३२,५३१ | ४९८ | २३,२८४ |
| | गुदस्त | १६ | ३७,४०७ | ३६० | १६,७१९ |
| | तिगस्त | ५९ | ५५,९०९ | २३७ | १५,१७२ |
| [आ]कोला | चालूं साल | ९९६ | २१२७७२ | २७१ | ७,८७७ |
| | गुदस्त | १,०५२ | १५२१५८ | २६९ | ८,४३० |
| | तिगस्त | ७१२ | २१३३३६ | ३१४ | ३०,०५१ |
| [बु]लडाणा | चालूं साल | ९५० | १९९००५ | १६१ | ७,७७७ |
| | गदस्त | ७१८ | १५०९८३ | १८५ | ४,६७२ |
| | तिगस्त | ४२६ | १६५१११ | ९१० | ३१,०९८ |
| [एकू]ण वऱ्हाड | चालूं साल | ३,५८४ | ६४१६८१ | १,११८ | ४८,३२४ |
| | गुदस्त | २,६२६ | ५०१४८० | १,०५४ | ३८,०४२ |
| | तिगस्त | १,७५४ | ६०२३११ | १,६५५ | ९२,७३९ |

[टी]प— चालूं सालाच्या बरोबरीचे साल गुदस्त व तिगस्त सालचे आठवडे ८ मे १९१५ व [?]२ मे १९१४ पावेतों होते.

सी. जी. लेस्टवीच
डायरेक्टर ऑफ आग्रिकल्चर आणि इंडस्ट्रीज मध्यप्रांत


Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY.

FUNDS exceed 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

Claims paid 4½ CRORES

A Novennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurance |
|---|---|---|
| | | Rs. |
| 1879 | 1,034 | 31,00,950 |
| 1888 | | 2,63,38,000 |
| 1897 | 26,522 | 6 37,26,354 |
| 1906 | 48,147 | 9,45,63 407 |
| 1915 | 64,738 | 12,23,63.755 |

| Year. | Total Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 1879 | 1,30,109 | 1,70,695 |
| 1888 | 11,48,642 | 36,38,694 |
| 1897 | 28,85,976 | 1,3390.729 |
| 1906 | 884 [illegible] | [?]84,76155 |
| 1915 | 72,96,901 | 5.25 539 |

*SPECIAL FEATURES.*

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuousl[y] increasing prosperity.
Ninety per cent of t[he E]ntire Profits, after providing for the Reserve divided among the Policyholders every 3 years.
Native Lives are accepted at the same rates as Europeans
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

***Influential and active agents wanted Terms liberal***

———:0-———

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

R. Paterson Brown
Manager

*A. C. Lal,*
Branch Secretary
*C. P. Berar & Khandesh*
Nagpur

N. N. 22



ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखाना:—मुर्डी.

**मदनामृतसंजीवनी.**

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता [?]डक गर्मी.संबं मुरकेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी [?]तील रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळातरोग, मधुमेह. जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व [?]डाळ भरपूर पचूं लागतें. त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल. दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह. तिडीक, मुत्रांची कळा, संकोच, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसतां सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० ॥ भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवें.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत. याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, प्रथोक्त रसायनें, भस्में, पाक, गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ताः—मु० मुर्डी, पो० हर्णे, जिल्हा रत्नागिरी.
कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

ना० नं० २०


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

# नोटिस

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं, आकोला जिल्ह्यांतील सोबतच्या फर्दींत दर्शवि-
ले जिल्हा बोर्डाचे रस्ते, स्प्रिंगचे ( कमानीचे ) टांगे, किंवा गाड्या आणि ज्यांना चार
ग शिवाय जास्त बैल ओढण्यास लागत नाहींत, अशा सर्व साधारण गाड्या, या खेरीज
न्या कोणत्याही कामाकरीतां उपयोगात आणावयाचे नाहींत.

सोबत जोडलेल्या नमुन्यांत, आणि खालीं दिलेल्या नियमानुसार असलेला लेखी करारनामा
ल्हा बोर्डाचे चेअरमन, किंवा व्हाईस चेअरमन, यांनीं मंजूर केल्याशिवाय, साधारण गाड्यां-
[illegible] किंवा, दोन जोड्यापेक्षा जास्त बैल ओढण्यास न लागणाऱ्या गाड्यातुन, नेलीं
गार नाहींत, अशीं जड यंत्रें, किंवा शेतकीस लागणारि अवजारें, असल्या रस्त्यावरून
ार नाहींत. स्थानिक सरकारच्या मंजुरातीनें एखाद्या विविक्षीत रस्त्यानें यांत्रिक
मान नेण्याची हमी घेतली असेल, अशा वेळीं, प्रत्येक रस्त्याची किंवा यंत्राची, वस्तु-
ती पाहून, योग्य अशा फरका निशी, खालीं दर्शविलेल्या नियमा प्रमाणें एक परवाना,
निक सरकारा कडूनच मिळेल.

२ ) करारनाम्या शिवाय किंवा पूर्वी सांगितलेल्या परवान्याशिवाय, अगर दुसऱ्या
गत्याही रीतीनें, वर निर्दिष्ट केलेल्या, करारनाम्याच्या अटी मोडून, जिल्हा बोर्डाच्या रस्त्या_
न जड यंत्र किंवा नांगर, वखर वगैरे, सारखी, रस्त्यावर खुणा पाडणारीं आणि रस्ता
ाब करणारीं, दुसरीं शेतीचीं अवजारें, कोणीही मनुष्य, नेतांना, किंवा, नेण्याचा प्रयत्न
ति असताना, आढळला, तर त्यानें सदर्हू रस्त्याचा अन्यायानें उपयोग केला असें समजून,
यदेशीर रीतीनें त्याजवर खटला करण्यांत येईल.

## नियम

१ ज्या वेळीं जिल्हा बोर्डाचे ताब्यांत, असलेल्या रस्त्यावरून, एकामाग एक अशा जोड_
या साधारण गाड्यांतून किंवा ज्यांना ४ पेक्षां जास्त बैल ओढण्यास लागत नाहींत,
ा गाड्यांतून नेतां न येण्या सारखे जर जड यंत्र किंवा अवजारे नेण्याचा विचार
ल त्या वेळीं सदर्हू यंत्र अगर अवजारे नेणारे इसमास सोबत जोडलेल्या करारनाम्याच्या
न्यावर सही करावी लागेल.

२ असल्या प्रकारचे ओझे नेण्यास, परवानगी मागण्याकरितां, जिल्हा बोर्डाचे चेअरमन
र व्हाईस चेअरमन यांज कडेस, ज्या दिवशीं प्रवास सुरुं होण्याचा असेल त्या पूर्वी
ान २१ दिवस तरी अर्ज करावा. कांहीं विविक्षित प्रसंगीं चेअरमन किंवा व्हाईस
रमन २१ दिवसापेक्षा कमी मुदतींत केलेला अर्ज मंजूर करतील. परंतु
ल्या नियमांत सांगितल्याप्रमाणें व्यवस्था करण्यास पुरेसा वेळ मिळेल इतका अवकाश
दिल्यानंतर असावा. सदर्हू अर्जांत खालील मुद्यावर माहिती असावी.

( १ ) जो पदार्थ न्यावयाचा असेल त्याचे वजन ( शक्य असेल तर रेल्वे रिसीट-
वरून द्यावे अगर एखादे सर्टीफिकीट द्यावे )

( २ ) ओझे न्यावयास उपयोगात आणावयाच्या गाडीचें वजन.

( ३ ) वरील ओझे उचलण्या करितां एखाद्या एंजिनचा उपयोग करावयाचा
असला तर त्याचें वजन.

(४) गाडीचीं व एंजिनचीं चाकें किती आहेत.

(५) गाडीच्या अगर एंजिनच्या चाकाच्या पट्याचा व्यास व रुंदी.

(६) ज्या रस्त्यानें न्यावयाचें तो रस्ता व अंतर. ज्या ठिकाणाहून न्यावयाचें व
जेथें न्यावयाचे त्या ठिकाणांचीं नांवें.

(७) ओझें नेण्याची तारीख.

(८) ओझ्या बरोबर जाणाऱ्या जबाबदार गृहस्थाचें नांव व पत्ता.

(९) वळणाच्या आणि उताराच्या ठिकाणीं अरवात होऊं नये ह्या बाबतींत काय
पूर्व तयारी केली आहे त्याचा तपशील.

वजन व माप खालीं दर्शविलेल्या प्रमाणांत असावीं.

१ एका गाडीवर गाडीच्या वजनासुद्धां १६ टनापेक्षां जास्त ओझें असू नये.

२ चाकाचा व्यास १८ इंचां पेक्षां कमी असू नये.

३ ८ टना पेक्षां जास्त ओझें नेणाऱ्या गाड्यांच्या आखा मधील अंतर १०
फुटापेक्षां कमी असू नये.

जाण्याच्या गती संबंधानें आणि रात्रीं किंवा ज्या वेळीं ओझ्याच्या गाड्या
नेण्यांत येतील त्या वेळीं घ्यावयाच्या खबरदारी संबंधानें खालील नियम पाळले पाहिजेत.

गाडीचा वेग दरतासास ४ मैलापेक्षां जास्त असू नये.

२ गाड्यांचा प्रवास सरासरी प्रत्येक दिवशीं १० मैलापेक्षां कमी असु नये.

३ कमींत कमी अर्धा रस्ता तरी रहदारीस राहील अशा रीतीनें रस्त्याच्या एका
बाजूस रात्रीचेवेळेस गाड्या ओढून ठेवाव्यात.

४ अशा बाजूस ओढलेल्या गाड्यांना रात्रीच्यावेळीं पुढें २ व मागें २ असे
दिवे असावेत.

५ जिल्हा बोर्डाचे चेअरमन अगर व्हाईसचेअरमन यांची परवानगी घेतल्याशिवाय,
स्तापासून सूर्योदयापर्यंत प्रवास करूं नये. व अशी परवानगी फक्त जरूरीच्या वेळींच दिली जाईल.

६ सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत बाजूस ओढलेल्या गाड्याजवळ चौकीदार असावा.

मोडतोडीच्या वेळीं खालील सूचनाकडे लक्ष द्यावें.

मोडतोड झाल्यास ३४० तासाच्याआंत रस्ता साफ करण्याबद्दल मालक जबाबदार
राहील,

२ मोडतोडीची बातमी अगदीं जवळच्या डिस्ट्रिक्ट बोर्डाच्या अधिकाऱ्यास मालका-
च्या एंजटानें ताबडतोब द्यावी.

३ ओझें न्यावयास सोपें जावे म्हणून सबल किंवा दुसरीं अवजारें, ज्याच्यायोगा-
नें रस्ता खराब होण्याचा संभव आहे अशीं उपयोगांत आणूं नयेत.

(६) सोबतच्या नमुन्याप्रमाणें करारनामा करण्यापूर्वी, चेअरमन अगर व्हाईसचेअरमन,
यांनीं स्वतःची खात्री करून घ्यावी कीं ज्या रस्त्यावरून ओझें न्यावयाचे असेल त्या
रस्त्यावरील पुलास त्या ओझे नेण्यापासून कांहीं एक धक्का पोहोचणार नाहीं; आणि
त्यांच्यामतें जर असले पूल निरुपयोगी असले तर त्यांनीं ओझें वाहण्यास मनाई करावी
व तसे त्या अर्जदारास कळवावे. त्यायोगानें जे पूल सुरक्षीत आहेत किंवा नाहीं याबद्दल
कांहींच सांगितलें नाहीं अशा पूलावरून ओझें नेतांना, एंजिन किंवा दुसऱ्या कोण्याही
यांत्रीक अवजारास नुकसान झालें तर जिल्हाबोर्ड त्याबद्दल कोणत्याही रीतीनें जबाबदार
नाहीं.

जे ओझें न्यावयाचे आहे ते पूलावरून जाण्यासारखे नसल्यास, अर्जदारानें स्वतःच्या
खर्चानें बाजूला रस्ते काढावेत. ओझे नेण्याच्यावेळीं रस्त्याचा भाग अगर रस्त्याच्या हद्दी-
तील जमीन खराब केली असेल तर तो भाग अगर ती जमीन पूर्वीप्रमाणें सुधारून
देण्याची जबाबदारी अर्जदाराकडेच राहील.

(७) चेअरमन अगर व्हाईसचेअरमन ठरवितील ती रक्कम अर्जदारानें अमानत ठेवावी,
पण अशी रक्कम रस्त्याच्या प्रत्येक मैलास २० रु. यापेक्षां ज्यास्त असू शकणार नाहीं.
करारनाम्यान्वयें रस्ता दुरुस्त करण्यास लागणारी रक्कम या ठेवीच्या रकमेंतून वसूल
करून राहिलेली रक्कम, ओझे नेण्याचे काम संपल्यावर परत केली जाईल. पण रस्त्याला
किंवा रस्त्यासबंधीच असलेल्या दुसऱ्या कामास झालेलें नुकसान भरून काढण्यास जर
ही रक्कम अपुरी असली तर, चेअरमन अगर व्हाईसचेअरमन, यांचेकडून हुकुम येतांच,
१० दिवसाचे आंत बाकी रक्कम अर्जदारास द्यावी लागेल. या बाबतींत अपील करावयाचे
असल्यास मे. डेप्युटि कमिशनर साहेब यांचेकडेस करावे. व ते जो हुकूम देतील तोच
अखेरचा समजला जाऊन पुढ अपील करू दिले जाणार नाहीं.

(८) दुसऱ्या नियमा प्रमाणें दिलेली कैफियत खोटी आहे असें जर चेअरमन अगर व्हाईस
चेअरमन यांना वाटेल तर, त्यानें ठेवलेल्या अमानत रकमेस त्याला मुकावे लागेल. अशा
वेळीं मे. डेप्युटिकमिशनर साहेब यांचेकडेस अपील करण्याची मुभा आहे.

सही
K. G. Dasale
व्हाईस चेअरमन
जिल्हा बोर्ड आकोला

मेहरबान व्हाईसचेअरमन साहेब जिल्हा बोर्ड आकोला यांचे तर्फे सेक्रेटरी जिल्हा
बोर्ड आकोला यासी करारनामा लिहून दिला.

आज तारीख महिना सन

मी ———— राहणार ———— याजला

खालीं लिहिलेले वजनदार सामान,

संख्या वजन

खालीं दर्शविलेल्या गाड्या मधून

| संख्या | वजन | टायरची रुंदी | चाकाचा घेर | आंसामधील अंतर |
|---|---|---|---|---|
| | | | | |

खालीं दिलेल्या जिल्हा बोर्डाच्या ताब्यातील रस्त्यावरून वाहून नेण्याची परवानगी
मिळाली आहे.

रस्त्याचें नाव मैल

पासून पर्यंत.

सबब ह्या करारनाम्या सोबत जोडलेल्या नियमा बरहुकूम वागण्याचे ह्या लेखानें
मी कबूल करितो व मी रुपये अमानत ठेवीत आहे त्या मधुन मजकडे निघ
णारी योग्य ती रक्कम मे. व्हाईस चेअरमन जिल्हा बोर्ड यांनीं वसूल करून घ्यावी. वसूल
करावयाची रक्कम अमानत रकमेपेक्षां जास्त निघाल्यास सदर्हू रक्कम मला त्याबद्दल नोटिस
मिळाल्यापासून दहा दिवसाचे आंत मी भरणा करून देण्यास तयार आहे.

ज्या रस्त्यानें मला माल नेण्याची परवानगी मिळाली आहे त्या रस्त्यावरील, खालीं
दिलेले शिवाय करून, इतर पूल, मोऱ्या, फरशा, वगैरे योग्य तेवढे मजबूत वगैरे नस-
ल्यामुळें जर माझें कांहीं नुकसान झालें तर त्या बद्दलची जबाबदारी जिल्हा बोर्ड आकोला
यांचेवर न टाकितां तें मी जातीनें सोसण्यास तयार आहे. जो माल नेण्याची मला
परवानगी मिळाली आहे तो माल वाहून नेण्याकारितां सुरक्षित नसलेले असे जे कांहीं
पूल वगैरे मे. व्हाईस चेअरमन यांनीं खालीं दिले आहेत त्याचा उपयोग न करण्याचें
मी कबूल करितो.

| मैल. | फर्लांग | कामाचें वर्ण | |
|---|---|---|---|
| | | | |

ह्या करारनाम्याप्रमाणें जी रक्कम द्यावयाची ती रक्कम जर दिली नाहीं तर ती रक्कम सी. पी. ल्यांड रेव्हिन्यु आक्टाप्रमाणें ऐन काळीच्या वसूला प्रमाणें वसूल केली जाईल.

तारीख सही ——— अर्जदार

तारीख ——— साक्षीदार

तारीख ——— साक्षीदार

सही व्हाईस चेअरमन जिल्हा बोर्ड आकोला.

## जिल्हा बोर्डाच्या ताब्यांतील रस्त्यांची यादी.

### पहिल्या वर्गातील रस्ते

| | | मैल | फर्लांग |
|---|---|---|---|
| १ | पारस बाळापूर रस्ता | ६ | ० |
| २ | आकोला शिवनी रस्ता | २ | ६॥ |
| ३ | सांगवी ब्रॅांच रोड | १ | ० |
| ४ | वासीम कोंडाळा रस्ता | ० | ६ |
| ५ | पुसद अप्रोच रोड | १ | ५ |
| ६ | आकोला मलकापूर रस्ता | २ | २॥ |
| ७ | आकोला महान रस्ता | १८ | २॥ |
| ८ | आकोला रेल्वे स्टेशन रस्ता | ० | १ |
| ९ | मुर्तिजापूर रेल्वे स्टेशन पासून ते गांवापावेतों रस्ता | ० | ७॥ |
| १० | मुर्तिजापूर रेल्वे स्टेशन पासून ते काटनमार्केटच्या दक्षिणे कडचा रस्ता | ० | ३॥ |
| ११ | कुरम रेल्वे स्टेशन पासून ते कुरम गांवापर्यंतचा रस्ता | ३ | ० |
| १२ | काटेपूर्णा कुरणखेड रस्ता | १ | ३॥ |
| १३ | अनसिंग ब्रॅांच रोड | १ १/४४ | ० |
| १४ | आकोला गुडदी रस्ता | २ | २॥ |
| १५ | माना रेल्वे स्टेशन ते माना गांवापावेतों रस्ता | ०॥ | ६॥ |

### दुसरा वर्ग.

| | | मैल | फर्लांग |
|---|---|---|---|
| १६ | वाशीम आसोला रस्ता | १ | २॥ |
| १७ | बोरगांव गांवापासून ते स्टेशन पावेतों रस्ता | २ | ० |
| १८ | पारस रेल्वे स्टेशन पासून गांवात जाणारा रस्ता | ० | ७ |
| १९ | आकोला ड्राईव्ह रोड | २ | ० |
| २० | कापसी राजंदा रस्ता | २ २५/२६४ | ० |
| २१ | गायगांव निमकर्दा रस्ता | २॥ | ० |
| २२ | वाशीम रिसोड रस्ता | १२ | ० |

नो. नं. १८० व्हाईस चेअरमन डि. बोर्ड आकोला


# धंदे शिक्षक.

ह्मणजेच इंडस्ट्रियल इंस्ट्रक्टर. यांत श्रीमंतापासून गरिबापर्यंत नित्य व्यवहारांत लागणारे अनेक सर्वोपयोगी जिन्नस घरच्या घरीं तयार करून अल्प श्रमांत व थोड्या भांडवलांत ५-१० रुपये रोज प्राप्ति करून घेता येण्याजोगा मर.रीन आजपर्यंत प्रसिद्ध न झालेल्या केल्य- हुन्नरांची गुप्त व खरी माहिती देणारा धंदे–शिक्षक आजच मागवून पैसा मिळवा ! उद्योगी व्हा !! किंमत ८८ व्ही पी. नें ८१० आणे खास यादी फुकट.

ज्ञानामित्रकर्ते, शनवार पेठ पुणें सिटी.

नो. नं. १५८


## NOTICE

The Treasury officer is now prepared to issue and encash Universal Currency Notes and Home Notes (Bombay Circle) of other denominations for the public on demand as far as possible.

Endeavours will be made as far as possible in all transactions to meet the equirements of the payee as to the form of currency in which he desires to take payment.

The above orders do not yet apply to the Treasuries at Nagpur, Akola and Amraoti where Government treasury work is done by branches of Presidency Banks. As soon as arrangements are completed with the Banks concerned, a further notice will be issued giving the date from which free encashment of currency notes at these centres will be available.

## नोटीस

सौ. मानबी मर्द शेखदावल मुसलमान रा. आकोला (नबाबपुरा गंजाचे वेशी जवळ)

इसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तूं माझी लग्नाची बायको आहेस. लग्न होण्यास सरासरी २० वर्षें झालीं. तेव्हांपासून तूं माझे घरीच आहेस. तुला माझेपासून तीन मुलें व दोन मुली अशी पांच अपत्यें झालीं. त्यापैकीं तीन मुलें व एक मुलगी मेली. तूं दीड वर्षांपासून तूं आपले आईबापाचे घरीं बाळंतपण करण्याकरितां गेली. व तुला मुलगी झाली मी तुला नेण्याकरितां चार पांच वेळां आलो असतां तूं माझे बरोबर येण्यास इनकार करतेस. तुझा विचार मला खावटी मागण्याचा दिसतो. तरी तुझे हें करणें बरोबर नाहीं. मी तुला वागविण्यास तयार आहे. तरी तूं आठ दिवसाचे आंत तुझ्या अंगावर असलेल्या दागिन्यासह यावे. तूं लोकांचे नादी लागून मला बुडविण्यास पाहतेस, तरी तझे हें करणें बरोबर नाहीं. मी तुला वागविण्यास तयार आहे. फारकत वगैरे मी देण्यास तयार नाहीं. आठ दिवसाचे आंत तूं न आल्यास कायद्याप्रमाणें तजवीज केली जाईल. मग त्यास लागेल तो खर्च व या नोटिशीचा खर्च तुजजवळून घेतला जाईल. कळावें. ता. ११ ५-१९१६

सही

शेखदावल वा॥ शेखहुसेन मुसलमान रा. आकोला नवाबपुरा नि. खुद आंगठा डावेहातचा

नो. नं. १८१

## नोटीस

रा. रा. विठोबा वा॥ विक्रम कोर्डे रा. निंब ता. बाळापूर

यांसः–

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचा मुलगा नामे ओंकार हा असून त्याची मी स्त्री आहे. तो मरून आज सरासरी ५ वर्षें झालीं तो मेला त्यावेळेस मजला त्याजपासून एक मुलगा नामे येडाजी व मुलगी नामे भागेरथी अशी दोन आपत्यें होती. त्यापैकी मुलगा रोडाजी हा सरासरी ४ वर्षांपूर्वीच मरण पावला. तुमचा मुलगा ओंकार हा मेल्यानंतर मजला तुह्मी एकवर्ष चांगल्या रितीनें वागाविले. परंतु माझे दुर्दैवानें तुमचा मुलगा रोडाजी हा त्याचे मरणानंतर एक वर्षानें परलोकवासी झाला. त्यांचे मरणानंतर तुह्मी मजला फार जाचणूक करून व वाईट रितीनें वागवून मला त्रास दिला व मला घरा बाहेर काढून दिले. मी बायकोची जात असल्यामुळें व मजला कोणाचा आश्रय नसल्यामुळें मी माझे मुलीसुद्धां माझे भावाचे घरीं आले. त्याला आज सरासरी चार ४ वर्षें होत आलीं, त्या चार वर्षांत तुह्मी माझी विचारपूस वगैरे केली नाहीं. मला व माझे मुलीस खाण्यापिण्यास व कपडालत्ता ही दिला नाहीं. त्यामुळें माझी फार आबाळ आहे. हल्लीं माझें उतार वय असून मजला दुसरा घरठाव करितां येत नाहीं. व करण्याचा माझा विचार नाहीं. तुह्मास हल्लीं कोणाचे कर्ज वगैरे नसून जिनगी गहाण अगर खरेदी देण्याचे कांहींच कारण नाहीं. हल्लीं तुमचा विचार त्या जिनगीचा अफरातफर करण्याचा दिसतो सबब या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, हल्लीं तुमचे ताब्यांत असलेली स्थावर जंगम जिनगीवर माझाही हक्क आहे. तरी तह्मी ती कोणास गहाण अगर खरेदी देऊं नये. तसें केल्यास ती जिनगी कोणत्याही तऱ्हेनें जबाबदार राहणार नाहीं. व तुह्मी केलेला व्यवहार निरुपयोगी व कायद्याचे विरुद्ध आहे असें समजले जाईल. तुमचे जिवांतजीव आहे तोंपर्यंत तुह्मी त्या जिनगीचा खुशाल उपभोग घ्यावा. ही नोटीस दिली ता. १७-५-१६ इ. द. नरहर

सही

तुळशी मर्द ओंकार कोर्डे नि॥ खुद हातची बांगडी

नो. नं. १८२

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार इजकडून या जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं विठोबा वा॥ विक्रम रा० निंब याची मी साक्षांत सून असून विठोबा याजपाशीं स्थावर जंगम जिनगी बरीच आहे. त्याला कोणाचे कर्ज वगैरे नसून जिनगी गहाण अगर खरेदी देण्याचें मुळींच कारण नाहा. त्या जिनगीवर तो जिवंत आहे तों पर्यंत त्याचा फक्त खाण्यापिण्याचा हक्क आहे. हल्लीं विठोबा याची मती बदलली असून तो त्या जिनगीची अफरातफर करण्याचे विचारांत आहे. तरी या जाहीरनोटिशीनें कळविण्यांत येते कीं त्याजपासून ती जिनगी कोणी खरेदी अगर गहाण घेऊं नये घेतल्यास तो व्यवहार निरुपयोगी व कायदा विरुद्ध आहे असें समजले जाईल. कळावें तारीख १७।५।१६ इ. दस्तुर नरहर

सही

तळसी मर्द ओंकार कोर्डे नि० खु. बांगडी

नो नं. १८३

## जाहीर नोटीस

रा. रा. सखाराम दामा सुतार राहणार मौजे डीघी प्रगणे चांदुर तालुका मल्कापूर पोष्ट चांदुर बिस्वा

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून या जाहिरनोटिशीनें कळविण्यांत येते कीं तुमचेवर ओंकार गोविंद साहु दुकान डीघी याचा हुकूमनामा तुमचे मालकीचे शेतावर झाला त्या हुकुमनाम्याची रकम देण्यासाठीं तुह्मी मजला डीघी येथील स. नं. ७ एकर ३ गुंठे २३ आकार रुपये ७ चे शेत रकम रुपये एक हजार १००० ला खरेदी देण्याचा सवदा केला व त्या सवद्याप्रमाणें मी रुपये कोर्टात तुमचे कडून अर्ज देऊन भरण्यासाठीं आलो. व तुमचेकडून वरील तपशीलाचा अर्ज दाखल करून माझे हस्तें

रकम माझे मुलाकडून दाखल केली. सदर्हू-व्यवहार दि. मुं. नं. ६४ सन १९१९ मध्यें झाला. सदर्हू खरेदीखत होण्यास नोंदुन घेण्यास विलंब लागेल या साठीं तुह्मी सवदेचिठ्ठी रकमेचे भरपाई समेत लिहून दिली आहे व त्या सवदे चीठ्ठीप्रमाणें वरील शेताचा ताबाहि कायद्याप्रमाणें तुह्मी मजला त्याच दिवशीं दिला आहे सवदे चीठ्ठींत खरेदीखत १९ दिवसानीं करून देईन असा स्पष्ट उल्लेख केला आहे. त्या कराराप्रमाणें आतां तुह्मी खरेदीखत करण्यास राजी नाहीं असा आह्मांस तुमचें लटपटीचे वर्तनांवरून दिसून येते. या साठीं तुह्मांस या जाहिर नोटिशीनें कळवितो कीं ही नोटीस पावल्या पासून ४ चार दिवसाचें आंत खरेदीचा स्टांप घेऊन लिहून नोंदुन द्यावें. या प्रमाणें न केल्यास आह्मी तुमची सवदेचिठ्ठी कलेक्टर साहेब बहादूर बुलडाणा यांचेकडे स्टांप पुरा करून घेण्यासाठीं दाखल करून स्टांप पुरा करून घेऊन रजीस्टरकडे नोंदण्यास टाकून नोंदुन घेऊ. या कार्यास जो खर्च लागेल तो या नोटिशीचे खर्चा समेत तुमचे पासून घेउं ही नोटीस दिली. मुक्काम आकोला तारीख १३-५-१९१६ इ.

सही
सदु रामजी पाटील रा.
डोबी ता० मलकापूर
दस्तुर तुकाराम सदु पाटील
नो. नं. १८४

---

वऱ्हाडसमाचार

मिति वैशाख व॥ ५ शके १८३८

## देशी संस्थानें आणि ब्रिटिश सरकार.

लॉर्ड हार्डिंज यांनीं हिंदुस्थानांतून प्रयाण करण्यापूर्वी जयपूर येथें केलेल्या भाषणांत देशी संस्थानिक व ब्रिटिश सरकार यांच्यामधील प्रेमसंबंध अधिक दृढ झाला असल्याचें सांगून त्या विषयीं समाधानाचे उद्गार काढले होते. त्याचें दृश्य फळ आतां दृष्टोत्पत्तीस येत आहे. हिंदुस्थानच्या संबंधानें वेळोवेळीं झालेल्या कायद्यांचें एकीकरण करणाऱ्या कायद्याचा मसुदा गेल्या आठवड्यांत लॉर्डस सभेपुढें येऊन त्याचें प्रथम वाचन झालें. या मसुद्यांत एक महत्त्वाचें कलम आहे. पण आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं आजपर्यंतच्या घटनेंत फेरफार करणाऱ्या या बिलासंबंधानें हिंदुस्थानचें मत न विचारतां तें मसुद्यांत घुसडून देण्यांत आलें आहे. हें कलम हिंदुस्थानच्या हिताचें आहे कीं नुकसानीचें आहे हा प्रश्न अलाहिदा आहे. पण हिंदुस्थानच्या लोकांच्या हक्काचा संबंध या मसुद्याशीं असल्यामुळें हें बिल पार्लमेंटपुढें येण्यापूर्वीं हिंदुस्थानचें लोकमत विचारण्याचें स्टेट सेक्रेटरी यांचें काम होतें. तें त्यांनीं न करतां दंडेली करून हिंदुस्थानच्या राज्यपद्धतीच्या घटनेंत एकदम फेरफार करण्याचें योजिलें आहे व हिंदुस्थानच्या लोकमतास धाब्यावर बसविण्याचा यत्न केला आहे हें आमच्यामतें अत्यंत गैर आहे. स्टेट सेक्रेटरीच्या कौंसिलाच्या अशा प्रकारच्या वर्तणुकीनेंच तें कौंसिल लोकांना अत्यंत अप्रिय झालें आहे व तें बंद करण्याविषयींचा ठराव राष्ट्रीय सभेनें सालोसाल केला आहे. त्या ठरावाला कौंसिलाच्या अशा वर्तनानें पुष्टी मिळते ज्या कलमाचा वर उल्लेख केला आहे त्याचा इत्यर्थ असा आहे कीं व्हाइसराय साहेबांस योग्य वाटल्यास त्यांनीं स्टेट सेक्रेटरी साहेबांच्या संमतीनें एखाद्या देशी संस्थानिकाला किंवा त्याच्या प्रजेपैकीं एखाद्याला ब्रिटिश इंडियांतल्या सिव्हिल किंवा लष्करी नोकरींत जागा द्यावी. हा हक्क नुसत्या हिंदुस्थानांतल्याच संस्थानिकांना व त्यांच्या प्रजेला देण्यांत आला आहे असें नाहीं, तर ब्रिटिश सरहद्दीवरच्या व अगदीं स्वतंत्र अशा संस्थानिकांना ही देण्यांत आला आहे. मात्र या कलमांत येवढी गोम ठेवण्यांत आली आहे कीं ज्या जागेवर ब्रिटिश इंडियांतल्या कोणाही देशी माणसाला नेमतां येईल अशाच जागा संस्थानिकांना व त्यांच्या रयतेला देण्यास हरकत नाहीं. याचा अर्थ असा कीं इतके दिवस ब्रिटिश अंमलांत देशी माणसाला मिळणाऱ्या जागा सुद्धां देशी संस्थानिकांना किंवा त्यांच्या रयतेला मिळण्यास कायद्याची अडचण होती, तेवढी आतां दूर झाली आहे. या कलमांत देशी संस्थानिकांचा समावेश करण्याचें कारण काय तें कळत नाहीं. संस्थानिक आपलें स्वतःचें राज्य सोडून ब्रिटिश सरकाराजवळ नोकरी मागण्यास जातील असें सरकारास वाटतें काय ? त्यांच्यावर असा प्रसंग न येवो अशी आह्मी देवाजवळ प्रार्थना करतों. ब्रिटिश सरहद्दीला लागून असलेल्या अफगाण, पठाण, वगैरे संस्थानिकांना ही हा हक्क देण्याचा हेतु नीटसा कळत नाहीं. असो, ब्रिटिश सरकारानें आपल्या नोकरीचे दरवाजे संस्थानिकांना व त्यांच्या रयतेला अशा रीतीनें खुले केले आहेत यांतच तूर्त समाधान मानिलें पाहिजे कारण या पूर्वी प्राव्हिनशियल सर्विसमध्यें सुद्धां त्यांचा प्रवेश होण्यास प्रतिबंध होता संस्थानिक स्वतः या हक्काचा फायदा घेवोत न घेवोत, त्यांच्या प्रजेला तरी आतां ब्रिटिश सर्विसची वाट मोकळी झाली आहे.

इतके दिवस अशी स्थिति होती व अजून ही पुष्कळ अंशानें ती कायम आहे कीं ब्रिटिश मुलुखांतल्या लोकांनीं शिफारसपत्रें लावून संस्थानांतल्या उच्च प्रतीच्या जागा खुशाल पटकवाव्या, पण संस्थानांतल्या प्रजेला मात्र ब्रिटिश अंमलाखालीं खालच्या दर्जाची जागा सुद्धां मिळूं नये. यामुळें संस्थानच्या प्रजेचा कोंडमारा होत असे. घरीं आई खाऊं घालीना, आणि बाहेर बाप भीक मागूं देईना. अशा दुःखमय स्थितींतून त्यांची सुटका करण्याचें श्रेय सध्याचा मसुदा पास झाल्यास तो तयार करणारांचे पदरीं पडेल यांत शंका नाहीं. आतां संस्थानांतल्या हुशार तरुणांना आपली कर्तृत्वशक्ति दाखविण्यास विस्तृत क्षेत्र मिळेल. त्यांना विलायतेस सिव्हिल सर्विस, मेडिकल सर्विस, इंजिनियरिंग सर्विस, पोलीस सर्विस वगैरे परीक्षा देतां येतील. हायकोर्टाचे जज होतां येईल. सारांश, संस्थानच्या नोकरींतच त्यांचे हातपाय बांधले जाणार नाहींत; किंवा एखाद्या संस्थानिकाची नाराजी झाल्यास कसें करूं, काय करूं हा अष्टाक्षरी मंत्र ही जपण्याचें कारण पडणार नाहीं. त्याचे अंगीं कर्तृत्वशक्ति असल्यास तो ब्रिटिश अंमलांत आपल्या योग्यतेनुरूप एखादी मोठी जागा पटकावील व तेथें आपलें कर्तृत्व प्रकट करील. एके प्रकारें संस्थानिकांच्या लहरी वर्तनावर ही याचा प्रभाव पडल्यावांचून राहणार नाहीं. सारांश, ब्रिटिश सरकार व देशी संस्थानें यांच्यांत या कायद्याच्या योगानें देवघेव समानतेच्या तत्त्वावर सुरू होऊन तिचा फायदा आतांपर्यंत जो ब्रिटिश अंमलाखालच्या लोकांनाच तेवढा मिळत असे, तो आतां देशी संस्थानांच्या प्रजेस ही मिळूं लागेल, व कर्तृत्ववान् पुरुषांना आपल्या अंगची कर्तृत्वशक्ति दाखविण्यास संधी मिळेल.

---

## महायुद्धाची प्रगति.

सध्याच्या युद्धांत व्हर्डुन इतकी प्रसिद्धी दुसऱ्या कोणत्याही लढाईनें मिळाविली नसेल. तीन महिने झाले तरी व्हर्डुनची लढाई चाललीच आहे ! या लढाईची अखेर झाली असा अभिप्राय युद्धकलाविशारदांनीं एक महिन्यापूर्वींच प्रसिद्ध केला होता. पण आमच्या वायुशास्त्रज्ञांनीं पर्जन्यमाना संबंधानें केलेलें भविष्य जसें हटकून चुकावयाचें असा नेम आहे, त्याप्रमाणें व्हर्डुननें ही लष्करी आफिसरांच्या अभिप्रायाला खोटें ठरविण्याचा जणूं काय निश्चयच केलेला दिसतो. येथील लढाईचें वृत्त कायमच्या ठशांनीं छापण्यासारखेंच बहुधा असतें. शत्रूचे पुनः हल्ले, 'जबर हानि' 'दोस्त राष्ट्रांचा आणखी एक विजय' 'तोफखान्यांचा भडिमार' वगैरे हेडिंगें कंपाझिटरांनीं डोळे झांकून दर आठवड्याला घालावीं. या लढाईत जर्मन लोकांच्या प्राणहानीबद्दलचे आंकडे वेळोवेळीं प्रसिद्ध झाले आहेत त्यावरून दोन पासून तीन लक्षांपर्यंत प्राणहानि झाली असली पाहिजे असें बिनधोक सांगण्यास हरकत दिसत नाहीं. इतकी हानि सोसून ही लढाई चालूं ठेवण्यांत जर्मनीचा उद्देश तरी काय या विषयीं लोकांचे तर्क चालू आहेत. क्राउनप्रिन्स ह्मणजे युवराज यांची नेमणूक या लढाईवर झाली होती व अपयश घेऊन त्यांना माघारें जावें लागणारा हा कलंक जर्मनीच्या भावी राजाला शोभत नाहीं ह्मणून तो धुऊन टाकण्यासाठीं येवढा खटाटोप आहे असें कोणी ह्मणतात. दुसऱ्या कित्येकांचा तर्क आहे कीं व्हर्डुनपाशीं निदान एकदां तरी फ्रेंचांना सडकून मार दिल्याशिवाय परत जाणें जर्मनीला बरें दिसत नाहीं. तो देण्याची संधी जर्मनीला मिळेल तर शत्रु उभा आपलें सैन्य तेथून हलवून रशियाकडे कूच करील. आणखी कित्येक ह्मणतात कीं व्हर्डुन घेतलें ह्मणजे लॉरेन प्रांत आपले ताब्यांत येईल व या प्रांतांत लोखंड व कोळसा विपुल आहे, त्यांच्या साह्यानें प्रस्तुतच्या युद्धाची कालमर्यादा आणखी लांबवितां येईल अशी जर्मनांची समजूत झालेली आहे. कोणतेंही कारण असो, जर्मनीच्या नशिबीं निराशेच्या अक्षता लागलेल्या आहेत असें वस्तुस्थितीवरून अनुमान काढल्यास तें चुकीचें होणार नाहीं.

---

सध्याच्या स्थितींत व्हर्डुनच्या खालोखाल महत्व रिगाला देण्यांत येतें जनरल हिंडेन बर्ग मदतीची अपेक्षा करीत व पुढचे बेत ठरवीत आज कित्येक महिने तेथें जाऊन बसला आहे. मदत कोठून येणार आहे तें मात्र कळत नाहीं. व्हर्डुनची लढाई संपून तिकडची फौज आपल्या मदतीला येईल अशी आशा कदाचित् त्याला वाटत असेल. इकडे कालावधि जितकी जितकी ज्यास्त होत आहे तितकी तितकी रशियाची मजबुती ज्यास्त होत चालली आहे; आतां हिंडेनबर्गनें रिगावर हल्ला केल्यास गतवर्षापेक्षां यंदा रशियाचे अंगीं निराळेंच पाणी त्याला दिसेल यांत शंका नाहीं.

---

## तुर्की रणक्षेत्र.

र्देबिझोंड रशियानें घेतल्यापासून तुर्कांच्या व त्याबरोबर जर्मनांच्या मनाला काळजीच्या इंगळ्या लागल्या असल्या पाहिजेत तेव्हांपासून रशिया त्या मुलुखांत निर्भयपणें संचार करीत आहे. अर्झींगानपाशीं तुर्कांशीं त्याची चकमक उडाली, पण तुर्की सैन्याला हारच खावी लागली. रशियानें तुर्कांना इराणांतून तर हांकून लाविलेंच आहे. आतां आर्मेनियांतून ही निघून जाण्याचा प्रसंग दूर नाहीं. जर्मनीची आपणांस मदत होत नाहीं अशी तुर्कांची तक्रार आहे, आणि कूट येथें तुर्कांना जो अकल्पित जय मिळाला तो मिळाला नसता, तर तुर्कांनीं लढाईचा नाद यापूर्वींच सोडून देऊन तहाचें बोलणें ही सुरू केलें असतें असें पुष्कळांचें ह्मणणें आहे.

---

## पूर्व आफ्रिका.

पूर्व आफ्रिका आतां जागृत झालेली दिसते. जनरल स्मटसचें पाऊल पुढें पुढें पडलेलें पाहून जर्मन सेनापतीच्या पोटांत धस्स होऊं लागलें आहे. सेंट्रल रेल्वे जर कां इंग्रजांच्या हातांत गेली तर पूर्व आणि पश्चिम यांच्यांतल्या दळणवळणाचा मार्गच बंद होईल, ह्मणून जनरल स्मटस यांना प्रतिबंध करावासा तर वाटतो, पण तेवढी अंगांत शक्ती नाहीं अशी जर्मन सेनापतीची केविलवाणी स्थिति झाली आहे. जनरल स्मटसची प्रगति तूर्त तरी निर्भय आहे, आणि लवकरच जर्मन शत्रूंना ज्या प्रांतांतून रसद मिळते तो प्रांत हस्तगत करून घेण्याचा इंग्रज सेनापतीचा प्रयत्न सिद्धीला गेल्यास शत्रूचें नाकच दाबून धरल्यासारखें होईल.

## देशी स्वयंसेवक.

फ्रेंच सरकारनें बंगाली लोकांना सैन्यांत स्वयंसेवक ह्मणून भरती होण्याची परवानगी दिल्याबद्दल बंगाली पत्रें हर्षातिरेकानें नाचूं लागलीं. पण या परवानगीचें दृश्य फळ काय दिसलें तें नर पाहिलें तर तो हर्ष मावळून गंभीरपणानें या प्रश्नाचा विचार करण्याकडे प्रत्येक हिंदी माणसाची प्रवृत्ति झाली पाहिजे. फ्रेंच सरकारनें बंगाली लोकांना सैन्यांत भरती करण्याचें ठरविलें त्याचा परिणाम काय झाला पहा— दुसरी तुकडी करण्याचें ठरलें तेव्हां चंद्रनगरचे फ्रेंच अधिकाऱ्याकडे एकंदर ४५ अर्ज आले. पैकीं आठ अर्जदारांनीं किंवा त्यांच्या पालकांनीं परत घेतले. बाकीच्या सदतीस असामींना वैद्यकी तपासणीसाठीं बोलाविलें, तेव्हां त्यांतले फक्त २६ हजर झाले, या २६ पैकीं ७ सदर तपासणींत नापास ठरले; आणि राहिलेल्या १९ पैकीं पांचच जणांना पसंत करून तूर्त पाठविण्यांत आलें आहे. बाकीच्यांना पुनः वैद्यकतपासणीसाठीं बोलावण्यांत येणार आहे. ही लहानशीच गोष्ट मनःस्थितीची पूर्ण निदर्शक आहे. अगोदर उत्साहाचे भरांत ४५ जणांचे अर्ज आले आणि त्यांतले ८ परत घेण्यांत आले, यावरून आमचे लोक कसे आरंभशूर आहेत तें दिसतें. पुढें राहिलेल्या ३७ पैकीं २६ च हजर झाले. यावरून बाकीच्यांना या गोष्टीचें महत्त्व वाटलें नाहीं, किंवा त्यांच्यांत उरांत धडकी भरल्यामुळें त्यांच्यानें पेंवलें नाहीं, असा कांहीं तरी प्रकार घडला असावा असें दिसतें. त्यानंतर वैद्यक तपासणींत प्रकृचतुर्थांशाहून अधिक नापास होऊन अखेर ४५ पैकीं पांचानाच काय ती युद्धक्षेत्रावर जाण्याची संधी मिळाली, ही गोष्ट अनेक प्रकारें सूचक ह्मटली पाहिजे. आंग्लो-इंडियन पत्रांना या गोष्टीनें आह्मां लोकांचा उपहास करण्याला आयती संधी मिळाली आहे, व देशी लोक लष्करी नोकरीला पात्रच नाहींत, असे ही उद्गार काढण्यास ते चुकावयाचे नाहींत. पण त्यांनीं ध्यानांत ठेवावें की क्षात्रकर्माची आमची संवय मोडून टाकल्याचा हा परिणाम आहे, आणि त्याबद्दलचे अपेशाम सरकारच खुद्द अधिकारी आहे. ती आमची संवय कायम असती तर युद्धावर जाण्याची गोष्ट काढतांच बंगाली लोकांच्या उरांत धडकी भरण्याचें किंवा वैद्यकी तपासणींत तरुण मंडळीला नापास होण्याचें कांहीं कारण नव्हतें. हिंदुस्थानचे लोक खऱ्या किती शूर आहेत याचा अनुभव प्रस्तुत युद्धांत आलाच आहे.

## अमेरिकेंतले स्वामी.

स्वामी विवेकानंद यांनीं आपल्या प्रभावशाली वाणीनें अमेरिकन लोकांचीं मनें मोहित केल्यापासून अमेरिकेंत स्वामींचें बंड फार माजलें. जो उठला तो भगवीं वस्त्रें पांघरून व स्वामी अमुक, स्वामी तमुक असें कांहीं नांव धारण करून धावला अमेरिकेकडे! या स्वामींची तिकडे राहणी कशी काय असते व तिचा परिणाम अमेरिकन लोकांच्या मनावर काय होतो याचें वर्णन लाला लजपतराय यांनीं मॉडर्न रिव्ह्यु मासिकाच्या मेच्या अंकांत सुंदर रीतीनें केलें आहे. ते ह्मणतात कीं स्वामीनीं ह्मणजे चतुर्थाश्रम घेतलेल्यांनीं जगांतल्या व्यवहारांतल्या गोष्टींत–विशेषतः कनकसंचयांत- आपल्या मनाला कशाला वावरूं द्यावें? त्यांच्या आश्रमाशीं तें विसंगत दिसतें. पण अमेरिकेंतले हे स्वामी लोभाचे पाश स्वतःचे भोंवतीं गुंडाळून घेतात, यामुळें त्यांची किंमत तेथें उतरली आहे. स्वामी विवेकानंदानें सुरू केलेलें कार्य तसेंच पुढें चालूं ठेवावयाचें असेल तर तें असल्या स्वामींच्या हातून घडण्याची आशा नाहीं. त्यासाठीं वेदांताचें मर्म ज्यांच्या हृत्पटलावर खरेखरें बिंबलें आहे असेच संन्याशी रामकृष्ण मिशननें पाठविले पाहिजेत. या संन्याशांनीं तिकडे निष्कामबुद्धीनें वेदांताचे वर्ग काढून ते चालविले पाहिजेत. गरीब व श्रीमंत विद्यार्थ्यांत पंक्तिप्रपंच न ठेवतां समदृष्टीनें दोघांनाही वागविलें पाहिजे. या स्वामींनीं आपलें मन विद्यादानापलीकडे दुसऱ्या कोणत्याही कामांत गुंतूं देतां कामा नये. अशा विद्वान् स्वामींना परदेशीं पाठविण्याचे कामीं राजे महाराजे यांनीं ही मदत करावि.

## आमचा कपड्याचा व्यापार.

हिंदुस्थानांत कपड्याचा व्यापार आणखी वाढण्यास केवढी जागा आहे तें पुढील कांहीं आंकड्यांवरून कोणाला ही कळून येईल. एप्रिल १९१५ पासून फेब्रुआरी १९१६ पर्यंतच्या दहा महिन्यांत हिंदुस्थानांत ६६ कोटि ४० लक्ष पौंड सूत तयार झालें व ३२ कोटि ६० लक्ष पौंड विणलें गेलें. गेल्यासालीं हेच आंकडे अनुक्रमें ५९ कोटि ६० लक्ष व २५ कोटि ३० लक्ष असे होते. काढलेल्या सुतांत सुमारें ६ कोटि ४० लक्ष पौंड सूत २६ पासून ४० नंबर पर्यंत फक्त १६७३-०० पौंड सूत कांय तें ४० नंबरच्या वरचें होतें. विणलेल्या कपड्यांत ९३ लक्ष ८२ हजार पौंड शर्टिंग व लॉंग क्लॉथ, २ कोटि ३२ लक्ष पौंड टी. नांवाचें (कापड चादरी वगैरे), ६ कोटि ३९ लक्षांचीं धोतरें, व सुमारें ७॥ कोटींचा रंगीत कपडा होता. यांवर किंमतीच्या मानानें शेंकडा ३॥ प्रमाणें एक्साईज डयूटी ३९ लक्ष ४८००० रुपये द्यावी लागली. गतवर्षी ४१८७००० रुपये द्यावी लागली होती. या वरून यंदाचे सालीं विणले गेलेल्या कपड्यांची सरासरी किंमत अंदाजे ११ कोटि २७ लक्ष ९६ हजार रुपये होते. याच काळांत परदेशाहून आयात केलेला माल ३५ कोटि ८५ लक्ष ९१ हजार रुपयांचा होता.

## दिवाबत्तीची काटकसर.

युद्धामुळें इंग्लंडच्या लोकांना हरएक बाबतींत काटकसर करणें प्राप्त झालें आहे. कारखान्यांतून रात्रीं काम करावें लागतें त्यावेळीं दिवाबत्तीचा खर्च लागतो. यांत कशी काटकसर करतां येईल याबद्दल विचार करून एखादी योजना तयार करण्याकरितां पार्लमेंटनें नेमलेल्या कमिटीनें आपला रिपोर्ट सादर केला आहे आणि त्यांत दिवे लावून काम करण्याची रीत बंद करून होईल तितकें करून सूर्यप्रकाशांत कामें करून घेण्याची शिफारस केली आहे. त्यासाठीं हिंवाळा, उन्हाळा, पावसाळा वगैरे ऋतुमानाप्रमाणें घड्याळाचा कांटा मागें किंवा पुढें सरकवून सूर्याच्या गतीशीं त्या घड्याळाचा मेळ ठेवण्याची व्यवस्था सुचविण्यांत आली आहे. ही सूचना इंग्लंडमध्यें नवी नाहीं. १९०८ सालीं मि. विलेट यांनीं ही अशीच व्यवस्था सुचविली होती. त्यांची सूचना अशी होती कीं एप्रिल महिन्यांतल्या दर रविवारीं घड्याळ २० मिनिटें पुढें करावें, व सप्टेंबरमध्यें याच्या उलट ह्मणजे दर रविवारीं घड्याळाचे कांटे २० मिनिटें मागें करावे. ह्मणजे वर्षे अखेर हिशोब बरोबर होईल.

## जर्मनीच्या व्यापारावर बहिष्कार

हल्लीं बहुतेक सगळ्या विषयांत या विषयाला प्राधान्य आलें आहे व इंग्रजी पत्रांतून याची विशेष जोरानें चर्चा चालू आहे. मद्रासच्या 'कामनवील' पत्रांत मि. ब्रेल्सफोर्ड यांचे या संबंधाचे विचार वाचनीय व मननीय आहेत. ते ह्मणतात जो जर्मनींतल्या सगळ्या संस्थानांवर छाप पाडून तुर्कस्थानला आपल्या ताब्यांत ठेवील, बल्गेरियाला जर्मनीपासून अलग राखील, व आस्ट्रीयाच्या राज्याचा विस्तार कमी करील तोच जर्मनीच्या मालावर भारी जकात ठेऊन त्याचा व्यापार संपुष्टांत आणण्याचे कामीं यशस्वी होईल. याच्या उलट जर्मनी यशस्वी झाला, व सगळ्या युरोपचें केंद्र होऊन बसला व सगळ्या युरोपखंडाचा व्यापार जर्मनीचे हातांत गेला, तर जर्मनी तुर्कस्थानची आबादी करून त्याला स्वतंत्र करील व तेथून कापूस, खनिजद्रव्यें, धान्य वगैरे सवलतीनें मिळविण्याचा हक्क संपादील. सारांश, जर्मनीच्या व्यापाराला बहिष्कार घालण्याच्या गोष्टी करणें सोपें आहे. पण तसें करून दाखविण्याचे मार्गांत कित्येक जबरदस्त विघ्नें आहेत. खरें ह्मटलें तर दोन्ही राष्ट्रांत देवघेव होऊं देण्यांतच उभयतांचा फायदा आहे. बहिष्कारानें लढाईचे घाव तह झाल्यावर ही बुजावयाचे नाहींत. लढाईच्या पायीं इंग्लडचे पैशाचे नुकसान झालेंच आहे. हें नुकसान जर्मनीच्या व्यापारावर बहिष्कार घातल्यानें भरून न येतां उलट नुकसानीचा बोजा वाढतच जाईल हें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

## यवतमाळची जिल्हापरिषद.

ही सर्व प्रकारें यशस्वी झाली हें पाहून आह्मांस फार संतोष वाटतो आणि ती पार पाडण्यासाठीं ज्यांनीं अविश्रांत परिश्रम केले त्यांचें आह्मी मनापासून अभिनंदन करतों. या परिषदेसाठीं आलेल्या प्रतिनिधींची संख्या ५११ होती, बहुतेक सर्व प्रांतिक महत्वाच्या विषयांवर लोकमत काय आहे तें ठरावांच्या रूपानें सरकारला कळविण्यांत आलें, इनामदाराच्या हिताच्या व दुसऱ्या अनेक महत्वाच्या प्रश्नांचा विचार समतोलपणानें व नेमस्त दृष्टीनें झाला. अशा परिषदेविषयीं सरकारी अधिकाऱ्यांचा ग्रह अनुकूल झालाच पाहिजे व तसा तो झाला ही हें तेथील डेप्युटी कमिशनर मे. चॅपमन साहेबांच्या भाषणावरून दिसलें. मि. चॅपमन साहेबासारखे विचारशील व उदार वृत्तीचे सगळे अधिकारी असते आणि यवतमाळ परिषदेच्या चालकासारखे व ना. मि. दीक्षित यांच्या सारखे नेमस्त सूत्रधार मिळण्या इतकें सगळ्या परिषदांचें भाग्य असतें तर मि. चॅपमन यांनीं ह्मटल्याप्रमाणें या परिषदा ह्मणजे कायदे कौंसिलाच्याच छोट्याशा प्रतिमा अशा सहानुभूतच्या दृष्टीनेंच सरकारी अधिकारी तिकडे पहाते, व बिगारी सारखे प्रश्न ही परभारेंच निकालास लागून त्यांवर चर्चा करण्याचा प्रसंग परिषदेस आला नसता. यवतमाळनें प्रशंसनीय उदाहरण घालून दिलें आहे. त्याचें अनुकरण इतरत्र अवश्य व्हावयास पाहिजे.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**— उष्णता ११४ अंशावर चढूं लागली आहे. सूर्य आपल्या रश्मींनीं उष्णकणांची वृष्टीच करीत आहे असा भास होतो. अत्यंत प्रखर उन्हाच्या झळीमुळें आमच्या प्रांतांतील लोक अगदींच गुदमरून जातात. उष्णतेमुळें या सप्तकांत उन्हाच्या लईचा विकार व कॉलऱ्याचा विकार थोडे बहुत पण तीव्र आहेत.

भावसार क्षत्रीय मंडळीनीं गेल्या १७ व्या तारखेला राजश्री डाहाके यांच्या येथील लग्नसमारभांत चिखलीला त्या ज्ञातीचा शिक्षण फंड उभारला आहे. या सत्कृत्याबद्दल त्या मंडळीचें कौतुक करावें तितकें थोडेंच. दुसऱ्या ज्ञातींनीं ही हा कित्ता उचलण्या सारखा आहे.

**वत्सगुल्मस्थ** कळवितात कीं - गेल्या महिन्याच्या अखेरीस वाशीम येथील सुप्रसिद्ध वकील रा. रा. रामराव बाबासाहेब हे परलोकवासी झाल्याकारणानें एक दानशूर, प्रेमळ, व समवृत्ती सार्वजनिक गृहस्थ वाशीम शहरचा हरपला असें वाटतें. मरण समयीं यांचें वय ७१ होतें व ५२ वर्षें यांनीं वकीली केली अन्नदान हा त्यांचा मोठा सद्गुण असे.

## फोटोग्राफीचा क्लास.

एक महिन्याचा अभ्यासक्रम ( कोर्स सदर कोर्सची फी रुपये २५ हा क्ला आगष्ट ता. १ रोजीं सुरू होईल. ह्या फोटोग्राफीची सांगोपांग माहिती देण्य व्यवस्था केली आहे. तरी शिकणारांनीं त १५ जुलैचे आंत प्रवेश फी रु. १ भरू नांवें नोंदवावीं. कोर्सची फी क्लासचे सुरु तीस सर्वच द्यावी लागेल. विशेष माहि पत्रद्वारें अगर भेटीअंती मिळेल.

सही
G. W. Shidore
फोटोग्राफिक् स्टुडिओ
आकोला

नो० नं० १८५

## नोटीस

रा. गणेश बळवंत दिगंबर राहणार आकोला

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं आह्मी तुमचे पासून मौजे सांगळूद तालुके आकोले येथील शेत सर्वे नंबर ९६ एकर ३४ गुंठे८८ आकार रुपये ८८-१३-९ हे सालीम तुमचे मालकीचे आहे असें तुह्मी सांगीतले वरून ९ वर्षा करितां फसली सन १३२९ ते १३२९ पावेतों दरसाल २०० रुपये स्वामित्वानें वहीतीस घेतले. त्या प्रमाणें एक वर्ष आह्मी वाहिले. दरम्यान १ महिना झाला माझे ताब्यांतून कोर्ट मार्फत नरहरपंत वैद्य यांनी निम्मे शेताचा ताबा आपले नांप्रमाणें घेतला आहे. व बाकी राहिलेले निंम्मे शेत हे सर्व कुंदा वगैरे यानीं खराब झालेलें आहे. तेव्हां निंम्मे शेत वाहण्याची आमची इच्छा नाहीं. कारण आह्मास तुह्मी खोटें सांगून सालीम शेत माझे आहे तुह्मी करा अशा रितीनें फसविलें. यामुळें माझी नुकसानी झाली आहे. त्याबद्दल रकम रुपये ६०० ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसांत आह्मास तुह्मी दिले पाहिजे. व आह्मी आजपासून निंम्मे शेताचा ताबा सोडला आहे. तुह्मी कोणास ही लावावें. आह्मी लिहून दिलेल्या पट्टया बरहुकूम ताबा मिळत नाहीं सबब आह्मी जबाबदार नाहीं. ही वरप्रमाणें रकम न दिल्यास तुमचेवर रितीप्रमाणें दिवाणींत व फसविल्याबद्दल फौजदारींत फिर्याद करण्यांत येईल. व खर्चासुद्धां रकम भरून घेतली जाईल कळावें. ता. १८ मे १९१६

सही

१ ठकरडासिंग वा हीरासिंग द० खुद

१ बुळासिंग वा देवलालासिंग द० खुद

नो० नं० १८६.

## नोटिशीचें उत्तर

नोटस बेशमी भामी नई पुंडलिक बेलदार रा. कवठळ ता. बाळगांव

ईसः—

खालीं सही करणार याजकडून नोटिशीचें उत्तर देण्यांत येते कीं तुझी ता. २४-४-१६ ची नोटीस मिळाली. सदरहू नोटिशींतील मजकूर खोटा आहे. कारण नोटिशीनें असे लिहिले आहे कीं तुह्मी मजला टाकून दिलें. वास्तविक तूं आमचे वरून आह्मांस न विचारतां फंदफितूरी लोकांचे नादीं लागून व त्यांचे चिथावणीवरून माझा अज्ञान मुलगा नामे केशव याजला घेऊन दागीन्यासह पळून गेली. तुझा तपास करून तुला पुष्कळ समाजाच्या गोष्टी सांगून परत येण्यास पुष्कळ वेळां खटपट केली. परंतु वाईट लोकांचे नादीं लागल्यामुळें तुला माझे घरीं नांदणें नाहीं. असें तुझे सांगण्यावरून स्पष्ट दिसून मी तुला आणण्यास तयार असतां येऊन तूं माझे बरोबर आली नाहीं. व मजला खोटी नोटीस देऊन त्यांत लिहिलें कीं मजला लोकांचे कर्ज काढून रकम रु. ५८८ खर्च करावा लागला. या वरून स्पष्ट दिसते कीं तुला माझे घरां नांदणें नसून खोटा कर्जाचा बोजा मजवर घालूं पाहते व माझा तुझेवर असलेल्या नवरे पणाचा हक्क नाहींसा करूं पाहतेस. करितां तुजला कळवितो कीं मी तुझे अन्नवस्त्राबद्दल झालेल्या व कोणत्याही प्रकारचे कर्जाबद्दल मुळींच जबाबदार नसून नवरेपणाचा हक्क सोडणार नाहीं व तुझा मुलासह कोर्टमार्फत दावा करून ताबा व दागीने, झालेल्या खर्चासह भरून घेऊं कळावें ता.१९-५-१६

सही

१ पुंडलीक वा रावजी बेलदार

नि. खुद

नो. नं. १८७


ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

### मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तूरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुस्राव, उन्हाळे इंद्रियशिथिलता [illegible] गर्भाशय सुरळेके विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांचे धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह. जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि. वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व गहूं भरपूर पचूं लागतें. त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटां मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत एका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कोतिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयांचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल. दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अगदीं खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह. तिडीक, मुत्राची लाली, सकाचें, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसतां सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकेत जाते. असें रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १। भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून ती पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत. याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, शास्त्रोक्त रसायनें, भस्में, पाक, गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतीमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ताः—मु० मुर्डी, पो० हर्णे, जिल्हा रत्नागिरी.

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

ना० नं० २०



## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY.

### FUNDS exceed 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

*Claims paid* 4½ CRORES

### A Novennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurance Rs. |
|---|---|---|
| 1879 | 1,034 | 31,00,950 |
| 1888 | | 2,63,38,000 |
| 1897 | 26,522 | 6 37,26,354 |
| 1906 | 48,147 | 9,45,63.407 |
| 1915 | 64,738 | 12,23,63.755 |

| Year. | Total Income. Rs. | Total Assets. Rs. |
|---|---|---|
| 1879 | 1,30,109 | 1,70,695 |
| 1888 | 11,48,642 | 36,38,694 |
| 1897 | 28,85,976 | 1,3390.729 |
| 1906 | 884, | ?,84,76155 |
| 1915 | ,72,96,901 | 5,25,53 |

### SPECIAL FEATURES.

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.

Forty years continuously increasing prosperity.

Ninety per cent of the entire Profits, after provising for the Reserve and divided among the Policyholders every 3 years.

Native Lives are accepted at the same rates as Europeans

Loans granted to policyholders at reasonable rates.

Prompt Payment of Claims.

***Influential and active agents wanted Terms liberal***

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

R. Paterson Brown
Manager

*A. C. Lal*,
Branch Secretary
*C. P. Berar & Khandesh*
Nagpur.

S. N. 22


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं उदयशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला--सोमवार तारीख २९ माहे मे सन १९१६ ई० [ अंक २१

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } S. Clements, एजंट

नं १

### अस्सल अंगुरी.

## हिंग

केवळ एक आणा तो. पवित्र केशर १॥ तो. शुद्ध शिलाजीत. ।॥- तो. खालिस कस्तूरी रु. २५ तो. तिबेटी ममीरा रु. ३ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५

नो० नं० २

### हिंदुस्थानावर अरिष्ट

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात किं रु. १८८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिश्राफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्यां दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

## चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व वाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

हिंदुस्थानांत मराठी भाषेंत असें हें पहिलेंच. स्वस्त आणि उपयुक्त मासिक पुस्तक.

सुरू झालें. वा. व. ८५ ] **पूर्णानंद** [ सुरू झालें. ट. ख. ८३

लहान मोठ्या सर्व स्त्री पुरुषांच्या चित्ताचें सारखेंच आकर्षण करणारें व अनेक विषयांचा उहापोह करणारें **अगदीं नवीन तऱ्हेचें अत्यंत मनोरंजक पूर्णानंद** मासिक पुस्तक फेब्रुवारी महिन्यापासून सुरू झालें. यांत चटकदार गोष्टी, हास्यकारक चुटके कविता, कादंबऱ्या वगैरे मनोरंजक लेख येतात. शिवाय प्रसिद्ध विद्वानांच्या लेखांचा व विविध ज्ञानाचा संग्रह यांत केला जात आहे. सारांश फक्त पांच आण्यांत वाचकाला जेवढा लाभ करून देणें शक्य तेवढा किंबहुना जास्त देण्याचा प्रयत्न केला आहे. लढाईमुळें चालू परिस्थिति सर्व बाजूंनीं बिकट व खर्चिक झाली आहे. तरी पण या मासिकाची वार्षिक वर्गणी फक्त ।— ( व्ही. पी. पोस्टेजसह ॥= ) ठेविली आहे. नमुन्याचा अंक दीड आण्याची तिकिटें पाठवून मागवा.

बळवंत रामचंद्र सोहनी,
पूर्णानंद—कार्यालय,
खडेबाजार—बेळगांव.

नो. नं. १३२

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरत्याचे, लिस्टफार्म पर्चाचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जाचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

### श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशी जोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळी टीका, मुद्रा अग्रफुलें साखीं व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, तारें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आह्मी सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिन्नसाची लाख काढून वजन तोलून पाहून गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल. ऑर्डरी प्र , माल तयार करून देतो. चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर

नो नं ६

## कौतुकरत्नाकर

छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह पृष्ठसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ती ५ वी. प्र. २००००,

बंगाल्यांतील कामरूपदेशी ही विद्या फार प्रबल असून तिकडील जटेली, लंगोटि, छा छु करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवून सिद्धनागार्जुन मंत्र महोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुबाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम ग्रहादिकांचीं वर्णनें भानुमती यंत्र वशीकरणशास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण-मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मेरिझम प्रयोग, विधि वगैरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया.

## कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको. किंमत १ रुपया. ट. ख. ३ आणे.

पत्ताः— गंगाधर आर. आणि कंपनी.
हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ७

# नोटिस.

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं, आकोला जिल्ह्यांतील सोबतच्या यादींत दर्शविलेले जिल्हा बोर्डाचे रस्ते, स्प्रिंगचे (कमानीचे) टांगे, किंवा गाड्या आणि ज्यांना चार बैला शिवाय जास्त बैल ओढण्यास लागत नाहींत, अशा सर्व साधारण गाड्या, या खेरीज दुसऱ्या कोणत्याही कामाकरीतां उपयोगात आणावयाचे नाहींत.

सोबत जोडलेल्या नमुन्यांत, आणि खालीं दिलेल्या नियमानुसर असलेला लेखी करारनामा जिल्हा बोर्डाचे चेअरमन, किंवा व्हाइस चेअरमन, यांनीं मंजूर केल्याशिवाय, साधारण गाड्यांतून किंवा, दोन जोड्यापेक्षा जास्त बैल ओढण्यास न लागणाऱ्या गाड्यातुन, नेलीं जाणार नाहींत, अशीं जड यंत्रें, किंवा शेतकीस लागणारि अवजारे, असल्या रस्त्यावरून जाणार नाहींत. स्थानिक सरकारच्या मंजुरातीनें एखाद्या विविक्षीत रस्त्यानें यांत्रिक सामान नेण्याची हमी घेतली असेल, अशा वेळीं, प्रत्येक रस्त्याची किंवा यंत्राची, वस्तुस्थिती पाहून, योग्य अशा फरका निशी, खालीं दर्शविलेल्या नियमा प्रमाणें एक परवाना, स्थानिक सरकारा कडूनच मिळेल.

(२) करारनाम्या शिवाय किंवा पूर्वी सांगितलेल्या परवान्याशिवाय, अगर दुसऱ्या कोणत्याही रीतीनें, वर निर्दिष्ट केलेल्या, करारनाम्याच्या अटी मोडून, जिल्हा बोर्डाच्या रस्त्यावरून जड यंत्र किंवा नांगर, वखर वगैरे, सारखी, रस्त्यावर खुणा पाडणारीं आणि रस्ता खराब करणारीं, दुसरीं शेतीचीं अवजारें, कोणीही मनुष्य, नेतांना, किंवा, नेण्याचा प्रयत्न करित असताना, आढळला, तर त्यानें सदर्हू रस्त्याचा अन्यायानें उपयोग केला असें समजून, कायदेशीर रीतीनें त्याजवर खटला करण्यांत येईल.

## नियम

१ ज्या वेळीं जिल्हा बोर्डाचे ताब्यांत, असलेल्या रस्त्यावरून, एकामाग एक अशा जोडलेल्या साधारण गाड्यांतून किंवा ज्यांना ४ पेक्षां जास्त बैल ओढण्यास लागत नाहींत, अशा गाड्यांतून नेतां न येण्या सारखे जर जड यंत्र किंवा अवजारे नेण्याचा विचार असेल त्या वेळीं सदर्हू यंत्र अगर अवजारे नेणारे इसमास सोबत जोडलेल्या करारनाम्याच्या नमुन्यावर सही करावी लागेल.

२ असल्या प्रकारचे ओझे नेण्यास, परवानगी मागण्याकरितां, जिल्हा बोर्डाचे चेअरमन अगर व्हाईस चेअरमन यांज कडेस, ज्या दिवशीं प्रवास सुरुं होण्याचा असेल त्या पूर्वी निदान २१ दिवस तरी अर्ज करावा. कांहीं विविक्षित प्रसंगीं चेअरमन किंवा व्हाईस चेअरमन २१ दिवसापेक्षा कमी मुदतींत केलेला अर्ज मंजूर करतील. परंतु ६ व्या नियमांत सांगितल्याप्रमाणें व्यवस्था करण्यास पुरेसा वेळ मिळेल इतका अवकाश अर्ज दिल्यानंतर असावा. सदर्हू अर्जांत खालील मुद्यावर माहिती असावी.

(१) जो पदार्थ न्यावयाचा असेल त्याचे वजन (शक्य असेल तर रेल्वे रिसीटवरून द्यावे अगर एखादे सर्टिफिकीट द्यावे)

(२) ओझे न्यावयास उपयोगात आणावयाच्या गाडीचें वजन.

(३) वरील ओझे उचलण्या करितां एखाद्या एंजिनचा उपयोग करावयाचा असला तर त्याचें वजन.

(४) गाडीचीं व एंजिनचीं चाकें किती आहेत.

(५) गाडीच्या अगर एंजिनच्या चाकाच्या पट्याचा व्यास व रुंदी.

(६) ज्या रस्त्यानें न्यावयाचें तो रस्ता व अंतर. ज्या ठिकाणाहून न्यावयाचें व जेथें न्यावयाचे त्या ठिकाणांचीं नांवें.

(७) ओझें नेण्याची तारीख.

(८) ओझ्या बरोबर जाणाऱ्या जबाबदार गृहस्थाचें नांव व पत्ता

(९) वळणाच्या आणि उताराच्या ठिकाणीं अपघात होऊं नये ह्या बाबतींत काय पूर्व तयारी केली आहे त्याचा तपशील.

(३) वजन व माप खालीं दर्शविलेल्या प्रमाणांत असावीं.

१ एका गाडीवर गाडीच्या वजनासुद्धां १६ टनापेक्षां जास्त ओझें असू नये.

२ चाकाचा व्यास १८ इंचां पेक्षां कमी असू नये.

३ ८ टना पेक्षां जास्त ओझें नेणाऱ्या गाड्यांच्या आखा मधील अंतर १० फुटापेक्षां कमी असू नये.

(४) जाण्याच्या गती संबंधानें आणि रात्रीं किंवा ज्या वेळीं ओझ्याच्या गाड्या नेण्यांत येतील त्या वेळीं घ्यावयाच्या खबरदारी संबंधानें खालील नियम पाळले पाहिजेत.

गाडीचा वेग दरतासास ४ मैलापेक्षां जास्त असू नये.

२ गाड्यांचा प्रवास सरासरी प्रत्येक दिवशीं १० मैलापेक्षां कमी असू नये

३ कमींत कमी अर्ध रस्ता तरी रहदारीस राहील अशा रीतीनें रस्त्याच्या एका बाजूस रात्रीचेवेळेस गाड्या ओढून ठेवाव्यात.

४ अशा बाजूस ओढलेल्या गाड्यांना रात्रीच्यावेळीं पुढें २ व मागें २ असे दिवे असावेत.

५ जिल्हा बोर्डाचे चेअरमन अगर व्हाईसचेअरमन यांची परवानगी घेतल्याशिवाय, सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत प्रवास करूं नये. व अशी परवानगी फक्त जरूरीच्या वेळींच दिली जाईल.

सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत बाजूस ओढलेल्या गाड्याजवळ चौकीदार असावा.

(५) मोडतोडीच्या वेळीं खालील सूचनाकडे लक्ष द्यावें.

मोडतोड झाल्यास २४० तासाच्याआंत रस्ता साफ करण्याबद्दल मालक जबाबदार राहील,

२ मोडतोडीची बातमी अगदीं जवळच्या डिस्ट्रिक्ट बोर्डाच्या अधिकाऱ्यास मालकाच्या एंजटानें तावडतोब द्यावी.

३ ओझें न्यावयास सोपें जावे ह्मणून सब्बल किंवा दुसरीं अवजारें, ज्याच्यायोगानें रस्ता खराब होण्याचा संभव आहे अशीं उपयोगांत आणूं नयेत.

(६) सोबतच्या नमुन्याप्रमाणें करारनामा करण्यापूर्वी, चेअरमन अगर व्हाईसचेअरमन, यांनीं स्वतःची खात्री करून घ्यावी कीं ज्या रस्त्यावरून ओझें न्यावयाचे असेल त्या रस्त्यावरील पुलास त्या ओझे नेण्यापासून कांहीं एक धक्का पोहोचणार नाहीं; आणि त्यांच्यामतें जर असले पूल निरुपयोगी असले तर त्यांनीं ओझें वाहण्यास मनाई करावी व तसे त्या अर्जदारास कळवावे. त्यायोगानें जे पूल सुरक्षीत आहेत किंवा नाहीं याबद्दल कांहींच सांगितलें नाहीं अशा पूलावरून ओझें नेतांना, एंजिन किंवा दुसऱ्या कोण्याही यांत्रीक अवजारास नुकसान झालें तर जिल्हाबोर्ड त्याबद्दल कोणत्याही रीतीनें जबाबदार नाहीं.

जे ओझें न्यावयाचे आहे ते पूलावरून जाण्यासारखे नसल्यास, अर्जदारानें स्वतःच्या खर्चानें बाजूला रस्ते काढावेत. ओझे नेण्याच्यावेळीं रस्त्याचा भाग अगर रस्त्याच्या हद्दींतील जमीन खराब केली असेल तर तो भाग अगर ती जमीन पूर्वीप्रमाणें सुधारून देण्याची जबाबदारी अर्जदाराकडेच राहील.

(७) चेअरमन अगर व्हाईसचेअरमन ठरवितील ती रक्कम अर्जदारानें अमानत ठेवावी, पण अशी रक्कम रस्त्याच्या प्रत्येक मैलास २० रु. यापेक्षां ज्यास्त असू शकणार नाहीं. करारनाम्यान्वयें रस्ता दुरुस्त करण्यास लागणारी रक्कम या ठेवीच्या रकमेंतून वसूल करून राहिलेली रक्कम, ओझे नेण्याचे काम संपल्यावर परत केली जाईल. पण रस्त्याला किंवा रस्त्यासबंधीच असलेल्या दुसऱ्या कामास झालेलें नुकसान भरून काढण्यास जर ही रक्कम अपुरी असली तर, चेअरमन अगर व्हाईसचेअरमन, यांचेकडून हुकुम येतांच, १० दिवसाचे आंत जादा रक्कम अर्जदारास द्यावी लागेल. या बाबतींत अपील करावयाचे असल्यास मे. डेप्युटि कमिशनर साहेब यांचेकडेस करावे. व ते जो हुकूम देतील तोच अखेरचा समजला जाऊन पुढे अपील करू दिले जाणार नाहीं.

(८) दुसऱ्या नियमा प्रमाणें दिलेली कैफियत खोटी आहे असे जर चेअरमन अगर व्हाईस चेअरमन यांना वाटेल तर, त्यानें ठेवलेल्या अमानत रकमेस त्याला मुकावे लागेल. अशा वेळीं मे. डेप्युटिकमिशनर साहेब यांचेकडेस अपील करण्याची मुभा आहे.

सही

K. G. Damle

व्हाईस चेअरमन

जिल्हा बोर्ड आकोला

मेहरबान व्हाईसचेअरमन साहेब जिल्हा बोर्ड आकोला यांचे तर्फे सेक्रेटरी जिल्हा बोर्ड आकोला यासीं करारनामा लिहून दिला.

आज तारीख महिना सन

मी ——— राहणार ——— याजला

खालीं लिहिलेले वजनदार सामान,

संख्या वजन

खालीं दर्शविलेल्या गाड्या मधून

| संख्या | वजन | टायरची रुंदी | चाकाचा घेर | आंसामधील अंतर |
|---|---|---|---|---|
| | | | | |

खालीं दिलेल्या जिल्हा बोर्डाच्या ताब्यांतील रस्त्यावरून वाहून नेण्याची परवानगी मिळाली आहे.

रस्त्याचें नांव मैल

पासून पर्यंत.

सबब ह्या करारनाम्या सोबत जोडलेल्या नियमा बरहुकूम वागण्याचे ह्या लेखानें मी कबूल करितो व मी रुपये अमानत ठेवीत आहे त्या मधुन मजकडे निघणारी योग्य ती रक्कम मे. व्हाईस चेअरमन जिल्हा बोर्ड यांनीं वसूल करून घ्यावी. वसूल करावयाची रक्कम अमानत रकमेपेक्षां जास्त निघाल्यास सदर्हू रक्कम मला त्याबद्दल नोटिस मिळाल्यापासून दहा दिवसाचे आंत मी भरणा करून देण्यास तयार आहे.

ज्या रस्त्यानें मला माल नेण्याची परवानगी मिळाली आहे त्या रस्त्यावरील, खालीं दिलेले शिवाय करून, इतर पूल, मोऱ्या, फरशा, वगैरे योग्य तेवढें मजबूत वगैरे नसल्यामुळें जर माझें कांहीं नुकसान झालें तर त्या बदलची जबाबदारी जिल्हा बोर्ड आकोला यांचेवर न टाकितां तें मी जातीनें सोसण्यास तयार आहे. जो माल नेण्याची मला परवानगी मिळाली आहे तो माल वाहून नेण्याकरितां सुरक्षित नसलेले असे जे कांहीं पूल वगैरे मे. व्हाईस चेअरमन यांनीं खालीं दिले आहेत त्याचा उपयोग न करण्याचें मी कबूल करितो.

| मैल. | फलाग | कामाचें वर्णन | |
|---|---|---|---|
| | | | |

ह्या करारनाम्याप्रमाणें जी रकम द्यावयाची ती रकम जर दिली नाहीं तर ती रकम सी. पी. ल्यांड रेव्हिन्यु आक्टाप्रमाणें ऐन काळीच्या वसूला प्रमाणें वसूल केली जाईल.

तारीख — सही ———— अर्जदार

तारीख — ———— साक्षीदार

तारीख — ———— साक्षीदार

सही व्हाईस चेअरमन जिल्हा बोर्ड आकोला.

## जिल्हा बोर्डाच्या ताब्यांतील रस्त्यांची यादी.

### पहिल्या वर्गातील रस्ते

| | | मैल | फर्लांग |
|---|---|---|---|
| १ | पारस बाळापूर रस्ता | ६ | ० |
| २ | आकोला शिवनी रस्ता | २ | ६॥ |
| ३ | सांगवी ब्रॅंच रोड | १ | ० |
| ४ | वासीम कोंडाळा रस्ता | ० | ६ |
| ५ | पुसंद अप्रोच रोड | १ | ५ |
| ६ | आकोला मलकापूर रस्ता | २ | २॥ |
| ७ | आकोला महान रस्ता | १८ | २॥ |
| ८ | आकोला रेल्वे स्टेशन रस्ता | ० | १ |
| ९ | मुर्तिजापूर रेल्वे स्टेशन पासून ते गांवापावेतों रस्ता | ० | ७॥ |
| १० | मुर्तिजापूर रेल्वे स्टेशन पासून ते काटनमोर्केटच्या दक्षिणे कडचा रस्ता | ० | ३।॥ |
| ११ | कुरम रेल्वे स्टेशन पासून ते कुरम गांवापर्यंतचा रस्ता | ३ | ० |
| १२ | काटेपूर्णा कुरणखेड रस्ता | १ | ३॥ |
| १३ | अनसिंग ब्रॅंच रोड | १ १/४४ | ० |
| १४ | आकोला गुडदी रस्ता | २ | २॥ |
| १५ | माना रेल्वे स्टेशन ते माना गांवापावेतों रस्ता | ० | ६॥ |

### दुसरा वर्ग.

| | | मैल | फर्लांग |
|---|---|---|---|
| १६ | वाशीम आसोला रस्ता | १ | २॥ |
| १७ | बोरगांव गांवापासून ते स्टेशन पावेतों रस्ता | २ | ० |
| १८ | पारस रेल्वे स्टेशन पासून गांवात जाणारा रस्ता | ० | ७ |
| १९ | आकोला ड्राईव्ह रोड | २ | ० |
| २० | कापसी राजंदा रस्ता | २ २५/२६४ | ० |
| २१ | गायगांव निमकर्दा रस्ता | २॥ | ० |
| २२ | वाशीम रिसोड रस्ता | १२ | ० |

नो. नं. १८० — व्हाईस चेअरमन डि. बोर्ड आकोला

---

# धंदे शिक्षक.

ह्मणजेच इंडस्ट्रियल इंस्ट्रक्टर. यांत श्रीमंतापासून गरिबापर्यंत नित्य व्यवहारांत लागणारे अनेक सर्वोपयोगी जिन्नस घरच्या घरीं तयार करून अल्प श्रमांत व थोड्या भांडवलांत ५-१० रुपये रोज प्राप्ति करून घेता येण्याजोगा मजकूर आजपर्यंत प्रसिद्ध न झालेलीं केला. हुन्नरांची गुप्त व खरी माहिती देणारा धंदे—शिक्षक आजच मागवून पैसा मिळवा ! उद्योगी व्हा !! किंमत ८८ व्ही पी. नें ८१० आणे खास यादी फुकट.

ज्ञानमित्रकर्ते, शनवार पेठ; पुणें सिटी.

नो. नं. १९८

---

## NOTICE

The Treasury officer is now prepared to issue and encash Universal Currency Notes and Home Notes ( Bombay Circle ) of other denominations for the public on demand as far as possible

Endeavours will be made as far as possible in all trnsactions to meet the equirements of the payee as to the form of currency in which he desires to take payment.

The above orders do not yet apply to the Treasuries at Nagpur, Akola and Amraoti where Government treasury work is done by branches of Presidency Banks. As soon as arrangements are completed with the Banks concerned, a further notice will be issued giving the date from which free encashment of currency notes at these centres will be available.

---

## नोटीस

अब्दुलगफूर वा॥ अब्दुलसमद मु॥ रा पातूर ता० बाळापूर जि० आकोलें.

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं तूं माझे मुलाचा मुलगा साक्षांत नातू आहेस. मी तुझी वर्तणूक चांगली समजून व तूं माझी वृद्धपणांत सेवा करशील असें समजून माझा वडिलोपार्जित स्थावर माल कजबे बागाईत पातूर यथील शेत

| स. नं. | ए. गुं. | आ. रु. |
|---|---|---|
| ५३ | ७८३७ | १५ |
| १७२ | १८६ | १८१२ |

हीं शेतें काळी जमीन व यांत असलेल्या झाडासुद्धां ता. २१।४।१९०८ इ. रोजीं मी तुला बक्षीस पत्र लिहून देवून ता० २८। ४। १९०८ इ. रोजीं अ. नं. ३०१ सन १९०८ यास नोंदून दिलें आहे. बक्षीस दिल्यावर थोडे दिवस तु मला खाण्यास वगैरे देवून सेवाही करित होता. नंतर तुझी वर्तणूक बिघडून आतां तर तूं माझे खाण्यापिण्याचे हाल करून दररोज शिवीगाळ करून अंगावर मारण्याही येतोस त्यामुळें मला मरणःप्राय दुःख होवून फारच पश्चाताप होतो. करितां ह्या जाहीर नोटीशीनें कळवितो कीं तुझें बक्षीसपत्र मी रद केले आहे व त्या मालावर माझी पूर्वीप्रमाणेंच पूर्ण मालकी आहे. कळावे ता. २०।४।१९१६ इ. द. हरि विठोबा रा. पातुर.

सही उर्दू

सही अब्दुल रहिमान वा॥ शेखबाबन

नो. नं. १८८

---

## जाहीरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं माझा नातु अबदूल गफूर वा अबदुल समद मु- रा. पातूर यांसः—

ता० २१-४-१९०८ इ. रोजीं मी बक्षीसपत्र लिहून देवून त्यांत कजबे बागाईत पातूर ता. बाळापूर येथील

| शेत स. नं. | ए. गुं. | आ. रु. |
|---|---|---|
| ५३ | ७८३७ | १५ |
| १७२ | १८६ | १८१२ |

शेतें दोन बक्षीस दिलीं होतीं.

अलीकडे त्याची वर्तणूक चांगली नसल्यामुळें मी त्याचें बक्षीसपत्र रद केलें आहे. आतां त्या मालावर त्याची कोणतीच मालकी नाहीं माझी मालकी आहे. तरी कोणीही कोणत्याच प्रकारचा व्यवहार त्याच्याशी वरील शेतासंबंधानें करू नये केल्यास ती इस्टेट जबाबदार नाहीं. कळावे ता० २०-४-१६ इ. द. हरि विठोबा रा. पातुर

सही (उर्दू)

सही अब्दुल रहिमान वा॥ शेखबाबन.

नो. नं. १८९

---

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांस व सकवार मद पुनसा कलाल रा. बोरगांवखुर्द ता. आकोला

यांसः—

---

खालीं सही करणार यांजकडून जा नोटिस देण्यांत येते कीं, माझा चु चिमणसा मयत झाला ता. २०-५- त्यांस वारस बायको व मुलबाळ नाहीं. पूर्ण मालकीची एकत्र कुटुंबांतील वडिले जिंतची कमावलेली इस्टेट आहे. पुनसा वि चिमणसा यांनीं कमावलेली नाहीं. हे व म बाप आकोला एकत्र राहात होते. १८९७ मध्यें कांहीं बेबनाव होऊन त्या माझ्या बापानें ३५ व ५१ हे सर्वे खाण्यासाठीं घेऊन वेगळा राहिला. पु यानें पंचासमक्ष असें ह्मटलें कीं, "आको लग्न समाईकांत झाले. असेच चिमण लग्न झाल्यावांचून जामिनींचे हिस्सेवाटे हो नाहींत. यापुढें वाटून देईन." कांहीं व पुनसा वारला. चिमणसा अज्ञान असल्य माझे बापानें दावा केला नाहीं. चिम सज्ञान झाल्यावर दावा करावा परंतु म आई वारल्यामुळें व आपाला आजार आफूचें व्यसन लागून देहभान होऊन केल्या गेला नाहीं. व माझेंच पालनपो माझी आत आतांपर्यंत करीत आहे. इस्टेट आमच्या पूर्ण मालकीची आहे. करितां तुह्मी मुलगुजर घराण्यांतील भाऊ पैकीं मुलगा दत्तक घ्यावा. त्याबद्दल अ आपल्या सल्ला देऊं जर दत्तक घेतला न तर पूर्ण वारस आह्मी आहों. या क आपणास गहाण, खरेदी, बक्षीस, देण्याची मनाई आहे. ही मनाई इतर कांनीं लक्षांत घेऊन कोणत्याच प्रक व्यवहार करून फसूं नये. ह्मणून आग सूचनार्थ ही जाहिर नोटिस दिली तिनें केलेल्या व्यवहाराचा बोजा इस्टे कोणत्याच प्रकारें येणार नाहीं.

सही

N. A. Gujar

Borgaon Manju

नो. नं. १९०

---

# वऱ्हाडसमाचार

मिति वैशाख व॥ १२ शके १८

## रेव्हेन्यु खात्याचा वार्षिक रि

मध्यप्रांत आणि वऱ्हाड यांच्या महसूल (रेव्हेन्यु) खात्याचा १९१४ सालाबद्दलचा रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध आहे. त्याचा सारांश असा आहे—

गेल्यासालीं पीक सरासरीनें नेहमी आलें तरी कित्येक बाबी निराश होत्या. उत्तरेकडील जिल्ह्यांत रब्बीचें बुडालें. युद्धामुळें कापसाला चांगला ही आला नाहीं. छत्तिसगड जिल्ह्यां दुळाच्या पिकाला कीड लागली, व बऱ्हाणपूर येथें विणकरी लोकांची इतकी उपासमार झाली कीं त्यां

रिलीफ कामें उघडावीं लागलीं. कारण कीं या दोन ठिकाणीं तयार होणारा माल उंची असतो. पण युद्धामुळें सर्वत्र मंदी आल्यानें मालाला अर्ध्यापेक्षां अधिक मागणी आली नाहीं. त्यांचे कष्ट कमी करण्यासाठीं त्यांचे जवळचा माल खरीद करून ठेवावा लागला. इतर कित्येक जिल्ह्यांतल्या कोष्ट्यांची ही अशीच कष्टमय स्थिति होती, पण तेथें खाजगी मदत मिळाली. सुदैवानें इतर जिल्ह्यांची स्थिति बरी राहिली. मालगुजारी व रयतवारी जमीनींची लगवड वाढत्या प्रमाणावर झाली. गुरांच्या रोगांचें प्रमाण ही कमी होतें व धान्याला भाव ही चांगला होता. जमीनदार व कुळें या दोहींत ही आपापल्या हक्कांविषयींचें ज्ञान वाढतें दिसलें. जमीनीची लागवड ही वाढली. सरकार व रयत यांच्यामधील संबंध समाधानकारक होता. लोकांची राजनिष्ठा इंपीरियल रिलीफ फंडाला दिलेल्या वर्गण्या व मोटार ॲम्बुलन्सची देणगी या रूपांनीं व्यक्त झालेली दिसली. युद्धाच्या प्रारंभकाळीं दमो जिल्ह्यांत खोडसाळ कंड्या पिकल्या होत्या व कांहीं दरोडे ही पडले, पण गुन्हेगारांस ताबडतोब शिक्षा करण्यांत आल्या. शेतकी व व्हेटरिनरी खात्यांचें काम अविच्छिन्न चाललें होतें. त्यांना लोकांच्या मनांत विश्वास उत्पन्न करण्याचे कामीं यश प्राप्त झालें आहे. सहकारी चळवळीची प्रगति होत आहे. मालगुजार लोक बियाण्याचीं दुकानें उघडीत आहेत, व सहकारी तत्त्वावर सीड युनियन संस्था स्थापिल्या जात आहेत. या संस्थांची संख्या झपाट्यानें वाढत आहे. शेतकऱ्यांना ऋणमुक्त करणें हा सहकारी पेढ्यांचा मुख्य उद्देश लोकांच्या मनावर बिंबविण्याचे प्रयत्न चालले आहेत. गेल्यासालीं जमीन सुधारणेबद्दलच्या ३२२ सनदा देण्यांत आल्या. सनदा देण्यापूर्वीं बारकाईनें चौकशी करावी लागते यामुळें लोक सनदा मागण्यास पुढें येत नाहींत. जमीनीची सुधारणा केली कीं तिच्या बरोबर साऱ्याची वाढ झालीच समजावी अशी लोकांची झालेली समजूत ही सनदांची संख्या लहान असण्याचें एक कारण असेल असें दिसतें. शेतकऱ्यांना कर्ज देण्यासंबंधाच्या कायद्यान्वये गेल्यासालीं ७६४७७३ रुपये व जमीन सुधारणेच्या कायद्याअन्वयें १०६४५० रुपये कर्जाऊ देण्यांत आले. शेतकऱ्यांकडील मागील बाकी, व्याज वगैरे मुद्धां एकंदर १९ लक्ष रुपये येणें होतें, पैकीं १५ लक्ष वसूल झाले. ३२९४ रु. ची माफी देण्यांत आली व ४३८·८१ रुपयांची तहकुबी दिली आहे. एकंदरींत गेल्यासालीं सरकारला ५३८२१ रुपयांचा फायदा झाला.

---

## दुष्काळ.

इतके दिवस आमची अशी समजूत होती कीं बंगाल्यांत बांकुरा जिल्ह्यांतच काय तो दुष्काळ आहे, हिंदुस्थानचे इतर प्रांत त्या आपत्तीपासून मुक्त आहेत. पण हा भ्रम आहे असें आतां कळतें. राजपुतान्यांत जयपूर, जोधपूर, बिकानेर, या संस्थानांत आणि पंजाबपैकीं पत्याळा व झिंद या संस्थानांच्या भागांत दुष्काळानें आपलें भीषण स्वरूप प्रकट केल्याची बातमी आली आहे. हजारों गुरें अन्नपाण्यावांचून तडफडून मेलीं आहेत. हजारों कुलीन स्त्रिया व विधवा पडदानशीन असल्यामुळें भीक मागण्यास असमर्थ होऊन पडद्यांतल्या पडद्यांत दांतांशीं दांत लावून कष्टानें दिवस काढीत आहेत; खायला मिळालेंच तर तें दिवसांत एकवेळ केवळ प्राण धारणे पुरतें मिळतें, असें सांप्रतच्या दुष्काळाचें भयंकर व अंगावर शहारा आणणारें शब्दचित्र मारवाडीसंमेलनाच्या सेक्रेटरींनीं आपल्या पत्रांत रेखाटलें आहे. हा दुष्काळ किती प्राण्यांना कष्ट देत आहे याची कांहीं कल्पना पुढील आकड्यांवरून करतां येईल— जयपूर संस्थानची लोकसंख्या २८ लक्ष, जोधपूरची २० लक्ष व बिकानेरची ७ लक्ष मिळून ५५ लक्षांपैकीं सुमारें ४० लक्ष दुष्काळाच्या तडाख्यांत सांपडले आहेत. त्याचप्रमाणें २१ लक्ष गुरांना दुष्काळ पीडा देत आहे. सुदैवानें अनेक धनिक व उदार लोक आणि संस्था दुष्काळपीडितांना साह्य देत आहेत. गोकष्ट निवारणी सभा व कलकत्ता मारवाडी पंचायत यांनीं व इतर संस्थांनीं मिळून सुमारें १५ लक्ष रुपये गोळा करून बरेंच साह्य केलें आहे व सुमारें ६ हजार गुरांचे प्राण वाचविले आहेत. आश्चर्य हें आहे कीं येवढें मोठें संकट प्रजेवर येऊन गुदरलें असतां राजपुतान्यांतले संस्थानचे अधिकारी दुष्काळ निवारणाच्या कोणकोणत्या तजविजी आपण करीत आहों व त्यांचा कितीसा उपयोग होत आहे याबद्दलची हकीकत प्रसिद्ध न करतां स्वस्थ बसले आहेत. सुधारलेल्या इंग्रजी राज्यपद्धतीचें अनुकरण अशा चांगल्या कामीं त्यांनीं कां करूं नये तें कळत नाहीं.

---

## खबुतरें.

पारवे व खबुतरें हीं एकाच वर्गांतलीं पांखरें खरी; पण पारव्या पेक्षां खबुतरें बुद्धिमत्तेमुळें अधिक आवडूं लागतात. खबुतरांचा उपयोग लढाईंत मोठा करितात. ते पोस्टाच्या शिपायाप्रमाणें हवेंत उत्कृष्ट कामगिरी बजावतात. खबुतर हा पक्षी आपल्या नानाविध व चित्रविचित्र पंखामुळें मोठा दर्शनीय आहे. ह्या पक्ष्यांमध्यें खेळण्याची मोठी मौज आहे. ते युद्धें करितात. दुसऱ्या टोळींतील खबुतरें आपल्या टोळींत आणण्याची त्यांची हातोटी युद्धकला विशारदांनीं उचलण्या सारखी आहे.

अलिकडील नवीन शोध विलक्षण आहे. खबुतरांच्या समुदायामध्यें क्षयरोग्याला बसवितात आणि त्यांच्या पंखांचा वारा जसजसा त्या रोग्याच्या आंगावरून जातो तसतसा हा राजयक्ष्मा अगदीं हटत जातो. रोग्यापेक्षांही चांगल्या सदृढ निरोगी माणसाला या पक्षांचा सहवास अनुपमेय आनंद देतो. या पक्षांपासून आनंद घेण्याच्या कांहीं युक्तया आहेत. खबुतर कितीहि नवखें असो तें थोड्याशा परिचयानें आपला उत्तम स्नेही बनते. किंबहुना खबुतरा बरोबर १०।१२ दिवसपर्यंत जर नियमानें कांहीं कांहीं गोष्टी करण्याचा क्रम ठेविला तर हीं पांखरें त्या त्या गोष्टीचा पुनः पुनः क्रम सुचविण्याला घड्याळाप्रमाणें अगदीं बिनचूक उपयोगी पडतात. आपण आपली जेवण्याची वेळ नियमित करावी आणि खबुतरांना आपल्या ताटासमोर त्यांच्यासाठीं चणे टाकावे. प्रथमतः ५।६ दिवस तीं दुरून दुरून चणे वेंचून खातील. पण थोडासा परिचय दृढ झाल्यानंतर आपल्या ताटा भोंवती खेळूं व नाचूं बागडूं लागतात. आणि मध्यंतरी जर वाऱ्याची झुळुक आली तर तीं आपलीं पिसें आनंदानें अशी विखरतात कीं जणु काय तीं आपल्यापुढें नाचत व डोलतच आहेत. खबुतरांच्या अशा सहवासांत जे भोजन करितात ते खरोखर भाग्यशाली होत

खबुतरें आरंभीं जरी थोडीं घेतलीं. तरी त्यांची प्रजननाची शक्ति फार दांडगी आहे. आणि त्यामुळें थोड्या महिन्याच्या अवधींत ह्यांचे सैन्य उभारतां येतें. हीं पांखरें आपल्या धन्याच्या इच्छेप्रमाणें आकाशांत उडतात आणि वाटेल तितका वेळ मनें रमवूं शकतात. खबुतरांचा हा विनोदनाचा प्रकार विशेष मौजेचा आहे इतकेंच नाहीं तर ही पूर्वींची खबुतरें बाळगण्याची हौस लयास गेली ही नव्या सुधारणेची लंगडी बाजू होय. पूर्वीं राजेरजवाड्याच्या दौलतीकडे खबुतरखाना ही एक शोभेचीच बाब अशी नव्हती तर हत्ती घोड्याप्रमाणें यांचीही जोपासना करीत असत. खबुतरें पाळणें ही खर्चाच्या मानानें सुद्धां अगदीं हलकी बाब आहे. तेव्हां आम्ही असें सुचवितो कीं ज्यांना ज्यांना अनुकूलता असेल त्यांनीं त्यांनीं ह्या पक्षाचा संग्रह अवश्य करावा. आणि जर खरोखर कांहीं गुल हौसी शोकी असतील तर त्यांना या पक्ष्यांपासून रतिशास्त्राची हि सुंदर ओळख होईल. खबुतरांतील नर मादा अत्यंत प्रेमानें रहातात. आपल्या कोटारांतील पिलांचा संभाळही अनुपमेय रीतीनें करितात. पक्ष्यांमध्यें मादीपेक्षां नर अधिक शोभायमान व तुरेवाला असतो. त्याशीं प्रेमानें संलग्न होण्याची कला मादीपासून शिकण्या सारखी आहे. आणि तसेंच एक पातिव्रत्याचें हीं पांखरें उत्कृष्ट उदाहरण डोळ्यापुढें मांडतात.

---

## हक्क नोंदणी पुन्हां एकदा.

हक्क नोंदणीचा कायदा वऱ्हाड प्रांतास लागू झाला असून हक्क नोंदणीचें काम चालूं साल अखेर संपेल. रयतेच्या नफ्यातोट्याच्या दृष्टीपेक्षां कोण शेतकरी कोणत्या स्थितींत आहे हें समजण्यास हक्क नोंदणीचा उपयोग आहे.

१ हक्क नोंदणीपासून पोकळ व नामधारी खातेदार जाऊन त्या जागीं वास्तवीक खरेंखुरे मालक कोण आहेत हें उघडकीस आलें आहे व भाऊबंदांत वाटण्या झाल्यास सर्व वाटण्यांचा अलग अलग मालक कोण आहे व कोणास काय मिळालें व तें कमी अगर जास्त मिळालें हें समजण्याचें एक साधन झालें आहे.

२ देणें घेणें करणारे लोकांस पुष्कळ वेळां अशी अडचण पडते कीं अमक्या इसमास अमुक रुपये देण्याचे अगोदर त्याचे मोबदल्यांत त्याजपासून घेण्याची इष्टेट काय व किती आहे. व ही अडचण न पडावी म्हणून त्यानें हक्क रजिस्टरी त्या इसमाजवळ काय काय जमीन आहे हें पाहिल्यास देणाऱ्यास घेणाऱ्याची व त्याच्या घेण्याची रकमेची किंमत समजून येण्यास हें मार्गदर्शक आहे.

३ अंतरावर असणारे लोकांची जमीन दूर ठिकाणीं आहे. त्यांना कबजेदारीचा पर्चा मिळाल्या नंतर त्यांच्या पश्चात त्या ठिकाणीं त्या जमीनीची गैरव्यवस्था हेण्याचा संभव फारच कमी आहे. मात्र वहीतदाराची व आपली कायदेशीर कबुलायत घेतलेली असली म्हणजे पुरें.

४ अचें शेत बनें कपाशीं अच्या पश्चात खेरदी तारण वगैरे देण्याचे पूर्वीं जे काय फसवेगिरीचे साधन झालें तें हल्लीं हक्क नोंदणीमुळें अजीबात बंद झालें आहे. व त्यांतूनही कोणी एखादा "अस्सलानें" फसवेगिरी केलीतर ती उघडकीस येण्यास मुळींच विलंब लागणार नाहीं.

५ प्रत्येक कबजेदारास प्रत्येक शेतांत असलेल्या झाडें विहिरी वगैरेवर कितपत हक्क आहे एकवार सिद्ध झालें म्हणजे त्यांत कोणीही व केव्हांही फेरफार अगर कमी जास्त करूं शकत नाहीं. त्यामुळें कबजेदार मूल असो, स्त्री असो, अगर एखादा वृद्ध व अनाथ म्हातारा असो कोणत्याही " उडाणटप्पू " पासून फसवेगिरीची बाधा त्याला स्पर्श करूं शकणार नाहीं.

ह्या सर्व सुखाच्या गोष्टी झाल्या. परंतु कांहीं गोष्टी फायद्याऐवजीं नुकसानीच्या होण्याचा संभव आहे त्यापैकीं उदाहरण खालीं देतों.

१ फेरफारीच्या रुजवातीचें काम पुरें होतांच एका शेताचा कबजेदार कदा मरणपावला. त्याच्या पश्चात त्यास २ बायका वं एकीस कांहीं नसून एकीस संतान वगैरे असल्यास गांवातील गावगुंड लोकांच्या सगतीनें आपसांत फूट नसल्यास ती पाडून फेरफाराच्या रुजवातीची वेळ येईपर्यंत इष्टेटीची गैरव्यवस्था होण्याचा संभव फार आहे. तेव्हां इतर कोणत्याही गोष्टीपेक्षां वारसाच्या फेरफाराची व ते फेरफार रुजु करण्याची तजवीज जितकी लवकर तितकी हितकर होईल.

---

## चांदीच्या भावांत गडबड.

चांदीचे भाव अलीकडे अतिशय वाढले आहेत. थोड्या दिवसांपूर्वीं १०० तोळे चांदीला ७० पासून ७६ रुपये पर्यंत भाव होता, तो आतां १०० च्या आंत बाहेर आहे! आमच्या देशांत सरकारनें जरी सोन्याचें नाणें सुरू केलें आहे तरी त्याचा प्रचार फार थोडा आहे व अलीकडे वर्ष दीड वर्षांत तर सोन्याची गिनी दिसेनाशी झाली आहे. आमचा सगळा व्यवहार चांदीच्याच नाण्यांत चालत असल्यामुळें चांदीच्या सध्याच्या तेजीनें आमच्या व्यापारी वर्गास घाबरून सोडलें आहे यांत आश्चर्य नाहीं. आजपर्यंत विलायतेस पाठविण्याचा पैसा स्टेट सेक्रेटरी साहेबांच्या कौंसिलबिलांच्या रूपानें जात असे, पण चांदीचा भाव